



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार ३ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## समृद्धी महामार्गावर ट्रक-बोलोरोचा भीषण अपघात

# 7 जण ठार, 19 गंभीर जखमी

## ■ शेगाव येथून सावंगी मेघे येथे दुर्गामूर्ती नेतांना भाविकांवर काळाचा घाला
## ■ दुर्गादेवीचा रथ घेऊन जाणाऱ्या बोलेरो पिकअपला ट्रकची मागून धडक





**अमरावती/धामणगांव रेल्वे प्रतिनिधी-**

**शेगाव येथून वर्धा येथे दुर्गादेवीची मूर्ती नेत असतांना भाविकांवर काळाने घाला घातला असून यात ७ जण ठार झाले.तर १९ गंभीर जखमी झाले आहे. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील नागपूर कॉरिडॉरवर मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चॅनल नंबर ९७ +३०० तळणी गावाजवळ शुक्रवारी (दि.२) पहाटेच्या सुमारास हा भीषण अपघात घडला.**

मिळालेल्या माहितीनुसार,शेगाव येथून वर्ध्याकडे बोलेरो वाहनाला (MH २७ BH ५७९३) दुर्गादेवीचा लोखंडी रथ टोचन करून जात होता. यात २५ ते ३० भाविक बसले होते.दरम्यान नागपूर कॉरिडॉरवर मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चॅनल नंबर ९७ +३०० तळणी गावाजवळ शुक्रवारला (दि.२) पटाटे तीनच्या सुमारास या वाहनाला मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने (CG ०७ CJ ८८५५) जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की बोलेरोतील ५ भाविकांचा जागीच मृत्यू झाला तर उपचारादरम्यान २ जणांची प्राणज्योत मावळली.एकंदरीत या दुर्दैवी घटनेत ७ भाविकांचा मृत्यू झाला असून १९ हून अधिक जण जखमी झाले आहेत. सर्व मृत व जखमींना प्रथम धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आले होते.त्यानंतर अधिक उपचार्थ वर्धा येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. सर्व वर्ध्यातील सोमनाथे लेआउट व रामनगर येथील रहिवासी आहेत. अपघातानंतर ट्रकचालक आपले वाहन काही अंतरावर उभे करून अंधाराचा फायदा घेत फरार झाला.







मृतकांत दत्ता कुरसंगे (५३) ,प्रवीण बकाने (५०), घनश्याम पाटील (वय ६०), गोलू उर्फ सचिन बदलमवार (३८),ओम गावंडे (२२), मुणेश्वर ढोले (५३) ,रोशन राऊत (२६) यांचा समावेश आहे.तर वाहन चालक सागर ढोले ,राहुल मेहेक, नयन गोदाके, पवन ढोले, अमित ठाकरे,सतीश कुडे, नंदू शिरसकर, दिनेश पवनकर, यश मलकापूर, सतीश राऊत व नरेंद्र सोयाम हे गंभीर जखमी झाले आहे. तसेच प्रणय ढोले, प्रतीक शिरसकर, अनुज आडे, दुर्गेश भिसे, आर्यन वैद्य व शुभम ढोबळे हे किरकोळ जखमी झाले आहे.घटनेची माहिती मिळताच नगराध्यक्ष डॉ.अर्चना अडसड रोठे,विशेष पोलिस महानिरीक्षक पाटील जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधीक्षक तोटेवार उपविभागीय पोलिस अधिकारी गिरीश ताथोड,दत्तापूर ठाणेदार गजानन मेहेत्रे,तळेगाव दशासरचे किरण औटे,मंगरुळ दस्तगीरचे ठाणेदार श्री आत्राम यांनी घटनास्थळी धाव घेतली.तसेच दत्तापूर ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक अविनाश मेश्राम, शरद माहुलकर,अतुल पाटील,कुंदन राठोड, विशाल सूर्यवंशी, कुणाल सूर्यवंशी लखन राठोड यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलीस, आरटीओ, समृद्धी रुग्णवाहिका, क्यूआरव्ही टीम आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने 'गोल्डन अव्हर्स' मध्ये येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना वर्धा येथील वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली.

### ट्रकचालकाचा शोध सुरू

अपघाताच्या ठिकाणी पोलिसांनी तातडीने २०० मीटर अंतरावर बॅरिगेटिंग करून वाहतूक १२० च्या लेनवरून सुरक्षितपणे व संथ गतीने वळवली. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या साहाय्याने सर्व्हिस लेनवर हलवून महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे पूर्ववत करण्यात आली आहे. फरार झालेल्या ट्रकचालकावर निष्काळजीपणे व बेजबाबदारपणे वाहन चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून मंगरूळ दस्तगीर पोलीस पुढील तपास करत आहेत. जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधीक्षक तोटेवार उपविभागीय पोलिस अधिकारी गिरीश ताथोड,दत्तापूर ठाणेदार गजानन मेहेत्रे,तळेगाव दशासरचे किरण औटे,मंगरुळ दस्तगीरचे ठाणेदार आत्राम यांनी तातडीने घटनास्थळ गाठले.दरम्यान जिल्हा पोलिस अधिक्षक निकेतन कदम तळ ठोकून होते. या भीषण अपघाताची माहिती मिळताच नगराध्यक्ष अर्चना अडसड-रोठे,रावसाहेब रोठे यांनी ग्रामीण रुग्णालय येथे तातडीने धाव घेतली. जखमी असलेल्या रुग्णांना वाहनाची उपलब्धता करत सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात मदत केली.तसेच आवश्यक सूचना प्रशासनाला केली.

## दुष्काळावर 3 दिवसांचे विशेष विधानसभा अधिवेशन बोलवा

**पुणे/प्रतिनिधी :** २ ऑक्टोबर हा महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री या भारताच्या थोर सुपुत्रांच्या विचारांचे



स्मरण करण्याचा दिवस आहे. मात्र, अशा पवित्र दिवशी राज्यात आणि देशात सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि तरु ण मोठ्या प्रमाणावर आंदोलने करत रस्त्यावर ऊतरत आहेत.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना खासदार सुप्रिया सुळे यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन, राज्यातील भीषण दुष्काळ, रोहित पवारांवर सत्ताधा-यांकडून झालेले आरोप, पत्रकारांवरील हल्ले आणि पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवर सविस्तर भूमिका मांडली. पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना त्या म्हणाल्या, एमपीएससीच्या अध्यक्षांचा राजीनामा घेण्यात यावा आणि परीक्षा पद्धतीतील गोंधळ दूर व्हावा, या प्रमुख मागणीसाठी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत.

मुलांच्या नेमक्या काय भावना आणि अडचणी आहेत, हे थेट समजून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या या भावना सरकार दरबारी तातडीने मांडल्या पाहिजेत. ➩(पान २ वर)

# कुमकुम मोहोडने रचला इतिहास

## अमरावतीच्या लेकीने पदार्पणातच जिंकले आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्ण, मिश्र सांघिकमध्ये रौप्य



**अमरावती/प्रतिनिधीः-** गोसावी कॉलनीपासून आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पोडियमपर्यंत १७ वर्षीय प्रतिभाशाली कुमकुम अनिल मोहोडने शुक्रवारी स्वप्नवत वर्षाची सांगता केली आणि अमरावतीची तिरंदाजीतील पहिली आशियाई सुवर्णपदक विजेती ठरली.

यावर्षी तिच्या पहिल्याच सिनियर हंगामात शांघाय आणि अंताल्या येथे सलग दोन वर्ल्ड कप सुवर्णपदके जिंकल्यानंतर, कुमकुमने पहिल्याच आशियाई क्रीडा स्पर्धेत इतिहास रचत सुवर्ण जिंकले आणि नंतर मिश्र सांघिकमध्ये रौप्यपदकाची भर घालत संस्मरणीय दुहेरी कामगिरी केली.महिला रिकर्व सांघिक स्पर्धेत कुमकुमने कीर्ती आणि अनुभवी अंकिता भकतसोबत मिळून तिरंदाजी विश्वाला चकित केले. उपांत्य फेरीत भारतीय त्रिकुटाने चीनचा ५-१ असा पराभव केला, पहिले दोन सेट ५३-५१, ५४-५२ असे जिंकल्यानंतर तिसरा सेट ५१-५१ असा बरोबरीत सोडवला.अंतिम लढत अव्वल मानांकित बलाढ्य कोरिया कांग चेयॉन्ग, ली युनजी आणि ओह येजिन विरुद्ध होती. भारतीयांनी कोरियाला प्रत्येक बाणागणिक चोख प्रत्युत्तर दिले, पहिले दोन सेट ५४-५४ आणि ५६-५६ असे बरोबरीत सोडवले, त्यानंतर तिसरा सेट ५५-५१ असा जिंकून ४-२ अशी आघाडी घेतली. चौथ्या सेटमध्ये ५४-५४ अशी बरोबरी साधत ५-३ असा विजय मिळवला. ➩ (पान २ वर)



## भारतीय महिलांची सुवर्ण कामगिरी, हॉकी संघाने रचला इतिहास, तब्बल 44 वर्षानंतर सुवर्णपदक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय महिला हॉकी संघाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला हॉकी संघाने अंतिम सामन्यात चीनला १-० ने पराभूत करु न सुवर्णपदक जिंकले आहे. यासह, भारतीय महिला हॉकी संघाने २०२८ च्या ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली आहे. १९८२ नंतर प्रथमच भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे.

**भारतीय संघाने गतविजेत्या चीनला १-० ने पराभूत केले**

आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला हॉकीमधील भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे. ४४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. ऐची-नागोया येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने गतविजेत्या चीनला १-० ने पराभूत केले. या विजयासह, भारताने लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली आहे. चार दशकांहून अधिक काळाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर संघासाठी हा एक ऐतिहासिक दिवस आहे. भारतीय संघाने पहिल्याच क्वार्टरमध्ये आघाडी घेतली. लालरेम्सियामीने भारतासाठी एकमेव गोल केला. हा गोल भारताच्या विजयासाठी पुरेसा ठरला. त्यानंतर, दोन्ही संघांना आणखी गोल करता आले नाहीत. अशाप्रकारे, भारतीय संघाने गतविजेत्यांचा १-० ने पराभव केला. सामन्याच्या दुस-या सत्रात चीनने अत्यंत आक्रमक खेळ केला आणि भारतीय संघावर सतत दबाव ठेवला. ➩(पान २ वर)

## मेलोडी चाकलेट्स खा, पण; अभिजीत दिपकेंची आंदोलनातून पंतप्रधान मोदींवर अप्रत्यक्ष टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात आज (२ ऑक्टोबर) मुंबईत आंदोलन करण्यात आलं आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. सीजेपीच्या या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.या आंदोलनादरम्यान बोलताना अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यावेळी अभिजीत दिपके यांनी मेलोडी चाकलेटवरू न पंतप्रधान मोदी यांना टोला लगावला आहे. मेलोडी चाकलेटस् खायचे असतील तर खा, पण जनतेने जे काम दिलं ते करा, असं म्हणत अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान मोदींवर अप्रत्यक्ष टीका केली. मुंबईतील आंदोलनात अभिजीत दिपके भाषण करत असताना आंदोलकांनी मेलोडी, मेलोडी अशा घोषणा दिल्या. त्यानंतर अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान मोदी यांना अप्रत्यक्ष टोला लगावला. अभिजीत दिपके म्हणाले की, मेलोडी खायचे तर खा, त्याच्याशी आम्हाला काही देणंघेणं नाहीये. मात्र, ज्या कामासाठी तुम्हाला जनतेने निवडून पाठवलं आहे, ते काम करा, अशा शब्दांत अभिजीत दिपके यांनी मोदींना अप्रत्यक्ष टोला लगावला.

**तुमची खुर्ची धोक्यात, अभिजीत दिपके यांचा फडणवीसांना इशारा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही ३ दिवसच जेलमध्ये टाकायचं ➩(पान २ वर)

## शिवाजी पार्कवरील आंदोलन बेकायदेशीर?; CJPच्या चार पदाधिका-यांविरोधात तक्रार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील शिवाजी पार्कवर परवानगी नसताना आंदोलन केल्याप्रकरणी काकरोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांच्यासह चार



जणांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. अभिजीत दीपके, सौरभ दास, आशुतोष रांका आणि रत्ना सिंह यांच्याविरोधात शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात ही तक्रार करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काकरोच जनता पार्टीने शुक्रवारी शिवाजी पार्कवर आंदोलन केले. पोलिसांची ➩(पान २ वर)




## जगातील सर्वात उंच पुलावरून 100 किमी प्रतितास वेगाने धावली ट्रेन

**जम्मू/वृत्तसंस्था :** भारतीय रेल्वेने जम्मू-काश्मीरमध्ये ११७८ फूट उंचीवर बांधलेल्या जगातील सर्वाधिक उंच चिनाब रेल्वे पुलावरू न वंदे भारत एक्स्प्रेस ताशी १०० किमी वेगाने यशस्वीपणे पार केली. इतकेच नव्हे, तर वंदे भारत एक्स्प्रेसने भारतातील पहिल्या केबल-स्टे प्रकारातील अंजी पुलावरू नही ताशी १०० किमी वेगाने प्रवास केला. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी याचा व्हीडीओ शेअर करू न हा ऐतिहासिक क्षण असल्याचे म्हटले. या यशस्वी चाचणीनंतर १११ किलोमीटर लांबीच्या श्री माता वैष्णोदेवी कटरा-बनिहाल मार्गावरील कमाल रेल्वे वेग ताशी ७५ किमीवरून ताशी १०० किमी करण्यात आला आहे. सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवरील एका पोस्टमध्ये रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले



आजचा दिवस ऐतिहासिक आहे. आज वाढीव वेगाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. वंदे भारत एक्स्प्रेसने जगातील सर्वाधिक ➩(पान २ वर)

## एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना आश्वासन दिले होते. त्यांनी शब्द दिलेला तो पाळला. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून परिपत्रक काढण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलीचे आश्वासन दिले होते. महेंद्र हरपाळकर यांच्यावर संभाजी ब्रिगेडने शाईफेक केली होती. तीन दिवसांपूर्वी एमपीएससीच्या विध्यार्थांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी सकारात्मक चर्चा पार पडलेली. एमपीएससीचे सचिव महेंद्र होरपाळकर यांची बदली होणार, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना दिले होते. त्यानुसार हरपाळकरांची बदली झाली आहे.मागच्या महिन्यात नवी मुंबईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळ फासले होते. एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांचा राजीनामा



घ्यावा अशी एमपीएससीच्या परीक्षार्थींची मागणी होती. कारण पेपर फुटीचे हे प्रकरण त्यांच्या कार्यकाळात घडले आहे. पेपर फुटीमध्ये एमपीएससीमध्ये काम करणा-या लोकांचा सहभाग असल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. अशा पद्धतीची लोकं एमपीएससीवर नसवीत अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर फुटल्यापासून एमपीएससी विद्यार्थ्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे रस्त्यावर ऊतरु न एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासण्याच्या या प्रकाराशी खासदार सुप्रिया सुळे यांनी असहमती व्यक्त केली होती. हे करणे योग्य नाही. तोंडाला काळं फासून प्रश्न सुटत नाही असे सुप्रिया सुळे म्हणालेल्या. मतभेद असू शकतात. पण लोकशाहीत मतभेद असले पाहिजेत. पण तोंडाला काळे फासणे वैगेरे संस्कृती योग्य नाही. मुख्यमंत्र्यांनी यावर बैठक घेतली होती.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय



# पतंजलीकडून विदेशी कंपन्यांच्या उत्पादनांची होळी

## जयस्तंभ चौकात आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** योगगुरू बाबा रामदेव यांच्या पतंजली योगपीठ, हरिद्वारचे स्वामी ऋतदेव यांच्या नेतृत्वाखाली आज शुक्रवार १ ऑक्टोबर रोजी सकाळी जयस्तंभ चौकात गांधी पुतळ्याजवळ बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनांची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. लक्स, लाईफबॉय, पेप्सोडेंट, रिन, टाइड, मॅगी-नूडल्स, कोलगेट, कोका कोला, केएफसी, जॉन्सन अँड जॉन्सन तथा अन्य कंपन्यांची उत्पादने प्रतीकात्मक रूपाने जाळण्यात आली. विशेष म्हणजे गांधी जयंतीचा दिवस साधून पतंजली योगपीठाच्या या आंदोलनात काँग्रेस नेते सुनील देशमुख, विलास इंगोले, जयश्री वानखडे हे देखील सहभागी झाले होते. आंदोलकांनी विदेशी वस्तूंची गांधीजींनी केलेल्या होळीचे स्मरण करून 'स्वदेशी अपनाएंगे, देश को बचाएंगे, देश को समृद्ध बनाएंगे' अशा घोषणा दिल्या. युवा भारतचे प्रांत प्रभारी अक्षय धानोरकर, योगेश राठी, हरिहर गिलोरकर, माजी सरपंच डॉ. राजेश चांडक, रतिलाल सातपुते, तेजस गोतरकर, अजिंक्य कोहळे, कार्तिक चांडक, सुयोग आदींनी विदेशी उत्पादनांच्या होळी आंदोलनात सहभाग दर्शविला. स्वदेशीच्या पक्षात घोषणा दिल्या. तेथून जाणाऱ्या लोकांनाही भारतीय कंपन्यांची उत्पादने वापरण्याचे आवाहन करण्यात आले.स्वामी ऋतदेव हे तीन दिवसीय विशेष योग शिबिरासाठी अमरावती येथे आले आहेत. या दरम्यान त्यांच्या मार्गदर्शनात हे आंदोलन करण्यात आले.

# अपघातातील जखमी मजुराची मृत्यूशी झुंज अपयशी

## चिस्तूर ते भीष्णूर मार्गावरील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** चिस्तूर ते भीष्णूर मार्गावर झालेल्या अपघातात जखमी गजानन अंबादास ठाकरे (वय ४८, तळेगाव ठाकूर) यांचा दहा दिवसांनी उपचारादरम्यान आज शुक्रवार २ ऑक्टोबर रोजी मृत्यू झाला आहे. २३ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजताच्या दरम्यान हा अपघात झाला होता. माहिती नुसार तळेगाव ठाकूर येथील चार जण दोन दुचाकीं वरून चिस्तूर परिसरातील शेतात मजुरीच्या कामासाठी जात होते. दरम्यान, चिस्तूर जवळ बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांसह पोलिसांनी जनावरांची वाहतूक करणारा पिकअप वाहन पकडल्याचे दिसल्याने गजानन ठाकरे यांचे लक्ष त्या दिशेने गेले. याचवेळी दुचाकीवरील त्यांचे नियंत्रण सुटल्याने एमएच २७ डीके ३२३५ क्रमांची दुचाकी समोरच्या दुचाकी वर धडकली. या अपघातात गजानन ठाकरे गंभीर जखमी झाले, तर त्यांच्या सोबत असलेले सहकारी सौरभ गळकाटे यांना ही किरकोळ दुखापत झाली. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिक व पोलिसांनी जखमींना तातडीने तिवसा शासकीय रुग्णालयात दाखल केले. गजानन ठाकरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत



होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील इर्विन रुग्णालयात रेफर करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे त्यांच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, गेल्या दहा दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत असलेल्या गजानन ठाकरे यांची अखेर शुक्रवारी प्राणज्योत मालवली.गजानन ठाकरे हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# सहल बेतली यशच्या जीवावर

## रायगड जिल्ह्यातील वायगाव येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शैक्षणिक सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी रायगड येथे घडली होती.या दुर्दैवी घटनेत जिल्ह्यातील वायगाव येथील यश किरण वानखडे या विद्यार्थ्याचाही मृत्यू झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, विनर्स अकॅडमीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या सहलीत एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते. काळाने झडप घातल्याने सहली दरम्यान पाण्यात बुडाल्याने आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. एकाच वेळी आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.या दुर्घटनेत जीव गमावलेला यश किरण वानखडे हा जिल्ह्यातील वायगाव येथील रहिवासी होता. त्याचे वडील किरण वानखडे हे कामानिमित्त आळंदी परिसरातील एमआयडीसीमध्ये कार्यरत असल्याने यश तेथे शिक्षण घेत होता. शैक्षणिक सहलीत सहभागी झालेल्या यशच्या कुटुंबावर या दुर्घटनेमुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.वायगावसह अमरावती शहरातही या घटनेची माहिती समजताच शोककळा पसरली. एका सहलीसाठी घराबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या दुर्घटनेतील आठही मृत विद्यार्थ्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.आळंदी येथील विनर्स कॅडमीच्या वतीने ही सहल आयोजित करण्यात आली होती.

पान १ व १० वरून

## सात चितांनी हादरला

या दुःखद घटनेने संपूर्ण परिसराला हादरवून सोडले असून, आनंदासाठी निघालेल्या सात जणांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.दिवसभर एकामागून एक चिता पेटत राहिल्या आणि प्रत्येक चितेसोबत कुटुंबीयांचा आक्रोश अधिकच तीव्र होत गेला. अखेर दत्ता खुरसंगे यांचा रात्री साडेआठ वाजता सातवा आणि शेवटचा अंत्यसंस्कार करण्यात आला. देवीच्या स्वागतासाठी निघालेल्या सात जणांना अखेर अश्रूंनी निरोप देताना परिसरातील प्रत्येक डोळा पाणावला.

## समृद्धी महामार्गावर वाहन

कोणती सुरक्षा तपासणी करण्यात आली, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.विशेष म्हणजे टोल प्लाझावर हे वाहन सुमारे एक ते दीड तास उभे होते. वाहनाला महामार्गावर प्रवेश देण्यास टोल प्लाझावरील कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला विरोध दर्शविल्याचे सांगितले जाते. मात्र काही वेळानंतर वाहनाला समृद्धी महामार्गावरून जाण्यास सांगण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नंतर प्रवेशाची परवानगी नेमकी कोणत्या पातळीवरून देण्यात आली, याची चौकशी आवश्यक ठरत आहे.

दरम्यान, रथाच्या मागील बाजूस पुरेसे रिफ्लेक्टर किंवा प्रकाशयंत्रणा लावण्यात आली होती का, याचीही तपासणी होणे गरजेचे आहे. वाहनाला मागील बाजूस योग्य रिफ्लेक्टर आणि लाईट असते तर मागून येणाऱ्या वाहनाला त्याचा अंदाज येण्यास मदत झाली असती, अशी चर्चा आहे.

अपघाताच्या वेळी परिवहन विभागाचे पथक टोल प्लाझावर उपस्थित असते तर वाहनाची तपासणी, त्याची सुरक्षितता आणि महामार्गावर प्रवेशाची वैधता याबाबत अधिक काटेकोर निर्णय घेता आला असता का, हाही प्रश्न आता उपस्थित होत आहे.

या दुर्घटनेत पाच जणांचा जागीच, तर उपचारादरम्यान आणखी दोघांचा मृत्यू झाला. सात जणांच्या मृत्यूनंतर केवळ चालकाची जबाबदारी निश्चित न करता टोल प्लाझा, महामार्ग व्यवस्थापन आणि संबंधित यंत्रणांची भूमिका तपासली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रत्नापूर तलावात दोन

हाती लागला. मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आल्यानंतर भावेशच्या नातेवाईकांनी हंबरडा फोडला. काही वेळापूर्वी मित्रांसोबत फिरण्यासाठी घराबाहेर पडलेला भावेश मृतावस्थेत परतल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

दरम्यान, तलावात बुडालेल्या दुसऱ्या तरुणाचा शोध घेण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथकाची मोहीम रात्री उशिरापर्यंत सुरू होती. बडनेरा पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

## मोबाईल टॉवरवर चढला

मिळता उलट माझ्यावर अन्याय झाल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला आहे.सदर जमीन प्रकरणात कथित बनावट कागदपत्रे आणि सेल सर्टिफिकेटच्या आधारे जमिनीचे हस्तांतरण करण्यात आल्याचा दावा डाखोरे यांनी केला आहे. तसेच भोगवट वर्ग-२ मधील जमीन आवश्यक परवानग्यांशिवाय वर्ग-१ मध्ये रूपांतरित केल्याचे दाखवून खरेदी-विक्री करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणात तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.सकाळी ७ वाजतापासून सुरू असलेल्या या गांधीगिरी आंदोलनाचे १२ तास उलटले असून अद्यापही प्रशासनाकडून तोडगा काढण्यात न आल्याने वृत्त लिहेस्तोवर हे आंदोलन सुरूच होते.आंदोलनस्थळी सकाळपासून मोठी गर्दी निर्माण झाली असून दरम्यान माजी जि प सदस्य संजय देशमुख, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे,अविनाश ठाकरे,आकाश डेहनकर,रवि मानव आदींनी भेटी दिल्या आहे.

सकाळी सात वाजतापासून गांधीगिरीच्या मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर तिवसा येथील नायब तहसीलदार आशिष नागरे यांनी घटनास्थळी भेट दिली. मात्र, वृत्त लिहिस्तोवर अन्य वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट न दिल्याने आंदोलकांकडून प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत होती. मागण्यांवर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित प्रकरणाची चौकशी करावी आणि पुढील कार्यवाहीबाबत लेखी स्वरूपात माहिती द्यावी, अशी मागणी डाखोरे यांनी केली.

## सामाजिक पोस्टवरून भाजपा

अनुभवाचा संदर्भ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यात कुठेही देवी देवतांचा अपमान झालेला नाही. मात्र, ही पोस्ट पूर्णपणे न वाचता किंवा तिचा संदर्भ न समजून घेता भाजपा गटनेते पप्पू उर्फ निलेश भालेराव, हरिदास चुकेकर व व आशु नामक युवकाने देवी-देवतांबाबत का बोलता, असा आक्षेप घेत धमकीवजा इशारे दिल्याचा दावा सतिष चौधरी यांनी केला आहे. पुढे सतिष चौधरी म्हणाले की, 'मी विचारांची लढाई लढणारा माणूस आहे. माझ्याशी विचारांनी लढायला पाहिजे होते. मात्र, त्याऐवजी धमकीवजा इशारे देण्यात आले. त्यामुळे मी आणि माझे कुटुंबीय दहशतीत आलो आहोत.'

चांदूर रेल्वे शहरात विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपापल्या पद्धतीने राजकारण व समाजकारण करीत असले तरी निवडणुकीचा कालावधी वगळता सर्व कार्यकर्ते सलोख्याने व एकजुटीने राहतात. शहरातील सामाजिक व राजकीय वातावरण बिघडू नये, यासाठी धमकी व दबावाच्या राजकारणाला आळा बसणे गरजेचे असल्याचे सतिष चौधरी यांनी म्हटले आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, आम आदमी पक्ष, शिवसेना (उबाठा), जनता दल (सेक्युलर), माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले विचार मंच व इतर पक्ष, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त पत्रकार परिषद प्रा. शिवदास उटाणे स्मृती सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती.

## दासटेकडीजवळ भीषण

झाली. अपघाताची तीव्रता एवढी होती की त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, अपघात घडवून आणणाऱ्या वाहनचालकाचा ठावठिकाणा लागला नाही. पोलिसांकडून परिसरातील उपलब्ध माहितीच्या आधारे अज्ञात वाहनाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी मृत उत्कर्षचे वडील संदीप सत्यवान मेश्राम (५७) यांनी तिवसा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघात नेमका कसा घडला, संबंधित वाहन कोणते होते आणि चालक कोण होता, याचा तपास तिवसा पोलिसांकडून सुरू आहे.

## एमडी ड्रग्जसह दोघे

हुजेब खान याला यापूर्वीही गुन्हे शाखेने एमडी ड्रग्जप्रकरणी अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई अपर पोलिस महासंचालक राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस निरीक्षक परदेसी यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## हार्डवेअर दुकानाचे लॉक

शक्यता असल्याने संभवानी यांनी तातडीने दुकान गाठले.

दुकान उघडून आत पाहणी केली असता काउंटरमध्ये ठेवलेली १२ हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास दुकानाचे लॉक तोडून आत प्रवेश केला आणि रोकड लंपास केल्यानंतर शटर पुन्हा बंद केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. दुकान परिसरातील परिस्थिती आणि उपलब्ध माहितीच्या आधारे चोरीचा तपास सुरू करण्यात आला आहे. अज्ञात चोरट्याची ओळख पटवून त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे व्यापारी परिसरातील रात्रीच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## सरकारी योजनेतील फोर्टिफाइड

मुंबई येथील नॅशनल लॅबोरेटरीकडे पाठविण्यात आले. प्रयोगशाळेच्या तपासणीत हा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीतून वितरित केला जाणारा फोर्टिफाइड तांदूळ असल्याचे निष्पन्न झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या अहवालानंतर संबंधित प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्यात आली. निरीक्षण अधिकारी राहुल केदारे यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी सागर राठी याच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल केला. सार्वजनिक वितरण प्रणालीतील धान्याचा अनधिकृत साठा अथवा विक्री झाली आहे का, यासह या प्रकरणातील इतर बाबींचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## जीवन ज्योतची समाजसेवेसाठी

शिबिराचे कामकाज राजू मुंदडा सांभाळणार आहे. समितीच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी मोफत मोतिया बिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिवाय डॉ. पंकज लांडे यांच्या माध्यमातून करण्यात येणारी फेको मोतियाबिंदू शस्त्रक्रिया रुग्णांसाठी अत्यंत अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या उर्वरित खर्च संस्था तसेच, स्व. लीलाबेन मंगलजीभाई पोपट फाऊंडेशन आणि आराधना फॅशनचे संचालक पुरणसेठ हबलानी यांच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. समाजातील गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत मिळावी, आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून कोणीही वंचित राहू नये तसेच नेत्रदान, देहदान आणि अवयवदानाचे महत्त्व सर्व सामान्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने समितीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समाजहित, मानवसेवा आणि गरजूंच्या मदतीचा संकल्प घेऊन सुरू करण्यात आलेल्या 'जीवन ज्योत'च्या या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. मोतियाबिंदू ऑपरेशनसाठी राजू मुंदडा (९३२६९ ७७७३३), चंद्रकांत पोपट (९५९२१ ४४४४४), पुरणसेठ हबलानी , (९८२३० ९२४२४) नेत्रदानासाठी सुरेश वसानी (९८२३२ ०५४११), डॉ. नंदकिशोर लोहाना (९४०५२ ३३०३९) अवयवदानासाठी डॉ. सिकंदर आडवाणी (८०८०५ ३८३६५), देहदानासाठी डॉ. पंकज लांडे (७७७६० ९९९११) यांच्याशी संपर्क करण्याचे सांगण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये चंद्रकांत पोपट सोबत पुरणसेठ हबलानी, डॉ.नंदकिशोर लोहाना, सुरेश वसानी, डॉक्टर पंकज लांडे आदि उपस्थित होते.

## छ्रामपंचायत सभेत गोंधळ

तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे धारणी पोलिसांनी असलम खान याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम २९६ व २२१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. संबंधित प्रकारामागील नेमकी परिस्थिती काय होती, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या अधिकृत बैठकीदरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे स्थानिक पातळीवर चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, पोलिसांनी तक्रारीतील आरोपांच्या अनुषंगाने पुढील तपास सुरू केला आहे.

## सील केलेल्या घराचे पुन्हा

त्यानुसार २१ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिस बंदोबस्तात घराचा ताबा घेऊन ते सील करण्यात आले. सुरक्षेसाठी तेथे रक्षकही तैनात करण्यात आला. तक्रारीनुसार, त्यानंतर दोन्ही व्यक्तींनी सुरक्षा रक्षकाला लोटालोट केली, घराचे सील तोडले आणि कुलूप उघडून आत प्रवेश केला. रक्षकाला धमकी दिल्याचाही आरोप आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता दोघेही घरात आढळल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी गुन्हा क्रमांक ८५१/२०२६ नोंदवून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२९(४) व ३(५) अन्वये तपास सुरू केला आहे.

## शिवी दिल्याच्या रागातून

हात पुढे केल्याने चाकूचा वार हातावर लागून तरुण जखमी झाला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी साहिल साबु खान (वय २०, रा. सुदर्शननगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणाल प्रकाश इमले (वय २६, रा. सुदर्शननगर) हे १ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १० वाजता मित्रांसह राणा कॉम्प्लेक्स येथील बिअर शॉपीसमोर उभे राहून गप्पा मारत होते. त्यावेळी त्यांच्या परिसरातील साहिल साबु खान तेथे आला. कुणाल हे मित्रांसोबत हसत-मस्करी करीत असताना वसीम भाई बाला आणि सांडे यांच्यासह इतर मित्रही मस्करी करीत होते. गप्पा सुरू असताना कुणाल यांच्या तोंडून साहिल याच्याबद्दल शिवी निघाली. त्याचा राग आल्याने साहिल संतापला. कुणाल यांनी वसीम यांना साहिलला समजावून सांगून वाद वाढवू नका, असे सांगितले. मात्र, संतापलेल्या साहिलने खिशातून बटनाचा चाकू काढून कुणाल यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. अचानक झालेल्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी कुणाल यांनी डावा हात पुढे केला. त्यामुळे चाकूचा वार त्यांच्या हाताला लागला. घटनेनंतर त्यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अप क्रमांक ८७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११८ (२) नुसार गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## कुमकुम मोहोडने रचला

डिव्हिजनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे तिच्या संयमावर खूश झाले.

'तिने अंतिम सामन्यात सिनियर तिरंदाजासारखा खेळ केला. जेव्हा गरज होती तेव्हा तिने १० मारले. तिने सांघिक अंतिम सामन्यात पाच वेळा १० आणि एकदा ९ मारला आणि आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तिने शहराचा आणि देशाचा अभिमान वाढवला आहे,' असे डांगे म्हणाले.काही तासांनंतर कुमकुम पुन्हा तिचा जोडीदार धीरज बोम्मदेवरासोबत मैदानात उतरली. तीच जोडी जिने अंताल्या येथे वर्ल्ड कप सुवर्ण जिंकले होते. सकाळच्या उपांत्य फेरीत त्यांनी यजमान जपानचा ५-३ असा पराभव केला होता. मात्र अंतिम फेरीत त्यांना चीनच्या झू जिंगयी आणि ली मेंगकीकडून ५-३ (३८-३४, ३७-३५, ३६-३७, ३६-३७) असा पराभव पत्करावा लागला.

'मिश्र अंतिम सामन्यात तिला वाऱ्याचा अंदाज नीट घेता आला नाही,' असे डांगे पुढे म्हणाले.

अमरावतीत गोसावी कॉलनीतील घरी जल्लोषाचे वातावरण आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी घरी मिठाईचे बॉक्स बनवणारे कुमकुमचे वडील अनिल मोहोड आणि आई रुपाली यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. 'इतक्या लहान वयात तिने मोठी भरारी घेतली आणि आम्हाला अभिमान वाटायला लावला. आम्ही अत्यंत आनंदी आहोत. तिची आई सकाळपासून आनंदाश्रू ढाळत आहे,' असे अनिल मोहोड म्हणाले.

शुक्रवारच्या सुवर्णासह कुमकुम तिरंदाजीतील अमरावतीची पहिली आशियाई सुवर्णपदक विजेती ठरली आहे, आणि क्रिकेटपटू जितेश शर्मा आणि भारती फुलमाळी यांच्यानंतर शहराची एकूण तिसरी आशियाई सुवर्णपदक विजेती ठरली आहे. शहरात तिच्या परतीवर भव्य स्वागताची योजना आखण्यात आली आहे. 'कुमकुम ५ ऑक्टोबरला येत आहे. राजकमल चौकापासून डिव्हिजनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सपर्यंत मिरवणूक काढण्यात येईल, जिथे हैदराबाद येथील आर्चरी प्लेयर्स लीगसाठी रवाना होण्यापूर्वी तिचा सत्कार करण्यात येईल,' असे मोहोड यांनी सांगितले.

## दुष्काळावर 3 दिवसांचे विशेष

हे वय मुलांचे आंदोलनात वेळ घालवण्याचे नाही, तर नोकरीवर रु जू होण्याचे आहे. मात्र सातत्याने पेपर फुटणे आणि परीक्षांचे वेळापत्रक कोलमडणे यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. ही परिस्थिती अत्यंत चीड आणणारी आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर त्यांनी सरकारकडे सर्वपक्षीय चर्चेची मागणी केली. ज्याप्रमाणे केंद्रात महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय विषयांवर ऑल पार्टी मीटिंग बोलावली जाते, तसाच गंभीर विचार राज्य सरकारने दुष्काळाच्या बाबतीत केला पाहिजे. यासाठी राज्य शासनाने विधानसभेचे किमान तीन दिवसांचे विशेष चर्चासत्र अथवा अधिवेशन बोलवावे. सर्व आमदारांचा आणि लोकप्रतिनिधींचा फीडबॅक घेउन शेतक-यांना तातडीने दिलासा द्यावा, कारण ग्रामीण भागातील परिस्थिती अतिशय बिकट आहे.

रोहित पवारांवर अर्बन नक्षलचा आरोप हास्यास्पद

रोहित पवार यांच्या उपस्थितीनंतर आंदोलन पुन्हा भडकल्याचा आणि ते अर्बन नक्षल तयार करत असल्याचा आरोप भाजपकडून केला जात असल्याबाबत विचारले असता सुप्रिया सुळे यांनी रोखठोक प्रत्युत्तर दिले. भाजपच्या मित्रांना विरोधकांवर आरोप करण्यासाठी नवनवीन शब्द शोधून काढण्याची सवयच लागली आहे. इथे कोणताही अर्बन नक्षलचा प्रकार नसून मुले केवळ आपल्या पोटापाण्याच्या प्रश्नासाठी आणि गुणवत्तेच्या जोरावर हक्काचा न्याय मागत आहेत.

२०० आमदारांच्या सरकारला चर्चेची भीती का?

सभागृहात २०० हून अधिक आमदारांचे पाठबळ असलेल्या या सरकारला विद्यार्थ्यांशी संवाद साधायला अडचण काय आहे? लोकशाहीत बैठकीत काही तोडगा निघाला तरी पुढील टप्प्यांवर सतत चर्चा होत राहिली पाहिजे. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून हा तिढा कायमचा सोडवला पाहिजे.

## हॉकी संघाने रचला इतिहास,

जेव्हा चीनला पेनल्टी स्ट्रोक मिळाला, तेव्हा त्यांना सामना बरोबरीत आणण्याची सर्वात मोठी संधी मिळाली. भारताची अनुभवी गोलरक्षक सविता पुनियाने उत्कृष्ट बचाव करत चीनला गोल करण्यापासून रोखले. यानंतरही चीनने आक्रमण सुरू च ठेवले, परंतु भारतीय बचावपटूंनी उत्कृष्ट खेळ करत त्यांचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. या काळात भारतीय संघाने प्रामुख्याने बचावावर लक्ष केंद्रित केले आणि मध्यंतरापर्यंत १-० अशी आघाडी कायम ठेवली. खेळाच्या २८ व्या मिनिटाला, फाउल केल्याबद्दल चीनची खेळाडू वेन डॅन हिलाही 'ग्रीन कार्ड' देण्यात आले.

**भारताने आज एकूण ६ सुवर्णपदके जिंकली**

भारतीय संघाने सामन्यातील एकमेव गोल १० व्या मिनिटाला केला. यानंतर, चिनी संघ पुढील ५० मिनिटे गोल करण्याचा प्रयत्न करत राहिला, पण त्यांना यश आले नाही. अंतिम सामन्यात आघाडी घेतल्यानंतर भारतीय संघाचा बचाव उल्लेखनीय होता. चिनी खेळाडूंनी भारतीय बचाव भेदण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्यांच्या पाठीमागे उभ्या असलेल्या सविताच्या भिंतीला ते पार करू शकले नाहीत. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आजचा दिवस भारतासाठी खूप खास दिवस होता. भारताने आज एकूण ६ सुवर्णपदके जिंकली. भारताने आज एकूण १३ पदके जिंकली. भारताने पदक तालिकेत पाचवे स्थान पटकावले आहे. भारताच्या एकूण पदकांची संख्या आता ७६ झाली आहे.

## मेलोडी चाकलेट्स खा,

बोलले. अन्यथा ३ महिने बोलले असते तर संपूर्ण मुंबई बंद पडली असती. तुमची खुर्ची तर आधीच धोक्यात आहे. तुमच्या खुर्चीचा एक पाय फेव्हिकालचा आहे, तर दुसरा पाय फेव्हिस्टिकने चिकटवलेला आहे. कधी तो खुर्चीचा पाय पडेल आणि तुमची खुर्ची जाईल हे सांगता येत नाही, असा इशारा अभिजीत दिपके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला.

**३ दिवस नाही, ३ महिने जेलमध्ये टाका : अभिजीत दिपकेंची फडणवीसांवर टीका**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्हाला आमची एक विनंती आहे की तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात आणि या महाराष्ट्राला काही वारसा आहे. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा हा महाराष्ट्र आहे. हे तुम्ही विसारले असाल पण आम्ही विसरलो नाही. या महाराष्ट्रात अशा धमक्या दिल्या जात नाहीत. तुम्ही काय बोलले होते, आंदोलन केलं तर जेलमध्ये जावं लागेल. याचा अर्थ आम्हाला जेलमध्ये टाकायचं होतं का? आम्हा सर्वांना जेलमध्ये टाका. देवेंद्र फडणवीस साहेब फक्त ३ दिवस नाही तर ३ महिने जेलमध्ये टाका. जेलमधून बाहेर आल्यानंतर मी पुन्हा ती घोषणा देईन जी तुम्ही द्यायचे. मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, असं म्हणत अभिजीत दिपके यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

## शिवाजी पार्कवरील आंदोलन

परवानगी नसतानाही आंदोलन करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच मोठ्या संख्येने नागरिकांना एकत्र करू न आंदोलन केल्याचा दावाही करण्यात आला आहे.शिवाजी पार्कवर आंदोलनासाठी मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले होते. शिवाजी पार्क मैदानाच्या वापरासाठी मुंबई महापालिकेची परवानगी नसणे, ध्वनिप्रदूषण, वाहतूक कोंडी तसेच परिसरातील रु ग्णालयांकडे जाणा-या रस्त्यांवर परिणाम होण्याची शक्यता पोलिसांनी परवानगी नाकारताना नमूद केली होती. दरम्यान, परवानगी नसताना आंदोलन केल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशांसह महाराष्ट्र सरकारने लागू केलेल्या निर्बंधांचे उल्लंघन झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह विशेष मतदार यादी पुनरावलोकन (SIR) प्रक्रिया रद्द करावी आणि २०२५च्या मतदार यादीच्या आधारे २०२९ची निवडणूक घ्यावी, अशा प्रमुख मागण्या सीजेपीने केल्या आहेत. मुंबईतील आंदोलनानंतर देशातील इतर शहरांमध्येही आंदोलन करण्याची घोषणा पक्षाने केली आहे.

## जगातील सर्वात उंच पुलावरून

उंचीवरील चिनाब पूल आणि भारतातील पहिला केबल-स्टे असलेला अंजी पूल १०० किमी प्रतितास वेगाने पार करू न नवा विक्रम प्रस्थापित केला. यामुळे यूएसबीआरएल प्रकल्पावर रेल्वेगाडीचे संचालन सुलभ होईल, प्रवासाचा वेळ कमी होईल आणि प्रवाशांना जलद, सुरक्षित व आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.

**२ मे पासून वंदे भारत सुरू झाली होती-** जून २०२५ मध्ये काश्मीर रेल्वे लिंकचे काम पूर्ण झाल्यानंतर वंदे भारत एक्सप्रेस सुरुवातीला कटरा आणि श्रीनगरदरम्यान चालवण्यात आली होती. एप्रिल २०२६ मध्ये ती जम्मू तवीपर्यंत वाढवण्यात आली. तसेच ट्रेनमधील डब्यांची संख्या आठवरू न २० करण्यात आली. रेल्वे मंत्रालयानुसार, जम्मू-श्रीनगरदरम्यान नियमित सेवा २ मे रोजी सुरू झाली. रेल्वे मंत्रालयाने ऑगस्टमध्ये सांगितले होते की, आता सुमारे ८१% नेटवर्क ११० किमी प्रतितास किंवा त्याहून अधिक वेगासाठी अपग्रेड करण्यात आले आहे. २०१४ मध्ये हा आकडा सुमारे ४०% होता.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आंदोलन

# दिल्लीत सुमारे 500 जण पोलिसांच्या ताब्यात













**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एकाच ठिकाणी १० किंवा त्याहून अधिक लोकांचा जमाव दिसताच पोलीस त्यांना ताब्यात घेउन आंदोलनाच्या ठिकाणापासून दूर घेउन जात होते. शुक्रवारी जंतर-मंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात निदर्शने करण्यासाठी जमण्याचा प्रयत्न करणा-या सुमारे ५०० जणांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले. पकडलेल्या आंदोलकांना बसमधून वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांत नेण्यात आले. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आतिशी, आम आदमी पार्टीचे (आप) दिल्ली प्रदेशाध्यक्ष सौरभ भारद्वाज, सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव आणि ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (अध्यक्षा नेहा बोरा यांना जंतर-मंतरजवळ ताब्यात घेण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत काँग्रेस आणि 'आयसा' (AISA) चे कार्यकर्ते जंतर-मंतरजवळ एकत्र आले होते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत काँग्रेस आणि आयसा (AISA) चे कार्यकर्ते जंतर-मंतरजवळ एकत्र आले होते. एकाच ठिकाणी १० किंवा त्याहून अधिक लोकांचा जमाव दिसताच पोलीस त्यांना ताब्यात घेउन आंदोलनाच्या ठिकाणापासून दूर घेउन जात होते. एकाच ठिकाणी १० किंवा त्याहून अधिक लोकांचा जमाव दिसताच पोलीस त्यांना ताब्यात घेउन आंदोलनाच्या ठिकाणापासून दूर घेउन जात होते.

ताब्यात घेतलेल्या आंदोलकांना बदरपूर आणि बाह्य उत्तर दिल्ली पोलीस ठाण्यांसह इतर विविध ठिकाणी नेण्यात आले. सध्या आंदोलनाचे मुख्य केंद्र जनपथ परिसर बनले असून, तेथे अजूनही सुमारे ५० ते ६० लोक एकत्र येउन निदर्शने करत आहेत.पोलीस आंदोलकांना पार्लमेंट स्ट्रीट आणि जंतर-मंतर परिसराकडे जाण्यापासून रोखत आहेत. गुरुवारी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणातील (SIR) कथित अनियमिततेच्या निषेधार्थ या निदर्शनांचे आयोजन करण्यात आले होते; मात्र पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारत संपूर्ण मध्य दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. आंदोलकांना घटनास्थळापर्यंत पोहोचण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी जंतर-मंतर परिसरात ठीकठिकाणी बॅरिकेड्स लावून अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. जंतर-मंतरवर आंदोलनाला परवानगी नसल्याने, दिल्ली पोलीस ध्वनिवर्धकांवरून वारंवार घोषणा करून लोकांना गर्दी न करण्याचे आवाहन करत होते. जंतर-मंतरवर आंदोलनाला परवानगी नसल्याने, दिल्ली पोलीस ध्वनिवर्धकांवरून वारंवार घोषणा करून लोकांना गर्दी न करण्याचे आवाहन करत होते. सुरक्षेचा उपाय म्हणून दिल्ली मेट्रोनेही मध्य दिल्लीतील अनेक प्रमुख स्थानकांची प्रवेश व बाहेर पडण्याची दारे तात्पुरती बंद केली होती.

## एसआयआर, ज्ञानेश कुमारांवरून दिल्लीत रणकंदन



**नवी दिल्ली :** मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून विरोधक आक्रमक झाले आहेत. गांधीजयंतीच्या निमित्ताने राजधानी दिल्लीत आम आदमी पक्षाने जंतरमंतर येथे आंदोलनाची हाक दिली होती. मात्र सरकारच्या दबावाखाली पोलिसांनी हे आंदोलन उधळून लावण्याचे प्रयत्न सुरू केले असून आपचे नेते सौरभ भारद्वाज यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. तसेच दिल्लीत कलम १६३ लागू करण्यात आले असून जमावाला एकत्र येण्यास आणि निदर्शने करण्यास बंदी घातली आहे.मतचोरी आणि एसआयआर घोटाळ्यास जबाबदार असलेल्या ज्ञानेश कुमारांना मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून हाकला, तसेच निवडणूक आयोगाच्या कामकाजाची आणि मतदार याद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेची चौकशी व्हावी, या मागण्यांसाठी दिल्लीत इंडिया आघाडीसह विविध विद्यार्थी आणि सामाजिक संघटनांनी आंदोलनाची हाक दिली होती. ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनांनी या आंदोलनाचे आयोजन केले होते. या मोर्चाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली होती, मात्र आंदोलन करण्यावर संघटना ठाम होत्या. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरकडे जाणा-या रस्त्यांवर बॅरिकेड्स लावले. परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला. कलम १६३ अंतर्गत लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे आंदोलनस्थळी जमण्यावर मर्यादा आल्या. यावेळी आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी आंदोलकांना पोलिसांना घाबरू नका असे आवाहन केले. पोलिसांनी लाठीमार केला तरी घाबरू नका, असे ते म्हणाले. याच दरम्यान पोलिसांनी सौरभ भारद्वाज यांच्यासह आपचे अन्य नेते आणि आंदोलकांना जंतरमंतर परिसरातून हटवले. पक्षाचे नेते संजीव झा यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. भारद्वाज यांनी बसमधून एक व्हीडीओ शेअर केला. त्यामध्ये अनेक आंदोलक बसमध्ये बसलेले असून पोलिस कर्मचारीही दिसत आहेत.

**१२ मेट्रो स्थानकं बंद- आंदोलनस्थळी गर्दी जमू नये म्हणून दिल्लीतील मेट्रो स्थानकंही बंद करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रो क?र्पोरेशनने ११ मेट्रो स्थानकं पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आल्याची माहिती दिली आहे. जनपथ, पटेल चौक, केंद्रीय सचिवालय, राजीव चौक, सेवा तीर्थ, मंडी हाउस, लोक कल्याण मार्ग, आयएनए, चावडी बाजार, रामकृष्ण आश्रम मार्ग आणि नवी दिल्ली ही मेट्रो स्थानकं बंद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असून पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागत आहे.**

## ओळख पटवून वगळलेल्या मतदारांची नव्याने नोंद करणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेदरम्यान (एसआयआर) १३ कोटीहून अधिक मतदारांची नावे प्रारुप मसुदा मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. याविरोधात इंडिया आघाडीने देशभरात आंदोलनाची घोषणा केली आहे. याचा धसका घेत केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे.




एसआयआरची प्रक्रिया पूर्ण झालेल्या २० राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीतून वगळलेल्या पात्र मतदारांचा शोध घेण्यासाठी विशेष अभियान राबविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. या अभियानांतर्गत वगळलेल्या मतदारांची ओळख पटवून त्यांना पुन्हा मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी घरोघरी जाउन पडताळणी करण्यासह नव्याने नोंदणीसाठीचा अर्ज भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कोट्यवधी वैध मतदारांना दिलासा मिळाला आहे.निवडणूक आयोगाने २९ सप्टेंबर रोजी सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिका-यांना पत्र पाठवून हे निर्देश दिले. गुरुवारी झालेल्या व्हीडीओ क?न्फरन्समध्येही या अभियानाबाबत सूचना देण्यात आल्या. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मतदार नोंदणी अधिका-यांनी या मोहिमेची अंमलबजावणी करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान प्रारूप मसुदा मतदार याद्यांमधून सुमारे १३ कोटी नावे वगळण्यात आल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रक्रियेत पात्र मतदारांची नावेही वगळली गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. याविरोधात विरोधकांनीही सातत्याने आवाज उठवत एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची आणि नव्याने राबवण्याची मागणी केली होती. तसेच या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची घोषणाही करण्यात आली.

## तमिळनाडूत महामार्गाच्या फलकावर हिंदी लिहिल्याने २ अधिकारी निलंबित

**चेन्नई :** तमिळनाडू सरकारने शुक्रवारी राष्ट्रीय महामार्गाच्या फलकांवर हिंदी लिहिल्याप्रकरणी दोन सहायक अभियंत्यांना निलंबित केले.हे प्रकरण तुत्तुकुडी



जिल्ह्यातील सत्तानकुलम-नाझरेथ राज्य महामार्गाशी संबंधित आहे. येथे नव्या फलकांवर तमिळ आणि इंग्रजीसोबतच शहरांची नावे हिंदीतही लिहिण्यात आली होती. तमिळनाडू सरकारच्या मते, हे राज्याच्या द्विभाषिक धोरणाचे उल्लंघन आहे. हिंदी मजकूर हटवण्यासोबतच दोन्ही अधिका-यांविरुद्ध विभागीय कारवाई सुरू करण्यात आली आहे. तामिळनाडूमध्ये दीर्घकाळापासून द्विभाषिक सूत्राचे धोरण लागू आहे. याअंतर्गत सरकारी कामकाज आणि शिक्षणात तमिळ व इंग्रजीचा वापर केला जातो. राज्य सरकार हिंदीचा समावेश असलेल्या त्रिभाषिक धोरणाला विरोध करत आले आहे. तामिळनाडूच्या भाषा धोरणाचा आधार १९५६ चा तामिळनाडू अधिकृत भाषा अधिनियम आहे, ज्यामध्ये तमिळला राज्याची अधिकृत भाषा बनवण्यात आले. १९६५ च्या हिंदीविरोधी आंदोलनानंतर १९६८ मध्ये तत्कालीन मद्रास विधानसभेने त्रिभाषिक सूत्र नाकारून तमिळ आणि इंग्रजीला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला.

## पुण्यात एमपीएससी आंदोलनात पत्रकाराला मारहाण

**पुणे :** एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे पत्रकार निखील सुक्रे यांना एका व्यक्तीने मारहाण आणि शिवीगाळ केल्याची तक्रार विश्रामबाग पोलिसांकडे करण्यात आली आहे. आमदार रोहित पवार विद्यार्थ्यांशी चर्चा करत असताना हा प्रकार घडला. मारहाण करणारा तरुण मद्यधुंद अवस्थेत होता आणि तो अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला.त्याला मुद्दाम आंदोलनात घुसवण्यात आल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली. संबंधित तरुणाला तत्काळ अटक करण्याची मागणी पोलिस आयुक्तांकडे केल्याचे पवार यांनी सांगितले. त्याला ताब्यात घेतल्याची माहिती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र, त्याच्या संघटनात्मक संबंधांबाबत आणि पोलिसांच्या कारवाईबाबत स्वतंत्र पुष्टी उपलब्ध नाही.विद्यार्थ्यांच्या आंदोलनात घुसून माध्यम प्रतिनिधींना मारहाण करण्याच्या प्रकाराचा पवार यांनी निषेध केला. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांवरील असा हल्ला निषेधार्ह असल्याचे त्यांनी म्हटले. या घटनेप्रकरणी विशाल तांबे यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात निवेदन दिले. संबंधित व्यक्ती बाहेरून आली होती आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन बदनाम करण्याच्या उद्देशाने तिने जाणूनबुजून मारहाण केली, असा आरोप त्यांनी केला. पोलिसांनी घटनेची चौकशी करून संबंधित व्यक्तीला अटक करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पाक घुसखोरीचा कट उधळला

**नवी दिल्ली :** बीएसएफने पंजाबच्या तरनतारन सेक्टरमध्ये भारत-पाकिस्तान सीमेवर घुसखोरीचा एक प्रयत्न हाणून पाडला. बीएसएफच्या माहितीनुसार, पाकिस्तानमधील काही व्यक्ती बेकायदेशीरपणे भारतीय सीमेत घुसण्याचा प्रयत्न करत होते. सुरक्षा यंत्रणांनी सुरुवातीला इशारा दिला, परंतु घुसखोरांनी पुढे सरकणे सुरूच ठेवले. त्यानंतर सुरक्षा दलांनी कारवाई करून दोन घुसखोरांना ठार केले.ही घटना तरनतारनच्या बीओपी राजोके परिसरात मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली.



बीएसएफच्या माहितीनुसार, पाकिस्तानी बाजूच्या चट्टनवाले भागातून किमान तीन व्यक्ती भारतीय सीमेकडे जात होत्या. त्यांना आव्हान देउन त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. या कारवाईत दोन घुसखोर ठार झाले. बीएसएफच्या माहितीनुसार, गोळीबारादरम्यान आणखी एक घुसखोर पळून पाकिस्तानात परत गेला. एकुण तीन जण भारतीय सीमेत घुसण्याचा प्रयत्न करत होते, परंतु सुरक्षा दलांनी कारवाई केल्यानंतर दोघे ठार झाले, तर तिसरा परत गेला. पंजाब सेक्टरमधील भारत-पाकिस्तान सीमेवरील सुरक्षा यंत्रणा घुसखोरीच्या प्रयत्नांबाबत सतर्क आहेत.

## *मेणामध्ये सोन्याची पावडर, 23 कॅप्सूल्स शरीरात लपवून सोन्याची तस्करी, किंमत तब्बल 13 कोटी*

### सोन्यासह हि-यांच्या तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त

**मुंबई** -मुंबईत आज महसूल गुप्तचर संचालनालय ने मोठी कारवाई केली आहे. मुंबईत सोने आणि हि-यांच्या तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात आलं आहे. ऑपरेशन कॅरेट नेक्सस अंतर्गत मुंबई DRI ने कारवाई केली आहे. मुंबई विमानतळावरून ८.५६४ किलो २४ कॅरेट सोन्याची पावडर जप्त करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत अंदाजे १२.६४ कोटी रुपये असल्याची माहिती मिळत आहे.



**११६८.९७ कॅरेट नैसर्गिक आणि लॅब-ग्रोन् हिरे जप्त-** मिळालेल्या माहितीनुसार, ११६८.९७ कॅरेट नैसर्गिक आणि लॅब-ग्रोन् हिरे जप्त करण्यात आले आहेत. त्याची किंमत अंदाजे १ कोटी ९ लाख रुपये आहे. सोने आणि हि-यांची एकूण किंमत सुमारे १३ कोटी ७३ लाख रुपयांची आहे. या प्रकरणी आंतरराष्ट्रीय तस्करी रॅकेटमधील ८ जणांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींमध्ये विमानतळ कर्मचारी, ६ आंतरराष्ट्रीय ट्रान्झिट प्रवासी आणि १ भारतीय प्रवाशाचा समावेश आहे. तर ४ बांगलादेशी आणि २ श्रीलंकन प्रवाशांकडून सोन्याची तस्करी करण्यात येत असल्याचं समोर आलं आहे. दरम्यान, या कारवाईमुळं मोठी खळबळ उडाली आहे. तब्बल १३ कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी पुढील कार्यवाही सुरु केली आहे. दुबई, दोहा, जेद्दा आणि फुजैराहून आलेल्या प्रवाशांना ऋडक्ष ने पकडलं आहे. मेणामध्ये सोन्याची पावडर भरुन २३ कॅप्सूलद्वारे शरीरात लपवून सोन्याची तस्करी करण्यात आली होती. विमानतळ कर्मचा-याच्या माध्यमातून सोनं भारतात आणण्याचा आणि हिरे दुबईला पाठवण्याचा प्रकार उघड झाला आहे. विमानतळातील इनसाइडर नेटवर्कचा वापर करून दोन दिशेने तस्करी केल्याचा DRI ने खुलासा केला आहे.

**भारतात सोन्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ-**भारतात सोन्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वाढत्या दरामुळं ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसताना दिसत आहे. परिणामी ग्राहकांनी सोन्या चांदीच्या ख?ेदीकडे पाठ फिरवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोन्या चांदीच्या दरात झालेली भरमसाठ वाढ आणि शासनाने सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरुन १५ टक्के केल्यामुळं देशात सोन्याच्या तस्करीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचं चित्र पाहयला मिळत आहे. कायदेशीर मार्गाने सोने आणणे महाग झाल्याने तस्करांना अवैध मार्गाने सोने आणण्यात मोठा नफा दिसू लागला आहे. दरम्यान, पोलीस प्रशासन अशा घटना घडू नये म्हणून सतर्क आहे. अनेक ठिकाणी कारवाई केल्याचे दिसून येत आहे.

## 'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास आता 'ऑनलाइन'

### एसटीचा प्रवास अधिक सुलभ

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेतील पास आता ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रवाशांना आगारात जाउन हस्तलिखित पद्धतीने पास काढण्याची आवश्यकता राहणार नसून, घरबसल्या ऑनलाइन पास मिळवता येणार आहे. एसटी महामंडळाच्या वाहतूक विभागाने २९ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, या योजनेअंतर्गत देण्यात येणा-या ४ व ७ दिवसांच्या पाससाठी ऑनलाइन कार्यप्रणाली सुरू करण्यात आली आहे. महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच मोबाईल अप्लिकेशन मध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन पास काढताना प्रवाशांना आवश्यक माहिती भरल्यानंतर नियमानुसार पास उपलब्ध होणार आहे. प्रवाशाला प्राप्त झालेला पास प्रिंट स्वरूपात किंवा मोबाईलमध्ये घ्क़्क़ स्वरूपात दाखवता येणार आहे. त्यामुळे पास खरेदीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ होणार आहे. ऑनलाइन पद्धतीने मिळालेल्या पासवर QR कोड देण्यात येणार आहे. प्रवासाच्या वेळी वाहकाकडील ईटीआयएम मशीनद्वारे हा QR कोड स्कॅन केला जाईल. QR कोड स्कॅन केल्यानंतर प्रवाशाचे नाव, पासचा प्रकार, पासची वैधता व इतर आवश्यक माहिती ईटीआयएम मशीनवर प्रदर्शित होणार आहे. तसेच प्रवाशाने दाखविलेल्या ओळखपत्राचीही पडताळणी करण्यात येणार असून, त्यानंतरच संबंधित प्रवाशाला प्रवासाची परवानगी दिली जाईल. ॅनलाइन पास सुविधेमुळे प्रवाशांना आगारात रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार असून, विशेषत? सुट्टीच्या काळात आणि पर्यटनाच्या हंगामात पास काढणे अधिक सोपे होणार आहे. आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेचे डिजिटल रूपांतर करत एसटी महामंडळाने प्रवाशांच्या हातातच पासची सुविधा उपलब्ध करून दिल्याने एसटी प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

## ज्ञानेश कुमारचे जुने प्रकरण उघडकीस

**कोच्ची :** मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार याद्यांची एसआयआर प्रक्रिया स्थगित करण्यासाठी विरोधक एकत्र आले आहेत. देशभरातून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जातेय. अशातच आयुक्तज्ञानेश कुमार यांच्याशी संबंधित जवळपास २० वर्षे जुने प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. केरळच्या गृह विभागाने २००६ मध्ये ज्ञानेश कुमार हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव असताना झालेल्या चौकशीशी संबंधित फाइल्स मागवल्या आहेत.

हे प्रकरण मलेशियातील इंजिनिअर ली सी बीन यांच्या मृत्यूशी संबंधित आहे. ली सी बीन हे पाथी बेल या भारत-मलेशिया संयुक्त कंपनीचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक होते. केरळ स्टेट ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टअंतर्गत एमसी रोडच्या विकासाचे काम या कंपनीकडे होते. २००६ मध्ये ली सी बीन यांनी क्वालालंपूरमध्ये आत्महत्या केली होती. प्रकल्पाचे रखडलेले बिल आणि सरकारी अधिका-यांकडून येणा-या अडचणींमुळे ते त्रस्त असल्याचे त्यावेळी समोर आले होते. ली सी बीन यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या कथित सुसाइड नोटमध्ये केरळमधील काही सरकारी अधिका-यांवर गंभीर आरोप करण्यात आले होते. त्यात ज्ञानेश कुमार यांच्या नावाचाही उल्लेख असल्याचे नंतर समोर आले.

## 'समृद्धी' की मृत्यूमार्ग? साडेतीन वर्षांत 572 बळी;

# समृद्धी महामार्गावर 8 महिन्यांत घडले 142 अपघात

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई ते नागपूर दरम्यानचा प्रवास अतिशय जलद, आरामदायी आणि सुरक्षित व्हावा या उद्देशाने डिसेंबर २०२२ पासून टप्प्याटप्प्याने वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला ७०१ किलोमीटरचा 'समृद्धी महामार्ग' आता नागरिकांसाठी भीतीचा मार्ग ठरत आहे. प्रवासाचा वेळ वाचवणा-या या महामार्गावर गेल्या साडेतीन वर्षांत अपघातांचे भीषण सत्र सुरूच असून शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.अतिवेग, चालकाला येणारा थकवा आणि नियमांचे उल्लंघन यामुळे या महामार्गावर होणा-या प्राणघातक अपघातांची आकडेवारी अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक समोर आली आहे.माहिती अधिकार आणि पोलिसांच्या अधिकृत आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२२ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातांमध्ये तब्बल ५७२ जणांनी आपला जीव गमावला आहे.

**२०२४ मधील स्थिती** : २०२४ या संपूर्ण वर्षात १३७ अपघातांची नोंद झाली असून १२६ प्रवाशांचा मृत्यू झाला होता.

**२०२५ मधील आकडेवारी** : २०२५ मध्ये अपघातांची संख्या वाढून १८५ वर पोहोचली आणि तब्बल १५२ जणांचा मृत्यू झाला.

**२०२६ मधील भयानक वास्तव** : २०२६ या वर्षातील जानेवारी ते ऑगस्ट या अवघ्या ८ महिन्यांत १४२ अपघात झाले असून १२८ जणांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे अवघ्या ८ महिन्यांतील




हा मृतांचा आकडा २०२४ च्या संपूर्ण वर्षातील मृतांपेक्षाही जास्त आहे.नुकताच धामणगाव रेल्वेजवळ घडलेला अपघात याचे ताजे उदाहरण आहे. शेगाव येथून देवीची मूर्ती घेउन वर्धाकडे परतणा-या वाहनाला मागून येणा-या कंटेनरने जोरदार धडक दिल्याने ७ जणांचा जागीच मृत्यू झाला.

यापूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळखुटा येथे घडलेल्या बस अपघातात अनेक प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला होता. अशा वारंवार घडणा-या घटनांमुळे समृद्धी महामार्गाच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**अपघातांची मुख्य कारणे कोणती?**

तज्ज्ञ आणि विविध अहवालांनुसार केवळ चालकाची चूक हे अपघाताचे एकमेव कारण नसून इतरही अनेक तांत्रिक व मानसिक बाबी याला कारणीभूत आहेत,

**हायवे हिप्नोसिस** : लांब आणि सरळ रस्त्यावर सतत एकाच वेगात गाडी चालवल्यामुळे चालकाची सतर्कता कमी होते आणि त्याला डुलकी येते.

**लेन शिस्तीचा अभाव :** अवजड वाहने (ट्रक, कंटेनर) अचानक लेन बदलतात किंवा रस्त्यावर उभी केली जातात, ज्यामुळे मागून वेगात येणा-या वाहनांना ब्रेक दाबण्यासाठी वेळ मिळत नाही.

**अतिवेग अन् थकवा :** मर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालवणे आणि पुरेशी विश्रांती न घेता प्रवास करणे अपघातास निमंत्रण ठरत आहे.

**कागदावरील योजना की प्रत्यक्ष सुरक्षा?-**शासनाकडून समृद्धी महामार्गावर 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' बसवण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, केवळ तंत्रज्ञान बसवून चालणार नाही, तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम अपघातांची संख्या कमी होण्यात दिसला पाहिजे. प्रत्येक मोठ्या अपघातानंतर केवळ पंचनामे आणि मदतीच्या घोषणा करण्याऐवजी महामार्गाचे 'इंडिपेंडंट सेफ्टी ऑडिट' करण्याची मागणी आता जोर धरत आहे. समृद्धी महामार्ग वेगाचे प्रतीक असावा, भीतीचा नाही; त्यामुळे प्रशासनाने तातडीने कठोर सुरक्षा उपाययोजना लागू करण्याची गरज आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## टळलेला अनर्थ

नागरी विमान वाहतूक विश्वात सुरक्षिततेची अखेरची अभेद्य तटबंदी म्हणून ज्या रचनेकडे पाहिले जाते, ती म्हणजे विमानातील 'कॉकपिट'चा चिलखती पोलादी दरवाजा. अमेरिकेवरील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर बाहेरील कोणताही उपद्रवी, अपहरणकर्ता, हल्लेखोर अथवा समाजकंटक चालकाच्या आसनापर्यंत पोहोचता कामा नये, या उद्देशाने विमानांच्या कॉकपिटचे दरवाजे बुलेटप्रूफ, कोड क्रमांकाशिवाय न उघडणारे आणि पूर्णपणे अभेद्य करण्यात आले. परंतु, ज्या वैमानिकांवर आणि त्यांच्या विवेकावर शेकडो निष्पाप जीवांची मदार सोपवलेली असते, त्यापैकीच एकाच्या मनात क्रूर भावना निर्माण झाली तर काय होऊ शकते याचा रक्तरंजित आणि थरकाप उडवणारा अनुभव नुकताच जगाने पाहिला. दुबईहून तेल अवीवच्या दिशेने झेपावलेल्या विमानामध्ये ३० हजार फूट उंचीवर जे काही घडले, त्याने आंतरराष्ट्रीय नागरी विमान सुरक्षेच्या चौकटीला मोठा छेद दिला.अहमदाबादमधील भीषण विमान अपघात लोकमनातून पुसला गेलेला नाही. विविध कंपन्यांच्या प्रवासी विमानांमध्ये उड्डाणादरम्यान तांत्रिक दोष निर्माण होणे, हवेत इंजिन बंद पडणे, टर्ब्युलन्स अथवा हायड्रॉलिक प्रणाली निकामी झाल्यामुळे इमर्जन्सी लँडिंग या घडामोडी नियमित बनल्या आहेत. ताज्या घटनेने तांत्रिक दोषांपलीकडचे मानवी मानसिकतेचे अतिशय धोकादायक वास्तव समोर आणले. फ्लायदुबईच्या विमानातील घटना दोन वैमानिकांमधील वादंग किंवा वैयक्तिक हेवेदाव्यांचा संघर्ष नव्हता. सुमारे १७५ प्रवाशांना घेऊन चाललेले विमान जमिनीवर वेगाने आदळवून सर्वांचा एकत्रित बळी घेण्याचा विघातक कट होता, असे समोर आले आहे. या थरारात स्मित मच्छार या भारतीय वैमानिकाने दाखवलेला अद्वितीय निर्धार, असीम धैर्य आणि अभूतपूर्व प्रसंगावधान विमान वाहतुकीच्या आणि मानवी इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले जावे असेच आहे. विमान नियमित उंचीवर स्थिर असताना, अचानक सहवैमानिकाच्या मनात विकृती संचारली. त्याने मुख्य वैमानिकावर प्राणघातक हल्ला चढवला. कॉकपिटमधील काही चौरस फुटांच्या चिंचोळ्या जागेत हालचालींनाही मर्यादा असतात.अशा ठिकाणी या अनपेक्षित हल्ल्यात भारतीय वैमानिक गंभीर जखमी झाला. हल्लेखोराने ते महाकाय विमान वेगाने हजारो फूट जमिनीच्या दिशेने नेले.प्रवाशांसाठी तो काळजाचा ठोका चुकवणारा क्षण होता.अशा जीवघेण्या परिस्थितीत, रक्ताच्या थारोळ्यात पडलेले असतानाही, स्मित यांनी केवळ स्वतःचा जीव वाचवण्याचा विचार केला नाही. विमानातील पावणेदोनशे प्रवाशांची जबाबदारी आपल्यावर आहे, याचे विवेकभान ठेवून त्यांनी हा अनर्थ टाळला. प्रचंड संघर्ष करत या शूर वैमानिकाने हल्लेखोर सहवैमानिकाशी प्रतिकार चालू ठेवला. विमानाचे सुकाणू पूर्णपणे त्याच्या नियंत्रणात जाऊ न देता धाडसाने आपत्कालीन संदेश यंत्रणेचा वापर केला.आधी धोक्याचा सामान्य संदेश आणि पाठोपाठ बेकायदेशीर हस्तक्षेप अथवा विमानाचे अपहरण दर्शवणारा आंतरराष्ट्रीय पातळीवरील धोक्याचा '७५००' हा कोड संदेश रडारवर प्रसारित केला.भीषण झटापटीत स्मित यांनी कॉकपिटचा बंदिस्त दरवाजा बाहेरून उघडता येईल, अशी कळ दाबली. त्यामुळे केबिन कर्मचारी आणि धाडसी प्रवासी आत घुसले आणि त्यांनी माथेफिरू हल्लेखोराला जखडले. विमानात उपस्थित पर्यायी वैमानिक पथकाने तत्काळ सूत्रे हाती घेऊन विमानाचा मार्ग बदलला आणि सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर ते सुखरूप उतरवले. अंगभूत शौर्य, साहस असणे आणि बिकट प्रसंगी त्याचा कौशल्यपूर्ण वापर करणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. यातील दुसरी बाब अधिक महत्त्वाची ठरते आणि तीच या भारतीय वैमानिकाने दाखवल्याने सर्व प्रवाशांच्या चेहऱ्यावर मरणाच्या दारातून परतल्याचे ?'स्मित?' उमलले.जगभरातून या वैमानिकावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. पण या घटनेने विमान वाहतूक विश्वापुढे निर्माण केलेले मूलभूत आणि गंभीर प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाही. गेल्या दोन दशकांत आपण विमानाचे कॉकपिट बाहेरील जगासाठी अभेद्य केले, पण आतील चालकांची माथी भडकल्यास काय होऊ शकते, या संभाव्य धोक्याचा कोणताही विचार जागतिक सुरक्षा प्रणालीने केलेला दिसत नाही.ताज्या घटनेत भारतीय वैमानिकाने दरवाजा उघडण्याची व्यवस्था केली म्हणून प्रवासी बचावले. पण दरवाजा उघडणे शक्य झाले नसते, तर कॉकपिट सुरक्षेची रचना एकतर्फी विश्वासावर आधारलेली आहे. वैमानिकाची निवड करताना तांत्रिक क्षमता,विमानाचे उड्डाण, लँडिंगचे कौशल्य, सिम्युलेटरवरील अचूकता पाहिली जाते. मात्र, त्यांच्या मानसिक स्थितीचे काय? विमान कंपन्यांमधील स्पर्धा, वैमानिकांचे व्यस्त वेळापत्रक, अपुरी झोप, उड्डाणांचे विचित्र तास, ताणतणाव, मानसिक आरोग्य, व्यसनाधीनता याचे भेदक वास्तव सातत्याने समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी झ्युरिख-दिल्ली एअर इंडिया फ्लाईटचा एक पायलट उड्डाणापूर्वी मद्यधुंद अवस्थेत आढळला. आंतरिक सुरक्षा यंत्रणेच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला; पण अशा घटना विमान वाहतुकीच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. त्यामुळे वैमानिकांची पार्श्वभूमी तपासणे ही कागदी औपचारिकता बनून चालणार नाही. नियमित वैद्यकीय तपासणी, अमली पदार्थ किंवा मद्यपानाची चाचणी तसेच वैमानिकांचे मानसिक आणि वर्तणूक परीक्षणही काटेकोरपणे वेळोवेळी होणे गरजेचे आहे. विमान कंपन्यांमध्ये अशी गोपनीय आणि विश्वासार्ह समुपदेशन व्यवस्था हवी, जिथे कोणतीही भीती न बाळगता वैमानिक मनातील नैराश्य, ताण किंवा वैयक्तिक संकटांबद्दल मन मोकळे करू शकतील.मानसिक विकृती किंवा अनियंत्रित रागाच्या सूक्ष्म लक्षणांची वेळीच दखल घेणारी यंत्रणा कार्यरत नसेल, तर कॉकपिटमध्ये बसलेला प्रत्येक असंतुलित माणूस हा चालता-बोलता टाईम बॉम्ब ठरू शकतो. कॉकपिटमध्ये दोन चालकांत हिंसक झटापट सुरू झाली, तर केबिन कर्मचाऱ्यांनी नक्की काय करावे, आत कसा प्रवेश मिळवावा, विमान नियंत्रणात ठेवण्यासाठी तिसरा सुरक्षित मार्ग कोणता असावा, याचे ठोस आणि स्पष्ट नियम आवश्यक आहेत.कर्मचाऱ्यांना त्याचे नियमित प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले पाहिजे. विमानतळांवर प्रवाशांकडून नेल कटरसुद्धा जप्त केले जात असताना, कॉकपिटमध्ये आधीच एक धारदार कुऱ्हाड असणे ही बाब गंभीर आहे. केवळ बाह्य धोक्यांकडे लक्ष देत राहून आतील धोक्यांकडे डोळेझाक करण्याचे धोरण बदलावे लागेल. भारतीय वैमानिकाने असीम शौर्याने केलेला बचाव निःसंकोचपणे अभिमानास्पद असला, तरी तो जागतिक विमान वाहतूक व्यवस्थेला मिळालेला अखेरचा धोक्याचा इशारा आहे. आंतरराष्ट्रीय नियामकांनी यातून बोध घेऊन तातडीने कॉकपिट सुरक्षेचे नवे, सर्वसमावेशक निकष लागू केले नाहीत, तर काल टळलेला अनर्थ भविष्यात घडण्याचा धोका आहे.

# दुष्काळ निवारणाला द्या नवा आयाम

**दुष्काळाची घोषणा ही प्रशासनाची प्रक्रिया असू शकते; मात्र दुष्काळाची तीव्रता कमी करणे ही शासन, समाज आणि शेतकरी या तिघांची सामूहिक जबाबदारी आहे. महाराष्ट्राच्या भविष्यातील जलसुरक्षेची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.**



यावर्षी पाऊसमान कमी असल्याने शेतीच्या पातळीवर 'पाणी उपलब्ध असेल तर पीक' या जुन्या समीकरणाऐवजी 'उपलब्ध पाण्यानुसार पीक' हे तत्त्व स्वीकारावे लागेल. दुष्काळग्रस्त तालुक्यांत रब्बी हंगामासाठी उपलब्ध पाण्याचे वस्तुनिष्ठ आकलन करून पीकनियोजन करणे आवश्यक आहे. कमी पाण्यात येणारी पिके, ठिबक व तुषार सिंचन, मृदा-आर्द्रता संवर्धन, आच्छादन, पिकांची विविधता आणि पेरणीच्या कालावधीचे नियोजन यामुळे जोखीम कमी करता येते. मात्र शेतकऱ्याला केवळ 'कमी पाण्याचे पीक घ्या' असा सल्ला देणे अन्यायकारक ठरेल. पीक बदलाला बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, साठवणूक, विमा आणि योग्य किंमत यांची साथ मिळाली पाहिजे. सिंचन व्यवस्थेतील कार्यक्षमतेचा प्रश्नही आता टाळता येणार नाही. महाराष्ट्राच्या सिंचन व्यवस्थेवर नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या कामगिरी लेखापरीक्षणात २०११-१२ मध्ये निर्माण केलेल्या ४८.२६ लाख हेक्टर सिंचन क्षमतेपैकी प्रत्यक्ष वापर ३२.५१ लाख हेक्टर, म्हणजे सुमारे ६७.३६ टक्के असल्याचे नोंदविले होते. हा जुना आकडा असला, तरी तो एक मूलभूत प्रश्न उपस्थित करतो - नवी सिंचनक्षमता निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध क्षमतेचा पूर्ण आणि कार्यक्षम वापर आपण कितपत करतो? म्हणूनच भविष्यातील जलनियोजनात 'नवे प्रकल्प किती?' या प्रश्नाबरोबर 'उपलब्ध पाण्याचा प्रत्यक्ष परिणाम किती?' हा प्रश्न विचारला पाहिजे. कालव्यांची गळती, वितरणातील असमानता, शेवटच्या शेतापर्यंत पाणी पोहोचण्याची क्षमता, सूक्ष्म सिंचनाचा वापर आणि प्रतिघनमीटर पाण्यामागे मिळणारे उत्पादन यांचे नियमित मूल्यमापन आवश्यक आहे.

जलसंधारणाच्या कामांबाबतही बंधारे, नाले, शेततळी, जलयुक्त कामे यांची संख्या सांगणे सोपे आहे; पण त्यातून प्रत्यक्ष किती पाणी साठले, किती भूजल वाढले, किती विहिरी टिकल्या आणि किती क्षेत्राला लाभ झाला हे सांगणे अधिक महत्त्वाचे आहे. निधी खर्च झाला म्हणजे जलसुरक्षा निर्माण झाली, असे समीकरण स्वीकारता येणार नाही. जलसंधारणाच्या प्रत्येक कामाचे परिणामाधारित मूल्यमापन झाले पाहिजे. तंत्रज्ञान या परिवर्तनाचा महत्त्वाचा आधार बनू शकते. उपग्रह प्रतिमा, पर्जन्यमान, मृदा-आर्द्रता, भूजलपातळी, पीकस्थिती आणि हवामान अंदाज यांचा एकत्रित वापर करून गावनिहाय दुष्काळजोखीम नकाशे तयार करता येतील. महाराष्ट्रात भूजल दुष्काळ निर्देशांक आणि पाणीटंचाईचे विविध अहवाल उपलब्ध आहेत. या माहितीला महसूल, कृषी, जलसंपदा आणि ग्रामपंचायत पातळीवरील माहितीशी जोडल्यास 'पूर्वसूचना-पूर्वकृती' अशी नवी व्यवस्था निर्माण करता येऊ शकते. दुष्काळाचा प्रश्न केवळ सरकारचा नाही. शेतकऱ्यांनी पाण्याचा कार्यक्षम वापर, पीकनियोजन आणि सामुदायिक जलव्यवस्थापन स्वीकारणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींनी गावाचा जलहिशेब सार्वजनिक करावा. स्वयंसेवी संस्थांनी तात्पुरते अन्न किंवा पाणी वाटण्यापेक्षा जलस्रोतांचे पुनर्भरण, चारा बँका, पशुधन संरक्षण आणि रोजगाराशी संबंधित कामांना हातभार लावावा.

उत्तरार्ध

पशुधनाचा प्रश्नही दुष्काळाच्या चर्चेत अनेकदा दुय्यम ठरतो. परंतु ग्रामीण कुटुंबांसाठी जनावरे ही संपत्ती, उत्पन्नाचे साधन आणि आर्थिक सुरक्षिततेचा आधार असतात. चारा-पाण्याची कमतरता निर्माण झाली तर शेतकऱ्यांना जनावरे कमी किमतीत विकण्यास किंवा स्थलांतर करण्यास भाग पडू शकते. त्यामुळे चारा छावणी हा अंतिम टप्प्यातील उपाय न राहता चारा उपलब्धता, चारा बँक, स्थानिक उत्पादन आणि वाहतूक यांचे पूर्वनियोजन आवश्यक आहे. पिकांचे नुकसान मोजताना पशुधनावरील अप्रत्यक्ष परिणामाचाही विचार झाला पाहिजे. याचबरोबर ग्रामीण रोजगाराचा प्रश्न येतो. खरीप पिकांचे नुकसान झाले आणि रब्बीची पेरणी मर्यादित राहिली तर कृषी मजुरांसाठी कामाची उपलब्धता कमी होऊ शकते. त्यामुळे रोजगार हमीची कामे केवळ तात्पुरते उत्पन्न देणारी नसून जलसंधारण, मृदासंवर्धन, नाला खोलीकरण, चरनिर्मिती आणि स्थानिक जलस्रोतांच्या पुनर्भरणाशी जोडली गेली तर त्याचा दुहेरी फायदा होईल. आज निर्माण झालेले रोजगार उद्याच्या जलसुरक्षेत रूपांतरित झाले पाहिजेत.

### एकात्मिक दृष्टिकोन

दुष्काळ आणि अतिवृष्टी यांना स्वतंत्र संकटे मानण्याची पद्धतही बदलण्याची वेळ आली आहे. एका काळात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते आणि काही आठवड्यांनी प्रदीर्घ पर्जन्यखंडामुळे त्याच प्रदेशात पाणीटंचाई निर्माण होते. ही विसंगती जलचक्राच्या व्यवस्थापनातील अपुरेपणा दाखवते. 'पूर आला की पाणी बाहेर काढायचे आणि दुष्काळ आला की पाणी शोधायचे' या प्रतिक्रियात्मक पद्धतीऐवजी पाणी जास्त असताना ते सुरक्षितपणे साठवणे आणि कमी असताना त्याचा कार्यक्षम वापर करणे, या एकात्मिक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. आज २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाले आहेत. ही संख्या प्रशासनासाठी मदतीचा आवाका दर्शवते; पण धोरणकर्त्यांसाठी ती इशाऱ्याची घंटा आहे. पुढील काही महिन्यांत पिण्याचे पाणी, चारा, रब्बी हंगाम, ग्रामीण रोजगार, कर्ज आणि भूजल यांपैकी कोणताही प्रश्न स्वतंत्र राहणार नाही. एका क्षेत्रातील संकट दुसऱ्या क्षेत्रावर परिणाम करणार आहे. म्हणूनच जिल्हानिहाय नव्हे, तर जलस्रोत-शेती-पशुधन-रोजगार-ग्रामीण अर्थव्यवस्था अशा परस्परसंबंधित चौकटीत दुष्काळ व्यवस्थापन करावे लागेल.

दुष्काळ निवारणाचे अंतिम मोजमापही बदलावे लागेल. किती कोटी रुपये खर्च झाले, किती टँकर पाठविले, किती पंचनामे झाले किंवा किती सवलती जाहीर झाल्या यापेक्षा किती नुकसान टाळले गेले, किती गावे टँकरमुक्त राहिली, भूजलपातळी किती स्थिर राहिली, किती पशुधन सुरक्षित राहिले, किती शेतकऱ्यांचे उत्पन्न टिकले आणि किती कुटुंबांचे स्थलांतर रोखता आले, हे निकष महत्त्वाचे ठरतील. आपत्ती व्यवस्थापनाला 'निधी वितरण'कडून 'जोखीम कमी करणे'कडे वळविणे हाच या संकटाचा मोठा धडा आहे. दुष्काळ हा महाराष्ट्राच्या नियतीचा भाग नाही; पण पाण्याचे असमान वितरण, भूजलावरील वाढते अवलंबित्व, पिकांची पाण्याशी विसंगत निवड, अपुरी जलसंधारण कार्यक्षमता आणि बदलते हवामान यामुळे तो अधिक तीव्र होऊ शकतो. त्यामुळे 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' ही घोषणा करण्यापेक्षा 'दुष्काळप्रतिरोधक महाराष्ट्र' निर्माण करणे अधिक वास्तववादी उद्दिष्ट आहे. त्यासाठी दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदत देणाऱ्या यंत्रणेबरोबरच दुष्काळ जाहीर होण्यापूर्वी संकट ओळखणारी आणि त्यावर कृती करणारी यंत्रणा उभी करावी लागेल. आजची २६५ तालुक्यांची आकडेवारी उद्याच्या महाराष्ट्राचे भविष्य ठरवणारी ठरू नये. म्हणूनच 'अरिष्टाची पहिली कळ' ऐकू आली आहे तेव्हा मदतीसाठी हात पुढे करणे आवश्यक आहेच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे पुढील अरिष्टाची कळ वाजण्यापूर्वीच जलव्यवस्थेची दिशा बदलणे.

**सत्यसाई पी.एम.**
मो.७२४८९९२३२३

# गांधीजींना पुजण्याची सक्ती नाही, पण द्वेषही नको!



महात्मा गांधी हे नाव उच्चारले की आजही समाजात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटतात. काही लोक त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेतात, तर काही जण त्यांच्या निर्णयांवर टीका करतात. काहींच्या मनात त्यांच्याबद्दल आदर आहे, तर काही जण त्यांच्या नावाचा द्वेष करताना दिसतात. लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. गांधीजींचे समर्थन करणे ही कोणाची सक्ती नाही आणि त्यांच्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन करणेही आवश्यक नाही. पण गांधीजींना मानणाऱ्या लोकांचा अपमान करणे, त्यांच्या श्रद्धेची टिंगल करणे आणि त्यांच्या ऐतिहासिक योगदानाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, हा कोणत्याही वैचारिक प्रगल्भतेचा परिचय नाही.

तुम्ही गांधीजींना नावे ठेवत राहा; आम्हाला त्यासाठी तुमच्याशी भांडायचे नाही. तुम्ही त्यांचे विचार नाकारत राहा; आम्हाला तुमच्या मान्यतेची गरज नाही. पण गांधीजींना मानणारे संपले आहेत, असा भ्रम बाळगू नका. कारण प्रत्येक विचारवंत रस्त्यावर उतरून घोषणा देत नाही आणि प्रत्येक श्रद्धेला गोंगाटाची गरज नसते. काही लोक आपले विचार शांतपणे जपतात. प्रत्येक वादात उतरून स्वतःची भूमिका सिद्ध करण्याची त्यांना गरज वाटत नाही. त्यांच्या शांततेचा अर्थ त्यांच्या विचारांचा अंत झाला आहे, असा होत नाही.

पिढ्या बदलल्या, काळ बदलला, राजकीय परिस्थिती बदलली; पण महात्मा गांधींचे नाव आजही भारताच्या इतिहासात आणि जागतिक चर्चेत कायम आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढा, सत्याग्रह आणि अहिंसेचा विचार आजही अभ्यासला जातो. संयुक्त राष्ट्रांनी २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून घोषित केला आहे. याचा अर्थ जगातील प्रत्येक व्यक्ती गांधीजींच्या प्रत्येक भूमिकेशी सहमत आहे, असा नाही. मात्र त्यांच्या अहिंसेच्या विचाराला जागतिक स्तरावर मिळालेले स्थान नाकारता येत नाही. भारताची ओळख केवळ गांधीजींमुळे निर्माण झालेली नाही; ती आपल्या समृद्ध संस्कृतीतून आणि असंख्य महापुरुषांच्या योगदानातून घडली आहे. तरीही आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची जागतिक ओळख निर्माण करण्यात गांधीजींचे योगदान महत्त्वाचे आहे.

गांधीजींच्या विचारांशी मतभेद असतील, तर ते नक्की मांडा. त्यांच्या राजकीय निर्णयांचे विश्लेषण करा. त्यांच्या भूमिकांवर प्रश्न विचारा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी यांच्यातील वैचारिक मतभेदांचाही अभ्यास करा. इतिहासातील प्रत्येक व्यक्तीचे मूल्यमापन चिकित्सक दृष्टिकोनातून झालेच पाहिजे. परंतु एखाद्या व्यक्तीच्या काही निर्णयांशी असहमती असणे आणि तिचे संपूर्ण योगदान नाकारणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. टीका करण्यासाठी अभ्यास लागतो; द्वेष करण्यासाठी केवळ पूर्वग्रह पुरेसा असतो. म्हणूनच टीका आणि द्वेष यांच्यातील फरक समजून घेणे आज अधिक आवश्यक आहे.

जरा इतिहासाच्या व्यापक पटाकडे पाहा. कलिंगाच्या युद्धात झालेल्या रक्तपातानंतर सम्राट अशोकाच्या जीवनात मोठा बदल झाला. युद्धातून मिळालेल्या विजयापेक्षा मानवी दुःखाचे गांभीर्य त्याला जाणवले आणि त्याने धम्माचा प्रसार व नैतिक आचरणावर भर दिला. महाभारताच्या कथेतही युद्ध जिंकून सर्व प्रश्न संपत नाहीत, हे दिसून येते. भीष्मांचा शरपंजरीवरील अंत, असंख्य योद्ध्यांचा मृत्यू आणि युद्धानंतरही कायम राहणारे दुःख आपल्याला विचार करायला लावते. विजय मिळवणे आणि खऱ्या अर्थाने सुखी होणे या वेगळ्या गोष्टी आहेत. संघर्ष कधी अपरिहार्य असू शकतो; पण त्याची मानवी किंमत विसरता कामा नये. गांधीजींच्या अहिंसेचा विचारही याच मानवी संवेदनशीलतेच्या संदर्भात समजून घ्यायला हवा.

अहिंसा म्हणजे अन्याय सहन करणे नव्हे. अन्यायाविरुद्ध उभे राहताना माणुसकी न गमावणे, विरोधकाच्या विचारांना विरोध करताना त्याच्याविषयी अमानवी द्वेष न बाळगणे आणि सत्यासाठी लढताना सूडालाच न्याय समजण्याची चूक न करणे, हा अहिंसेचा व्यापक अर्थ आहे. आज समाजात मतभेदांचे रूपांतर अनेकदा वैरात होते. राजकीय, धार्मिक आणि वैचारिक मतभेदांमुळे माणसे एकमेकांपासून दूर जातात. अशा वेळी गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण करणे नव्हे, तर वर्तमानातील प्रश्नांकडे पाहण्याची एक दृष्टी विकसित करणे होय.

माझ्यासारखे गांधीजींच्या विचारांवर विश्वास ठेवणारे अनेक लोक आजही आहेत. आम्हाला गांधीजींच्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन करायचे नाही. इतिहासातील प्रश्नांपासून पळायचेही नाही. पण सत्य, अहिंसा, संवाद आणि मानवी सन्मान या मूल्यांचे महत्त्व नाकारायचे नाही. गांधीजींची पूजा करणे हा वैयक्तिक प्रश्न आहे; त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे ही वैचारिक निवड आहे. आम्ही गांधीजींना मानतो म्हणून इतरांनीही त्यांना मानलेच पाहिजे, असा आग्रह आम्हाला धरायचा नाही. मात्र आम्ही त्यांना मानतो म्हणून आमची टिंगल केली जावी, हेही आम्हाला मान्य नाही.आज गांधीजींच्या नावावर वाद घालणाऱ्यांनी स्वतःलाही एक प्रश्न विचारावा. आपण सत्याला किती महत्त्व देतो? मतभेद असलेल्या व्यक्तीशी किती सभ्यतेने वागतो? आपल्या विचारांशी सहमत नसलेल्या माणसाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करतो का? गांधीजींच्या नावाचा जयघोष करून व्यवहारात खोटेपणा किंवा अन्याय केला, तर त्या श्रद्धेला अर्थ उरत नाही. त्याचप्रमाणे गांधीजींवर टीका करताना तथ्ये, संदर्भ आणि प्रामाणिकपणा सोडला, तर ती टीकाही आपले वैचारिक मूल्य गमावते.

महापुरुषांचा सन्मान म्हणजे त्यांना प्रश्नांच्या पलीकडे ठेवणे नव्हे. त्यांच्यावर टीका करणे म्हणजे त्यांचे संपूर्ण योगदान पुसून टाकणेही नव्हे. इतिहासाचा प्रामाणिक अभ्यास करणे, त्यातील योगदान आणि मर्यादा दोन्ही स्वीकारणे आणि वेगवेगळ्या विचारप्रवाहांना समजून घेणे, हीच प्रगल्भ समाजाची खूण आहे. गांधीजींच्या विचारांशी सहमत असणे किंवा नसणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय आहे; पण दुसऱ्याच्या विचारस्वातंत्र्याचा आदर करणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे.शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, तुम्ही गांधीजींना नाकारू शकता; पण त्यांना मानणाऱ्या लोकांचे अस्तित्व नाकारू शकत नाही. तुम्ही त्यांच्या विचारांवर टीका करू शकता; पण द्वेषाच्या जोरावर इतिहासातील त्यांचे स्थान पुसू शकत नाही. पिढ्या बदलतील, टीकाकार बदलतील, नव्या पिढ्या नव्याने प्रश्न विचारतील; पण सत्य, अहिंसा आणि माणुसकीची गरज संपणार नाही.गांधीजींना पुजण्याची सक्ती नाही, पण द्वेष करण्याचा मक्ताही नाही!

कारण देशावर प्रेम करण्यासाठी एखाद्या महापुरुषाचा द्वेष करणे आवश्यक नसते. आणि एखाद्या महापुरुषावर टीका करण्यासाठी त्याच्या संपूर्ण योगदानाला नाकारणेही आवश्यक नसते. विचारांशी असहमती असू द्या, पण माणुसकीशी शत्रुत्व नको. मतभेद असू द्या, पण द्वेषाला विचारांचे नाव नको.

गांधीजींचे विचार मानणारे आजही आहेत आणि उद्याही असतील. प्रत्येक जण घोषणा देईलच असे नाही; पण शांतपणे सत्य, अहिंसा आणि माणुसकी जपणाऱ्या प्रत्येक कृतीत या मूल्यांचे अस्तित्व दिसत राहील.

**धनंजय देशमुख,**
मो.९२८४३८२१०२

## पर्यटनाचा आनंद जीवावर बेतायला नको

संवाद

रायगडमधील जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर पुण्याच्या ८ शाळकरी विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून झालेला मृत्यू मन विषण्ण करणारा आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा समुद्र पर्यटनाच्या सुरक्षेचा आणि पर्यटकांच्या बेफिकीरीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. यापूर्वी १ फेब्रुवारी २०१६ रोजी रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा समुद्रकिनाऱ्यावर पुण्यातील इनामदार कॉलेजच्या १३ विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. २१ जानेवारी २०२३ रोजी काशिद समुद्रकिनाऱ्यावर घडलेली घटना देखील अत्यंत दुर्दैवी होती. त्यादिवशी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील साने गुरुजी विद्यालयाच्या २ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला आणि आता ही दिवेआगरची दुर्घटना. या सर्व दुर्घटनांमधील साम्य म्हणजे सहलीसाठी आलेल्या तरुण विद्यार्थ्यांना समुद्राच्या पाण्याचा, ओहोटीचा आणि लाटांच्या वेगाचा अंदाज न येणे. पर्यटनाचा आनंद घेत असताना स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे आणि खोल पाण्यात उतरणे टाळणे किती गरजेचे आहे.

**-प्रदीप मोरे**

## कॅप्टन स्मित मच्छार ठरले हिरो

कॅप्टन स्मित मच्छार हे अद्भूत शौर्यामुळे चर्चेत आले आहेत फ्लाईदुबई विमान कंपनीचे एक धाडसी भारतीय पायलट आहेत. त्यांनी गंभीर जखमी अवस्थेतही हवेत हजारो फूट उंचीवर स्वतःचा जीव धोक्यात घालून तब्बल १७४ हून अधिक प्रवाशांचे प्राण वाचवले आहेत फ्लाईदुबईचे विमान फ्लाइट १०७३ दुबईहून तेल अवीव इस्त्रायलकडे जात होते. विमान सुमारे ३४,००० फूट उंचीवर असताना कॉकपिटमध्ये ओमानच्या सह-पायलटने अचानक विमान क्रॅश करण्याचा प्रयत्न केला आणि कॅप्टन स्मित यांच्यावर चाकूने भीषण हल्ला केला त्यामुळे ते रक्तबंबाळ आणि गंभीर जखमी झाले. त्यांनी त्या सह -पायलटचा हिमतीने सामना केला, त्याला रोखले आणि विमानाचे नियंत्रण स्वतःकडे घेऊन सौदी अरेबियातील ताबुक येथे विमानाचे यशस्वी इमर्जन्सी लँडिंग केले. त्यांच्या या धाडसामुळे विमानातील सर्व प्रवाशांचे प्राण वाचले आहेत.त्यांच्या या जिगरबाज अतुलनीय शौर्याबद्दल भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावरून त्यांचे भरभरून कौतुक केले जात असून तेचं खरे 'हिरो' ठरलेत.

**राजू जाधव**

शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# डिजिटल अरेस्ट प्रकरणातील चौथा आरोपी पोलिसांना हुलकावणी देऊन पसार..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ : यवतमाळतील ज्येष्ठ नागरिकांना ३२ लाख ८० हजार रुपयांनी लुटून फसवणूक केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी तीन आरोपींना उत्तर प्रदेशातील गाजियाबाद तसेच मनिपुर या ठिकाणावरून ताब्यात घेतले होते या तीन आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी चौथ्या आरोपीची माहिती दिली. शहर पोलिसांनी चौथ्या आरोपीला यवतमाळ येथे आणले मात्र या आरोपीने हुलकावणी देत पळ काढला.**



यासंदर्भात सुरुवातीला पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर बेंगलोर येथून तीन आरोपी ताब्यात घेतले हे तिन्ही आरोपी मणिपूर येथील रहिवासी होते. मात्र त्यांनी नंतर वेगवेगळ्या ठिकाणी आपला निवास करून निवासी पत्ता दिला होता. यातच धमक्या देऊन फसवणूक करणे हा प्रकार त्यांनी अवलंबविला. या तीनही आरोपींचा पीसीआर घेण्यात आला तेव्हा त्यातील एका आरोपीने अजून आमचे काही सहकारी असल्याचे सांगितले त्यात संशयित आरोपी मनोज कुमार राजवीर सिंग गहलोत वय ३७ राहणार भुवापूर गाजियाबाद याचे नाव पुढे आल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले दरम्यान त्याची तपासणी सुरू असतानाच त्याने पद्धतशीरपणे पोलीस अधिकारी यांनी कर्मचारी यांना हुलकावणी देत पळ काढला. पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी सर्व बाजूने यंत्रणा तैनात केली सदर आरोपी पळत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झाले परंतु पोलिसांना अद्यापही पसार आरोपी मोकाट असून त्याला पकडणे त्याला शक्य झाले नाही.यवतमाळ शहर पोलिसांची आरोपीला पकडण्या करिता दमछाक झाली आहे. यावरून कार्यक्षमता किती मोठी आहे हे यातून स्पष्ट होते.

# फुलसावंगी,हिंगणी बंधाऱ्यावर महसूल प्रशासनाची कारवाई..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २ :** पैनगंगा नदीच्या पात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर महसूल प्रशासनाने कारवाई केली आहे. फुलसावंगीजवळील हिंगणी कोल्हापुरी बंधाऱ्यावर उपविभागीय अधिकारी आणि महागाव तहसीलच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पैनगंगा नदीपात्रातून वाळूचा उपसा करून परिसरातील रस्त्यांवर साठा केला जात असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे अधिकाऱ्यांनी सकाळी ७ वाजेच्या सुमारास हिंगणी फाटा येथे पोहोचून थेट नदीपात्रात पाहणी केली. प्रशासनाची गाडी किंवा पथक येत असल्याचे लक्षात येताच काही वाहनांनी तेथून पळ काढला.



मात्र, महसूल पथकाने नदीपात्रात जाऊन वाळू उपशासाठी वापरले जाणारे १० तराफे शोधून काढले. अधिकाऱ्यांनी हे सर्व तराफे जाळून नष्ट केले. या कारवाईत सुमारे अडीच लाख रुपयांचे साहित्य नष्ट करण्यात आले आहे. या कारवाईत परीक्षाधीन उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे, उमरखेड चे मंडळ अधिकारी गजानन सुरोसे, मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, तसेच तलाठी विनोद ढोने, पंजाब सानप, आर. जी. राठोड आणि महसूल कर्मचारी अक्षय बोनगुलवार, वासुदेव जुकोंडावार, मिलिंद पानपट्टे, योगेश मारकवार, उदल राठोड, कल्याण सोळंकी, संतोष जाधव व विश्वंभर भोंगाळे सहभागी होते.

# लाडखेडमध्ये प्रेमसंबंधातून रक्तरंजित हल्ला, महिलेचा तलवारीच्या वारात मृत्यू?

### मावस बहिणीवर लाकडी दांड्याने हल्ला तक्रारीत आरोपीकडून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**लाडखेड, दि. २ :** दारव्हा तालुक्यातील लाडखेड येथील इंदिरानगर परिसरात प्रेमसंबंधाच्या वादातून एका महिलेवर तलवारीने हल्ला करून तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना १ ऑक्टोबरच्या रात्री घडल्याचा आरोप पोलिसांत दाखल तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेत अन्य एका महिलेवरही लाकडी दांड्याने डोक्यात वार करून गंभीर जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

फिर्यादी शिवा दिलीप साठे (वय ३३) यांनी लाडखेड पोलिस ठाण्यात दिलेल्या जबानीनुसार, त्यांची मावशी कांताबाई सहदेवराव तेलंगे (वय ४८) व तिची मुलगी सोनु उर्फ शुभांगी गजानन सरकटे (वय ३०) या इंदिरानगर परिसरात राहत होत्या. सोनु हिचे सदाम उर्फ



तसवर खान तैमुर खान (वय ३५, रा. लाडखेड) याच्याशी प्रेमसंबंध असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. १ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊ ते दहाच्या सुमारास आरोपी तलवार घेऊन आल्याचे आणि कांताबाई यांच्या पोटावर व मानेवर तलवारीने वार केल्याचे फिर्यादीचे म्हणणे आहे. त्यानंतर सोनु हिच्या डोक्यावर लाकडी दांड्याने वारंवार मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. फिर्यादीने आरोपीला अडवण्याचा प्रयत्न केला असता त्याला ढकलून दिल्याचे तसेच नंतर धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. आरोपी निघून गेल्यानंतर कांताबाई जमिनीवर निश्चल अवस्थेत आढळून आल्याचे फिर्यादीने सांगितले. दरम्यान, सोनु हिला जखमी अवस्थेत उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे समजते. या प्रकरणी लाडखेड पोलिसांनी तक्रारीच्या आधारे पुढील तपास सुरू केला आहे. मृत्यूचे नेमके कारण व घटनेतील इतर बाबी तपासानंतर स्पष्ट होतील.

## थोडक्यात



### अणे महिला महाविद्यालयात ३५४ विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी

**ॲनिमिया, सिकलसेल व थॅलेसेमिया तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद**

**यवतमाळ :** विद्यार्थिनींच्या आरोग्याची काळजी घेत रक्ताशी संबंधित आजारांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ३० सप्टेंबर रोजी ॲनिमिया, सिकलसेल व थॅलेसेमिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. लोककल्याण समिती, नागपूर यांच्या सहकार्याने हे नि:शुल्क शिबिर घेण्यात आले.

प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे यांनी प्रास्ताविकातून शिबिराचा उद्देश स्पष्ट करत विद्यार्थिनींनी आरोग्यविषयक तपासण्यांकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन केले. शिबिर समन्वयक कृष्णा बांगर यांनी विविध तपासण्या व त्यांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील सुशांत मेश्राम, सूरज पडघन व सनी थूल यांच्या पथकाने विद्यार्थिनींची रक्त तपासणी केली. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील तब्बल ३५४ विद्यार्थिनींनी शिबिराचा लाभ घेतला. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ममता दयने, प्रा. ज्ञानेश्वर गटकर, डॉ. चंद्रशेखर कुडमेथे, प्रा. मोनाली सलामे, डॉ. सरिता देशमुख, प्रा. नारायण वाघमारे यांच्यासह प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवकांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

### महात्मा गांधी जयंतीनिमित्त महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

**झरी-जामणी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी-जामणी येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना गांधीजींच्या जीवनकार्याची तसेच त्यांच्या विचारांची माहिती देण्यात आली. स्वच्छता ही केवळ परिसरापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून स्वच्छता व सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता, अहिंसा व सामाजिक बांधिलकीची शपथ घेतली. कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आर. एन. देशमुख, IQAC समन्वयक प्रा. भोयर, NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. टी. जाधव, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमनजली केशट्टी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये महात्मा गांधींच्या विचारांची जाणीव निर्माण करण्यासोबतच स्वच्छता, शिस्त, सामाजिक सेवा आणि राष्ट्रभक्तीची भावना दृढ झाली.

### राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसतर्फे अभिवादन

**पांढरकवडा :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त केळापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने बचत भवन, नगर परिषद पांढरकवडा येथे अभिवादन करण्यात आले.



यावेळी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व शांततेच्या विचारांचे, तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेच्या आदर्शांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेत राष्ट्रसेवा, सामाजिक एकता व जनहितासाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला माजी शहर अध्यक्ष मनोज भोयर, जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष अमर पाटील, तालुका अध्यक्ष प्रेम राठोड, जिल्हा सचिव इकराम अली, शहर अध्यक्ष अनीस पोसवाल, युवक शहर अध्यक्ष संतोष राऊत, जिल्हा आदिवासी सेल अध्यक्ष अनिल कीनाके, महिला काँग्रेस उपाध्यक्ष वाणी तोडसे, तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष श्रीनिवास, साहिल मेश्राम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत खरूस ( बु ) येथील शेतातील ऊस जळून खाक

## महिला शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २ :** शेतातील ट्रान्सफार्मरवरून शॉर्टसर्किट होऊन शेतात लोंबकळणाऱ्या तारांच्या घर्षणाने आग लागून साडेचार एकर ऊस जळून भस्मसात झाल्याने खरूस (बु ) येथील महिला शेतकऱ्याचे लाखो रुपयांची नुकसान झाले आहे .

सदर तारांबाबत वीज वितरण कार्यालयात जाऊन सूचना दिल्यानंतरही दखल न झाल्याने महावितरण च्या ढिसाळ कारभारामुळे दुष्काळी परिस्थितीत शेतकरी महिलेवर आर्थिक आपत्ती ओढवली आहे . खरूस (बुद्रुक ) येथील शेतकरी वंदना श्यामराव वानखेडे यांच्या २१ / १ या शेत सर्वे नंबर मध्ये १ .३५ हेक्टर आर मध्ये संपूर्णतः ऊस पीक आहे . दि .१ ऑक्टोंबर रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास ट्रांसफार्मर वरून झालेल्या शॉर्टसर्किटमुळे तारांचा स्पर्श होऊन उडालेल्या ठिणग्यांमुळे ऊसाला आग लागली .या आगीत उसाचे उभे



पीक जळून भस्मसात झाले . शेतकरी वंदनाबाई यांनी संभाव्य धोका ओळखून यापूर्वी शेतातील करणाऱ्या तारांबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या मात्र विद्युत कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दखल घेतल्याने दुष्काळी परिस्थितीमध्ये तळहातावरील फोडाप्रमाणे जोपासना केलेला ऊस महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे जळून भस्मसात झाला व लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान झाले असल्याने वीज वितरण कंपनीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी तक्रारी द्वारे केली आहे . नुकसानग्रस्त महिला शेतकरी वंदनाबाई शामराव वानखेडे यांनी तालुका कृषी कार्यालय तसेच उमरखेड पोलीस स्टेशनलाही याबाबत तक्रार केली आहे . विशेष आणि संतापजनक बाब म्हणजे, सदर शेतातील रोहित्रावरील लोंबकळणाऱ्या आणि धोकादायक ठरणाऱ्या वीज तारांबाबत वंदनाबाई वानखेडे यांनी यापूर्वी अनेकदा महावितरण कंपनीच्या कार्यालयात जाऊन लेखी व तोंडी तक्रारी केल्या होत्या. या तारांमधील त्रुटी दूर करून त्या व्यवस्थित कराव्यात, अशी विनंती वारंवार करण्यात आली होती. मात्र, नेहमीप्रमाणे कुंभकर्णी झोपेत असलेल्या महावितरणच्या बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. महावितरणच्या याच अक्षम्य निष्काळजीपणाचा थेट फटका आज एका कष्टकरी महिला शेतकऱ्याला बसला असून, त्यांचे हक्काचे पीक डोळ्यांदेखत जळून कोळसा झाले आहे.

# अधिकार गेले, सह्या गेल्या; तरी 'सत्तेचा तोरा' कायम!

### माजी सरपंचांच्या हस्तक्षेपाच्या तक्रारी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. २ :** दारव्हा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपून सात ते आठ महिने उलटले असतानाही काही माजी सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांकडून ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कारभारात हस्तक्षेप होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. प्रशासकीय प्रक्रिया सुरू असताना माजी पदाधिकाऱ्यांचा वाढता वावर चर्चेचा विषय ठरत असून, प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मुदत संपल्यानंतर पदाधिकाऱ्यांचे अधिकार व स्वाक्षरीचे अधिकार संपुष्टात येतात. मात्र, काही माजी पदाधिकारी ग्रामपंचायत कार्यालयात वारंवार उपस्थित राहून कर्मचाऱ्यांना सूचना देणे, विविध कामांबाबत दबाव आणणे अथवा निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे कर्मचारी दबावाखाली काम करीत असल्याची चर्चा आहे. 'पद गेले, पण प्रभाव काही जाईना!' अशी उपरोधिक चर्चा काही गावांमध्ये रंगली आहे. ग्रामपंचायत ही कोणत्याही व्यक्तीची किंवा गटाची मालमत्ता नसून ग्रामस्थांची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे पदाची मुदत संपल्यानंतर अनधिकृत हस्तक्षेप होत असल्यास त्याची वस्तुनिष्ठ चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. गटविकास अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी खत्री यांनी संबंधित ग्रामपंचायतींच्या कारभाराची तपासणी करून नियमबाह्य हस्तक्षेप आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार सरपंचांचा मार्गदर्शन मेळावा

**झरी, दि. २ :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. राजीव करसावार यांच्या वाढदिवसानिमित्त तीन वर्षे सलग आदर्शग्राम पुरस्कार प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायतीचे सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मार्गदर्शन मेळावा सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कृ. उ. बा. स. मुकुटबन येथे आयोजित करण्यात आला आहे. ग्रामविकास, आदर्श ग्रामपंचायत निर्मिती आणि स्थानिक विकासाच्या विविध विषयांवर यावेळी मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन राजीव कासावार मित्रपरिवार झरी यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाला नागरिक, ग्रामपंचायत पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामविकासात रुची असलेल्या नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# उमरखेड शहर काँग्रेस तर्फे महात्मा गांधींच्या पुतळ्यास अभिवादन!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २ :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून, उमरखेड शहरातील स्थानिक गांधी चौकात, शहर काँग्रेसच्या वतीने राष्ट्रपित्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. येथील मुख्य गांधी पुतळ्यास काँग्रेस नेत्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी उपस्थितांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि सामाजिक एकतेच्या अजरामर विचारांचे स्मरण केले. आजच्या काळात गांधीजींच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजात सलोखा, शांतता व बंधुभाव जपण्याची नितांत गरज असल्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या गरिमामयी कार्यक्रमाला काँग्रेसचे नेते गोपाल अग्रवाल, महिला शहराध्यक्ष सागर शिंदे, नगर परिषद सभापती प्रकाश शिकारे आणि वीरेंद्र खंदारे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच नगर परिषद सदस्य साजिद जागीरदार, वासिफ पठाण, गणेश खंदारे, गजानन रासकर, राहुल काळबांडे, आणि राधा इंगोले यांनीही राष्ट्रपित्यास अभिवादन केले. याशिवाय सुधाकर लाहेवार, विवेक मुडे, सिद्धू जगताप, अनिल कदम, गणेश रावते, भैय्या पवार, गजानन भारती, सोनू खतीब, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नगर परिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता गांधीजींच्या घोषणांनी झाली.



# माळवाकद जि.प. शाळेत शिक्षण परिषदेतून ज्ञानवृद्धी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २ :** माळवाकद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेत शिक्षण परिषद व सेवापूर्ती कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग धर्मा राठोड होते. केंद्रातील मुख्याध्यापकांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सेवापूर्ती निमित्त शिक्षक दिलीप राजूसिंग राठोड यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, अहेर व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षण परिषदेत सहाय्यक शिक्षक अमोल जगताप यांनी आनापान विषयावर मार्गदर्शन केले. सुधीर दुद्दल यांनी शिष्यवृत्ती, एनएमएमएस व जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेबाबत माहिती दिली. केंद्र समन्वयक विजय ढेंगळे यांनी प्रशासकीय माहिती देत विविध अहवाल संकलित केले. पोखरी केंद्रांतर्गत नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचे तसेच माळवाकद येथील नवनियुक्त अंगणवाडी सेविका मोनिका गोपाल राठोड यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन उज्वलदीप धुर्वे यांनी, तर आभार शितल मॅडम यांनी मानले.

# शासकीय निवासी शाळेत ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २ :** शासकीय निवासी शाळा महागाव येथे ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधुन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त महागाव येथील शासकीय मुलींच्या निवासी शाळेत विविध शासकीय,निमशासकीय व खाजगी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिरासिंग चव्हाण हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन मुख्याध्यापिका मंगला भोयर मॅडम,सेवानिवृत्त उपशिक्षण अधिकारी बाबाराव वानुळे हे होते. यावेळी सेवानिवृत्त बँक कर्मचारी बाबुराव जामुस्तकर ,नारायण दरोडे, उत्तम मेटकर,सेवानिवृत्त शिक्षक धर्मप्रकाश बंजारे, शेतमजुर गोविंदा राठोड यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक भालके सर, भेंडे सर,पवार मॅडम, पराते मॅडम, मोरे मॅडम यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी शाळेतील कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थिती होत्या.

# महात्मा गांधी जयंती निमित्त खैरखेडा आश्रम शाळेत स्वच्छता अभियान.!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २ :** तालुक्यातील माळपठारावर असलेल्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खैरखेडा येथे २ ऑक्टोंबर महात्मा गांधी यांच्या जयंतीचे निमित्त साधून स्वच्छता अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेमध्ये स्वच्छता बाबत शपथ घेण्यात आली त्याचबरोबर स्वच्छतादूत यांची नेमणूक करण्यात आली आणि महात्मा गांधींच्या श्रमप्रतिष्ठेच्या मूल्यांची विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवणूक व्हावी यासाठी त्यांना समप्रतिष्ठेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच यावेळी शाळेतील वर्ग खोल्या, निवास व्यवस्था व शाळेतील परिसराची साफसफाई करण्यात आली.या कार्यक्रमाच्या वेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक,अधीक्षक, अधीक्षिका,इतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# महात्मा गांधी आणि शास्त्रीजी युगांचे प्रेरणास्थान- संजय खाडे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २ :** महात्मा गांधी हे संपूर्ण विश्वाचे प्रेरणास्थान आहेत. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. सोबतच मानव उद्धारासाठी केलेल्या त्यांच्या कार्याला कुठेच तोड नाही.असे प्रतिपादन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांनी केले. गांधी चौक आणि शास्त्रीनगर येथे जयंतीनिमित्त अभिवादन करताना ते बोलत होते.

महात्मा गांधींची जयंती जगभरात अहिंसादिन म्हणून साजरी होते. त्यांच्या विचारांचा जगाने स्वीकार केला.तो आपणही करावा,असे आवाहन त्यांनी यावेळी केले.याप्रसंगी अनंतलाल चौधरी,जय आबड,विकेश पानघाटे वंदना आवारी,शामा तोटावार,मोवाडे,अशोक पांडे,प्रमोद लोणारे,अनिल ठाकूरवार,पांडुरंग बत्तुलवार, प्रमोद वासेकर,तेजराज बोढे, राजू अंकतवार,नीलिमा काळे,पांडुरंग पंडिले,संदीप बोथरा,सुनील इंदुवामन ठाकरे,सुनील वरारकर,शरद मंथनवार,वंदना धगडी, सविता रासेकर आणि नागरिक उपस्थित होते.

# गांधी-शास्त्रींच्या विचारांना कृतीची जोड,मोघे महाविद्यालयात स्वच्छता, वृक्षारोपण



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २ :** शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. योगेश उगले, प्रा. पुरुषोत्तम उदार व प्रा. विनायक नैताम उपस्थित होते.

यावेळी गांधीजींचे सत्य, अहिंसा, शांतता व स्वच्छतेचे विचार, तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व राष्ट्रसेवेच्या आदर्शांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता कृतीत उतरवावेत, असे आवाहन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमानंतर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी श्रमदान करत पांढरकवडा शहरातही स्वच्छता उपक्रम राबविला. संचालन प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# नैसर्गिक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

## विधान परिषद उपसभापती सचिन अहिर, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली पाहणी व चर्चा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना भेट देऊन केले सांत्वन





**अमरावती/का.प्र.**

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. शेतकऱ्यांनी हताश होऊ नये. अशा संकट प्रसंगी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.अमरावती जिल्ह्यातील सर्वच तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहे तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, अशी माहिती विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी आज येथे दिली.

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी व दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी उपसभापती अहिर यांनी केली.तसेच,सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. त्यानंतर त्यांनी ही माहिती दिली.मौजा मुंड निशंकराव येथील दीपक बोलाईत आणि मंगरूळ चव्हाळा येथील जानबाजी पारसकर यांच्या शेतात जाऊन उपसभापती अहिर यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. अतिवृष्टीमुळे शेतातील माती व पीक वाहून गेले. जमीन खरवडली. सोयाबीनला पुरेशा शेंगा धरल्या नाहीत. उत्पादन खर्चही निघेल अशी स्थिती नाही. अशा समस्या शेतकऱ्यांनी मांडल्या. या भागात अतिवृष्टीमुळे शेतीच्या नुकसानी सोबतच राहत्या घरांची पडझड झाली यासंदर्भात उपसभापती श्री अहिर यांनी माहिती जाणून घेतली. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली. शेतकरी व नागरिकांना वेळेत मदत देण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. मुरलीधर वेळूकर यांनी बॅकवॉटर पाण्यामुळे शेतीचे सततचे नुकसान होत असल्याने यावर्षी जुलै महिन्यात आत्महत्या केल्याची माहिती त्यांचे वडील बंधू प्रकाश वेळूकर यांनी दिली. या समस्येमुळे सालोड व परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब त्यांनी मांडली. हा संपूर्ण विषय समजून घेत श्री. अहिर यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना हा विषय सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि समस्याग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेण्याच्या सूचना केल्या. या विषयासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. मुरलीधर वेळूकर यांच्या पत्नी वेळूकर,मुलगी समीक्षा आणि मुलगा सार्थक यांची आस्थेने चौकशी करून अहिर यांनी त्यांचे सांत्वन केले व प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांना आश्वस्त केले.

येथील मनोज फरकाडे या शेतकऱ्याने यावर्षी एप्रिल महिन्यात आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना उपसभापती श्री अहिर यांनी भेट दिली. पत्नी शुभांगी फरकाडे व रुद्रांश (४ वर्ष) आणि शिवराज (८ वर्ष) या मुलांना त्यांनी दिलासा दिला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत या कुटुंबाला मिळाली आहे. यासोबतच लाडकी बहीण योजना, श्रावण बाळ योजना आदी योजनांचा लाभ या कुटुंबाला देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.सालोड गावचे सरपंच जगदीश ढगे, उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, गटविकास अधिकारी स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील आणि गावकरी यावेळी उपस्थित होते.नुकसानीची पाहणी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना भेट दिल्यानंतर अहिर यांनी नांदगाव खंडेश्वर येथील श्री. क्षेत्र खंडेश्वर संस्थान येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या समजून घेतल्या.

# मेळघाटातील शासकीय विश्रामगृहांच्या देखभालीचा प्रश्न ऐरणीवर

## कंत्राटी व्यवस्थेनंतर स्वच्छता, बगीचा व पाहुणचाराच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह, मजुरांच्या मानधनाचाही मुद्दा चर्चेत

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील धारणी, चिखलदरा मुख्यालयासह विविध ठिकाणी असलेल्या शासकीय विश्रामगृहांच्या व्यवस्थापनात बदल करण्यात आला असून, पूर्वी शासकीय कर्मचाऱ्यांकडून करण्यात येणारी देखभाल आता कंत्राटी पद्धतीने करण्यात येत असल्याचे समोर येत आहे. कंत्राटी पद्धतीने व्यवस्थापन करण्यास हरकत नसली, तरी विश्रामगृहांची स्वच्छता, परिसराची निगा, बगीच्याची देखभाल तसेच येथे येणाऱ्या पाहुण्यांच्या पाहुणचाराचा दर्जा पूर्वीप्रमाणेच कायम राहणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मेळघाटातील शासकीय विश्रामगृहे ही केवळ निवासाची ठिकाणे नसून येथे वरिष्ठ शासकीय अधिकारी, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी तसेच विविध मान्यवरांची ये-जा असते. त्यामुळे या विश्रामगृहांचा परिसर स्वच्छ, सुस्थितीत आणि पाहुण्यांसाठी योग्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.मात्र, काही विश्रामगृहांना भेट देऊन पाहणी केली असता परिसराची स्वच्छता, बगीच्याची निगा आणि एकूण देखभालीकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याचे चित्र दिसून आल्याची माहिती आहे. यामुळे कंत्राटी व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, काही ठिकाणी एक, काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन मजुरांच्या माध्यमातून विश्रामगृहांची देखभाल केली जात असल्याचे सांगण्यात येते. या मजुरांवर स्वच्छता, परिसराची निगा, बगीचा तसेच इतर विविध कामांची जबाबदारी असल्याची माहिती मिळाली आहे.विशेष म्हणजे, संबंधित मजुरांना अत्यल्प मानधन मिळत असल्याची माहिती असून, काही ठिकाणी त्यांना महिन्याला केवळ सुमारे ६ हजार रुपयेङ मिळत असल्याचे सांगितले जाते. एवढ्या कमी मानधनात त्यांच्यावर विविध कामांची जबाबदारी सोपविण्यात येत असल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

या मजुरांशी विचारपूस केली असता, काम गमावण्याची भीती असल्याने ते आपली परिस्थिती उघडपणे सांगण्यास घाबरत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे त्यांच्या मानधनाबाबत तसेच त्यांच्याकडून करून घेतल्या जाणाऱ्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष लक्ष घालून वस्तुस्थिती तपासणे गरजेचे आहे.कंत्राटी पद्धतीने काम देण्यात आले असले तरी संबंधित कामगारांना लागू असलेल्या शासनाच्या नियमांनुसार योग्य मोबदला मिळतो आहे का, त्यांना आवश्यक सुविधा दिल्या जात आहेत का आणि कंत्राटदाराकडून करारातील अटींचे पालन केले जात आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे.

शासकीय विश्रामगृहांची देखभाल ही केवळ औपचारिक बाब न राहता त्यांचा परिसर, स्वच्छता, बगीचा, निवास व्यवस्था आणि पाहुणचाराचा दर्जा कायम राखला जाणे आवश्यक आहे. येथे येणारे वरिष्ठ अधिकारी व मान्यवर हे शासनाचे प्रतिनिधी असल्याने त्यांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, अशी अपेक्षा आहे.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विश्रामगृहांची प्रत्यक्ष पाहणी करावी.

तसेच तेथे काम करणाऱ्या गरीब मजुरांना शासनाच्या लागू नियमांनुसार योग्य व किमान मानधन मिळते आहे की नाही, याची तपासणी करून आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

कंत्राटी व्यवस्थापनामुळे सरकारी खर्चात बचत होत असली तरी त्याचा परिणाम विश्रामगृहांच्या देखभालीवर किंवा कामगारांच्या हक्कांवर होऊ नये, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

आता सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी या महत्त्वपूर्ण बाबीकडे कितपत गांभीर्याने लक्ष देतात, विश्रामगृहांची प्रत्यक्ष पाहणी करतात का आणि कामगारांच्या मानधनाबाबत कोणती कार्यवाही करतात, याकडे मेळघाटातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# चांदूर रेल्वेत आठवड्यातून एक दिवस जिल्हाधिकारी कार्यालयाची व्यवस्था करा

## आ. प्रताप अडसड यांना आम आदमी पार्टीचे निवेदन



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे या तीन तालुक्यांतील नागरिकांना जिल्हास्तरीय प्रशासकीय कामांसाठी वारंवार अमरावती येथे जावे लागू नये, यासाठी चांदूर रेल्वे येथे आठवड्यातून किमान एक दिवस जिल्हाधिकारी कार्यालयाची विशेष प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन आम आदमी पार्टीच्या वतीने धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांना पाठविण्यात आले. माजी नगरपरिषद उपाध्यक्ष तथा आप नेते नितीन गवळी यांच्यासह नागरिकांनी हे निवेदन सादर करून सदर मागणीचा शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालय कार्यरत असून या कार्यालयाच्या माध्यमातून चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे या तीन तालुक्यांचा प्रशासकीय कारभार पाहिला जातो. मात्र, जिल्हास्तरावरील विविध प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जावे लागते. महसूलविषयक प्रकरणे, जमीनविषयक बाबी, अपील, तक्रारी, प्रशासकीय अर्ज तसेच विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना अमरावतीच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तीनही तालुक्यांतील अनेक गावांमधून अमरावतीपर्यंत ये-जा करण्यासाठी नागरिकांना मोठा प्रवास करावा लागतो. यामुळे प्रवासाचा आर्थिक खर्च वाढण्यासोबतच कामाचा एक दिवसही वाया जातो. विशेषतः शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या गैरसोयीचा मोठा फटका बसत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या निवेदनावर नितीन गवळी, मेहमुद हुसैन, सागर गावंडे, मंगेश डाफ, निलेश होले, बादर खाँ, बाळू गुडधे, सागर पटले, विनोद लहाणे, निलेश कापसे, डिंपल जोल्हे, पायल पांडव, विशाल झंझाड, अमोल म्हसतकर यांच्यासह इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### धामणगावनंतर आता चांदूर रेल्वेची मागणी पूर्ण करा – मेहमुद हुसैन

धामणगाव रेल्वे येथे आठवड्यातून एक दिवस चांदूर रेल्वे येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक निर्णय आमदार प्रताप अडसड यांनी घेतला आहे. आता त्याच धर्तीवर चांदूर रेल्वे शहरातही आठवड्यातून एक दिवस जिल्हाधिकारी यांची उपस्थिती निश्चित करावी. आमदार अडसड यांनी तीनही तालुक्यांना समान न्याय देत चांदूर रेल्वेकरांची ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**मेहमुद हुसैन**
माजी न.प. सभापती

# पांढरी खानमपूर मॅरेथॉन हिट!



## ५ किमी मध्ये प्रणाली शेगोकार व गौरव खेडतकर अव्वल

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

युवकांमध्ये आरोग्य, व्यायाम आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पांढरी खानमपूर येथे आज मॅरेथॉन स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला परिसरातील युवक, नागरिक आणि धावपटूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सकाळपासूनच पांढरी खानमपूर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

विविध वयोगटातील धावपटूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत धावण्याच्या माध्यमातून 'फिटनेस आणि निरोगी जीवनशैली' चा संदेश दिला.या मॅरेथॉन स्पर्धेला एपीआय प्रशाली काळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलीस प्रशासनाने मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

या स्पर्धेच्या निकालात ५ किमी पुरुष गटात प्रथम क्रमांक गौरव गजानन खेडतकर(नागपूर), द्वितीयक्रमांक सोहम दुधराम चौधरी (नागपूर), तृतीय क्रमांक पियुष रामदास म्हसाने(वरूड) तर महिला गटात प्रथम क्रमांक प्रणाली संजय शेगोकार द्वितीय क्रमांक अंजली अरविंद मडावी तृतीय क्रमांक वैष्णवी वानखडे यांचा क्रमांक लागला. सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन रोहन युवा स्पोर्ट्स क्लब व नवे पाऊल सामाजिक गट, पांढरी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवे पाऊल सामाजिक गटाचे अध्यक्ष इंजि. गोविंद वि. हाडोळे, इंजि. कुलदीप ज्ञानेश्वर मुरतकर, पवन गोबरे, योगेश पवार, मनीष हाडोळे, मनीष पाटील, प्रशांत चोपकार, रोहित कान्हेरकर, पुष्पक येऊल, शेख जाबीर, फिरोज खान, मंगेश अतकरे तसेच रोहन युवा स्पोर्ट्स क्लबचे चंदू राक्षसकर, दीपक खांडेकर, प्रज्वल गावंडे व नवे पाऊल सामाजिक गटाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन रायबोले यांनी केले.पांढरी खानमपूर येथे आयोजित या मॅरेथॉनमुळे ग्रामीण भागातील क्रीडा चळवळीला नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण युवकांना व्यासपीठ मिळत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# संक्षिप्त

## शनिवार व रविवारी मोर्शीत 'ग्रंथोत्सव'

**मोर्शी-** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने शनिवार ३ व रविवार ४ ऑक्टोबर रोजी मोर्शी येथील पंजाबबाबा सभागृहात 'ग्रंथोत्सव-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार असून ग्रंथप्रदर्शन व विक्रीसोबतच विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथप्रेमी, साहित्य रसिक नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा ग्रंथोत्सव समितीचे सदस्य सचिव डॉ.अतुल वानखडे यांनी केले आहे.राज्य महाराष्ट्र सांस्कृतिक धोरणांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार असून ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल कुलट हे विशेष अथिती म्हणून उपस्थित राहणार आहेत.ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी १२ वा.'भारताचा रक्तरंजीत इतिहास'या विषयावर प्रा. जगदिश पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. सहायक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील हे अध्यक्षस्थानी असतील.दुपारी १ ते १.३० वाजेदरम्यान प्रसिद्ध कवी धीरज चावरे हे 'हास्य कवितांचा विनोदी कार्यक्रम'सादर करणार आहेत.तर दुपारी २ ते ४.३० वा. दरम्यान 'पुस्तकाची मैत्री' विषयावर परिसंवाद होणार आहे.दुसऱ्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान दोन व्याख्यान आणि एकपात्री प्रयोग सादर होणार आहेत.त्यातील पहिले व्याख्यान'सार्वजनिक ग्रंथालयामधील सॉफ्ट स्किल्स आंतरवैयक्तीक कौशल्य आणि व्यावसायीक क्षमता'या विषयावर डॉ.रविंद्र सरोदे यांचे तर 'वाचन संस्कृती काल आज आणि उद्या' विषयावर डॉ.राजेश बोबडे यांचे व्याख्यान होणार आहे.हर्षदा इंदोन यांचा 'मी वाचन संस्कृती बोलते'हा एकपात्री नाट्य प्रयोग तर आचल सरदार यांचा 'चला हसू या गाऊ या'हा नक्कल व गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

## समिक्षा पाटकरची यशाची भरारी



**खल्लार-** दर्यापूरच्या अवधूत नगर येथिल रहिवासी समिक्षा बाळकृष्ण पाटकर हिची नामांकित विप्रो म्हैसुर या कंपनीत निवड झाली.ग्रीन मिशनचे संयोजक तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभेचे प्रदेश सरचिटणीस प्रा. डॉ. सुशिल गावंडे यांनी निवड झाल्याबद्दल तिच्या निवासस्थानी भेट देऊन सन्मान केला.बी. इ. इलेक्ट्रॉनिक्स शिक्षण पूर्ण करुन समिक्षाने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद आहे. अत्यंत कष्टाच्या आणि प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत तिने मिळवलेल्या या यशामागे तिची जिद्द, मेहनत आणि आई-वडिलांचे कष्ट व संस्कार यांचा मोठा वाटा आहे.असल्याचे मत सन्मान करतांना प्रा. डॉ.गावंडे यांनी व्यक्त केले.

## जनता विद्यालयाचे सुयश

**अंजनगाव बारी-** जनता विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अमरावती येथे आयोजित तालुकास्तरीय विविध मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय यश संपादन केले. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रेम मेहेंगे याने १०० मीटर धावणे व गोळाफेक या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावला. तेजस गभणे याने २०० मीटर व १५०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक मिळविला, तर कैलास शेलोकार द्वितीय क्रमांक मिळविला. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात आदित्य हटवार याने २०० मीटर धावण्यात प्रथम, सिद्धार्थ वरठे याने द्वितीय, प्रवीण इंदोरे याने ८०० मीटर धावण्यात प्रथम, तर आयुष न्यायखोरे याने गोळाफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

# देवळी रस्त्याचे रुंदीकरणाची मागणी



**अचलपूर/वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षांपासून अचलपूर शहरातील देवळी या मुख्य रस्त्याचे रुंदीकरणाची मागणी ही नागरिकांकडून होत आहे .मात्र परिसरात शासकीय कार्यालय ,शाळा , विद्यालय,व्यापार संकुल,पोलिस स्टेशन,बँक कडे जाण्यासाठी वाहतुकीची नेहमी वर्दळ असलेला हा मुख्य रस्ता आहे .या रस्त्यावर नेहमी दुचाकी ,चारचाकी , ट्रक, ट्रॅक्टर, ऑटो आदी वाहनाची वर्दळ असते . पण रस्ता आजही अरुंद असल्याने वाहतूक कोंडी ची समस्या उद्भवते.यामुळे वाहनचालक सह नागरिक त्रस्त झाले आहे .एकीकडे या रस्त्याचा सिमेंट कॉंक्रीटीकरण चा बांधकामासाठी शासनाकडून निधी मंजूर झाला आहे . या रस्त्याचा बांधकामासाठी दोन्ही बाजूने दुकानदाराचे पायऱ्या, शेड चे बांधकाम तोडून नालीचे बांधकाम सुरू झाले होते .मात्र या रस्त्याचे रुंदीकरण व्हावे आणि वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी सामान्य नागरिकांच्या मागणीनुसार अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी पुढाकार घेतला .आणि या रस्त्यावरील दुकानाची शासकीय मोजणीसह जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया महसूल विभागाकडून राबविली जाणार आहे .यामुळे या रस्त्याचे बांधकाम अनेक महिन्यापासून बंद आहे . पण या कालावधीत रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहे.यामुळे सन,उत्सवाच्या काळात अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाकडून रस्त्यावर खड्डे बुजविण्यासाठी मुरुम टाकण्यात आली .त्यानंतर ती टाकलेली मुरुम नव्हती तर अनेक मोठ - मोठे दगड असल्याने ते परत उचलण्याची वेळ प्रशासनावर आली .त्यानंतर या रस्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती .आणि काही दिवसांपूर्वी सिमेंट कॉंक्रीटीकरण चे एक थर या रस्त्यावर टाकण्यात आले .यामुळे वाहनचालकांना सुविधा उपलब्ध होण्याऐवजी धुरामुळे व्यापारी त्रस्त झाले आहे.यासाठी आता अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून टँकर द्वारे या रस्त्यावर पाणी मारले जात आहे .यामुळे या रस्त्याचे पुढील भविष्य काय आहे ? यासंदर्भात व्यापारी वर्गाशी बैठकीच्या माध्यमातून सविस्तर चर्चा करून पुढील ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बाल रंगभूमी परिषदेच्या लोककला महोत्सवात बालकलाकारांचा जल्लोष



**नागपूर-** गोंधळ, पोवाडा, भारुड यासारख्या समृद्ध पारंपारिक लोक कलांच्या सादरीकरणाने नागपूर जिल्ह्यातील बालकलाकारांनी रंगमंचावर वेगळीच रंगत आणली. बालरंगभूमी परिषद नागपूर शाखेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गुरुनानक भवनात 'जल्लोष लोककलांचा' ही स्पर्धा अत्यंत उत्साहात संपन्न झाली.

स्पर्धेचे उद्घाटन नागपूरचे ज्येष्ठ गायक दत्ता हरकरे आणि ज्येष्ठ गायिका मोहिनी बर्डे यांनी दीप प्रज्वलन करून केले. यावेळी बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या वैदेही चवरे, नागपूर शाखेचे अध्यक्ष शाम आस्करकर, कोषाध्यक्ष डॉ. रवींद्र भुसारी, कार्यवाह अभिषेक बेलारवार, कार्यकारिणी सदस्य मंजुषा देव, अर्चना श्रावणे, योगेश राऊत, सुशील सरोदे, अमोल निंबार्ते, लोकेश तांदूळकर, सपन राऊत उपस्थित होते.

बालकलाकारांनी एकल गायन, एकल नृत्य, एकलवादन, समूह गीत आणि समूह नृत्य यासारख्या श्रेणीमध्ये आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. नागपूरचे ज्येष्ठ गायक दत्ता हरकरे, गायिका मोहिनी बरडे, नृत्य कलाकार अर्चना बागडे आणि लोकनृत्य कलावंत सचिन दाभणेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मंजुषा देव, अभिषेक बेल्लारवार आणि वैदेही चवरे यांनी केले. बालरंगभूमी परिषद नागपूर शाखेतर्फे आयोजित प्राथमिक फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बाल कलाकारांना समारोपीय समारंभाचे प्रमुख अतिथी उमरेडकर मसाले, नागपूरचे संचालक प्रशांत उमरेडकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्राथमिक फेरीनंतर लातूर येथे या स्पर्धेची अंतिम फेरी आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील एकूण २७ जिल्ह्यांमधील बालकलाकार त्यात आपली कला सादर करतील.एकल गायन स्पर्धेत प्रथम : धनश्री खापरे,द्वितीय: लावण्या शंभरकर,तृतीय : ईतिशा पाठे, उत्तेजनार्थ १: राधेय कोहळे, उत्तेजनार्थ २: ओजस्वी इंदुरकर. एकल वादन स्पर्धेत प्रथम : आरोह सरोदे.एकल नृत्य स्पर्धेत प्रथम : जीविका येंडे,द्वितीय : लावण्या खवासे, तृतीय :विधीशा कोयंडे, उत्तेजनार्थ १: अर्श शर्मा, उत्तेजनार्थ २: किशवी लेंडे.समूह गीत स्पर्धेत प्रथम : सारस्वत संगीत विद्यालय, द्वितीय: नवयुग विद्यालय तृतीय : स्कूल ऑफ स्कॉलर्स वानाडोंगरी, उत्तेजनार्थ १: स्वामीनारायण स्कूल, वर्धमान नगर उत्तेजनार्थ २:भारतीय कृष्णा विद्या विहार, तेलंगखेडी,समूह नृत्य स्पर्धेत प्रथम: जगत पब्लिक स्कूल द्वितीय : सोमलवार निकालस शाळा,तृतीय: माउंट लिट्रा झी स्कूल, उत्तेजनार्थ १: स्कूल ऑफ स्कॉलर्स, वानाडोंगरी,उत्तेजनार्थ २: भारतीय कृष्णा विद्या विहार, तेलंगखेडी विजेते ठरलेत.

# मराठी अभिजात भाषा गौरव दिन-वाटचाल आणि सद्यस्थिती

**आ**जचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणा-यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक क्षण आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार, उत्सव जोपासणा-यांसाठी एक गौरवाचा अभिमानास्पद दिवस आहे. दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्र सरकारने 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' अर्थात 'सन्मान दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अधिकृतपणे 'अभिजात भाषा' (क्लॉसिकल लँग्वेज) चा दर्जा जाहीर करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षाची परंपरा गृहीत धरण्यात आली. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरीता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबरला 'अभिजात मराठी भाषा दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले. हा ऐतिहासिक क्षण आणि मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी हा दिवस निवडण्यात आला आहे. अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष ठरवलेले आहेत. भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे. भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावेत. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा. हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न सुरू होते. यासाठी महाराष्ट्र राज्य शासन तर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून ५०० पानांचा अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीकरीता केंद्र सरकारने राज ठाकरेंच्या पुढाकाराने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. मराठी भाषा मुळातच अभिजात होती. तिला अभिजात दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्राने सनदशीर मार्गाने प्रयत्न केले. गेले दशकभर यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचा तमाम मराठी भाषिकांना आनंद झाला आहे. तसेच मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा,




प्रेरणा मिळाली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने अभिजात भाषेतील स्कॉलर्ससाठी दरवर्षी दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळतात, अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलंन्स फॉर स्टडिज स्थापन करण्यात येते, प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी एक अध्यासन केंद्र स्थापन केले जाते. प्राचीन ग्रंथाचे डिजिटलाझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि अर्काईव्हिंग (संग्रहण) क्षेत्रात तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात.

'मराठी' भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने 'मराठी' भाषेला मनापासून मानतो. आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली 'मराठी भाषा' आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून 'अभिजात भाषा' म्हणून गौरविली गेली आहे. अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ.स.पू.२०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ.स.पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली.

सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ.स.११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ.स.११९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्ररीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ,रामदास,श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते. आता ही भाषा जगभरात ७२ देशांमध्ये व भारतातील ३६ राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला १५ वा क्रमांक मिळाला. सुमारे ११ कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अती प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्षे जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुस-या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, 'अभिजात' भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता.

प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारठ्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटले आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे जुने असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून 'मराठी भाषेला' गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व १२ हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणा-या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सा-यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे.

एका बाजूला या सगळ्याचा जरी आनंद असला, तरी इतर भारतीय भाषांच्या तुलनेमध्ये मराठी भाषा ही आपल्या शहरात, राज्यात आजही परकीय आहे, दुय्यम स्थानावर आहे असे व्यवहारात वागत असताना जाणवते. आपल्या शहरात, राज्यात येऊन वर्षानुवर्ष राहणारे बॉलीवूडमधील कलाकार असतील, कॉर्पोरेटमधील अधिकारी असतील, नोकरी करणारे व्यावसायिक असतील, त्यांना आजही मराठी भाषा येत नाही, मराठी भाषा बोलली पाहिजे, असे वाटत नाही. आपल्या मुलांना मराठी सरकारी शाळेत दाखल करणे आणि त्या शाळांचा दर्जा उत्तम राहील, यासाठी प्रयत्न करणे मराठी पालकांना महत्त्वाचे वाटत नाही. मराठी सिनेमा, नाटक, साहित्य याला फार मोठी परंपरा आहे; परंतु ही परंपरा चढत्या क्रमाने पुढे जात राहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. तसे घडताना दिसत नाही किंबहुना हा दर्जा ढासळतो आहे, असेच वाटत आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने केवळ एक दिवस चर्चा करायची आणि एरवी आपली मुले देखील इंग्रजी शाळेत पाठवायची, याला काय म्हणावे? खरे तर आपल्या भाषेतील शब्दांचा वापर आणि जपणूक झाली पाहिजे. तसेच इतर भाषांमधील तंत्रज्ञानाशी संबंधित शब्द हे त्याच्या अर्थासहित समजून घेऊन आपल्या भाषेत त्यासाठी पर्यायी शब्द निर्माण झाले पाहिजेत. यासाठी भाषेवर प्रेम करणा-यांनी जागरूक असायला हवे. तसा कोणताही प्रयत्न मराठी भाषेच्या संवर्धनाच्या बाबतीत होताना दिसत नाही. मराठी भाषा शिकवणा-या प्राध्यापकांच्या मराठी भाषेचे वाचन आणि शिकवणे याविषयी चिंता करावी, अशी परिस्थिती अलीकडे अनेक महाविद्यालयात अनुभवायला मिळते. म्हणून केवळ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचा आनंद व्यक्त करणे पुरेसे नाही. आपण सर्वच मराठी माणसांनी जाणीवपूर्वक आपली भाषा ही इतर भाषिकांनी शिकावी त्यातले ज्ञान, परंपरा, त्यातील शब्द सौंदर्य आणि शब्द संपदा आणि श्रीमंती इतरांनाही आपल्याला अनुभवायला देता यावी.

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ
७४९८८८५०६१

## त-ड-का

### अभिजात दर्जा ,पण..?

अभिजात दर्जा मिळाला
म्हणजे भाषेचा होईल
विकास
असे समजत असाल तर-
निश्चित होईल भ्रम निराश
..

हां,सवलती लाटता येतील
यात शंका नाही काही,पण
मराठीचा चौफेर डंका
वाजेल
याची सुतराम शक्यता
नाही..
कारण..
इंग्रजांचा आमच्यावर
पडला एवढा प्रभाव
आम्ही मराठीत बोलणेही
कमी समजतो ना राव..

मायबोलीचा हहदयी
असला पाहीजे अभिमान
मराठितच बोलू लिहूची
आता सारे घेऊ या आण
..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

# पाली आणि मराठी : अभिजाततेतून ज्ञानपरंपरेचा गौरव

**भा**षा म्हणजे केवळ संवादाचे साधन नाही, तर समाजाची स्मृती आणि ज्ञानपरंपरा असते. म्हणूनच एखाद्या भाषेला अभिजात दर्जा मिळणे ही तिच्या साहित्यिक योगदानाची अधिकृत दखल असते.३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने पाली, मराठीसह ५ भाषांना अभिजात दर्जा दिला. त्यामुळे देशातील अभिजात भाषांची संख्या ११ झाली आहे. पाली आणि मराठीत कोणती अधिक अभिजात असा क्रम सरकारने लावलेला नाही.

**पालीचे महत्त्व:-** पाली ही बौद्ध ज्ञानपरंपरेची भाषा. त्रिपिटक, विनयपिटक, सुत्तपिटकातून प्राचीन समाजजीवन आणि तत्त्वज्ञान समजते. श्रीलंका, म्यानमार, थायलंडपर्यंत तिचा प्रभाव आहे. तिच्या हस्तलिखितांचे जतन आणि डिजिटलायझेशन गरजेचे आहे.

**मराठीची परंपरा:-** मराठीची मुळे अडीच हजार वर्षांहून जुनी - महारठी, महाराष्ट्री प्राकृतपासून आजपर्यंत. ज्ञानेश्वरी, नामदेव-तुकारामांचे अभंग, एकनाथांचे साहित्य यांनी तिला सामाजिक आशय दिला. पुढे कथा, कादंबरी, नाटक, पत्रकारितेतून ती आधुनिक झाली.

**अभिजाततेचा अर्थ काय?**

अभिजात म्हणजे दुसऱ्या भाषेपेक्षा श्रेष्ठ नव्हे. तर त्या भाषेच्या स्वतंत्र ऐतिहासिक योगदानाची दखल. पालीने बौद्ध तत्त्वज्ञान जपले, मराठीने सामाजिक-सांस्कृतिक अनुभवाला अभिव्यक्ती दिली.

महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा दिवस' घोषित केला आहे. या दिवसाचा उत्सव केवळ भाषणांपुरता न ठेवता ग्रंथप्रदर्शन, वाचन, संशोधन आणि अनुवादातून साजरा झाला पाहिजे.

**खरी सार्थकता** - या भाषांतील ज्ञान आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाशी जोडण्यात आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# तरुण मतदान व राजकीय पक्षांपासून दूर होणार...?

**भा**रतीय लोकशाहीचा सर्वात मोठा आधार म्हणजे मतदार. त्यातही सर्वात निर्णायक घटक आहे तरुण मतदार. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १८ ते २९ वयोगटातील मतदारांचे प्रमाण २२.७८ टक्के होते. म्हणजे देशातील दर चार मतदारांपैकी एक तरुण होता. ही आकडेवारीच सांगते की तरुणांशिवाय कोणत्याही पक्षाचे राजकारण पूर्ण होऊ शकत नाही.म्हणून आजचा खरा प्रश्न असा आहे - तरुणांना राजकारणाची गरज आहे की राजकारणाला तरुणांची?

'युवा' शब्द उलटा वाचला की 'वायु' होतो, असे म्हटले जाते. ही केवळ शब्दांची गंमत नाही. वाऱ्याची दिशा बदलण्याची ताकद जशी असते, तशीच राजकीय वातावरणाची दिशा बदलण्याची ताकद तरुणाईत आहे. नेपाळमधील Gen-Z आंदोलनाने हे जगाला दाखवून दिले आहे.मात्र आजच्या राजकीय वातावरणात एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे - नवे कार्यकर्ते घडत आहेत की तयार कार्यकर्त्यांचा उत्साहच संपत चालला आहे?

**तरुण आठवतो कधी?**

प्रत्येक पक्षात युवा आघाड्या आहेत, पदाधिकारी आहेत, मेळावे आहेत, सोशल मीडिया टीम आहे. पण निर्णयाच्या टेबलावर तरुण कुठे आहे?निवडणूक आली की तरुण आठवतो.सोशल मीडिया प्रचार करायचा की तरुण आठवतो.मोर्चा काढायचा की तरुण आठवतो.गर्दी जमवायची की तरुण आठवतो.

घोषणा द्यायच्या की तरुण आठवतो.पण उमेदवारी द्यायची वेळ आली, संघटनेत महत्त्वाची जबाबदारी द्यायची वेळ आली की तोच तरुण मागे पडतो.

**मेहनत कार्यकर्त्याची, संधी दुसऱ्याची?**

एखादा तरुण वर्षानुवर्षे पक्षासाठी राबतो. आंदोलने करतो, संघटना उभी करतो, लोकांचे प्रश्न मांडतो. पण ऐन निवडणुकीत त्याच्या हक्काच्या जागेवर नेत्याचा मुलगा, मुलगी किंवा नातेवाईक येतो, ही भावना आज अनेक कार्यकर्त्यांमध्ये आहे.राजकीय वारसा असणे हा गुन्हा नाही. प्रत्येकाला राजकारणात येण्याचा अधिकार आहे. प्रश्न फक्त समान संधीचा आहे. जर तरुणाला असे वाटू लागले की 'कितीही काम केले तरी संधी शेवटी घराणेशाहीतल्यालाच मिळणार', तर त्याचा उत्साह मावळणे स्वाभाविक आहे.आजच्या तरुणाला केवळ पोस्टर लावणारा, सोशल मीडिया पोस्ट करणारा, गर्दी जमवणारा 'फूट सोल्जर' म्हणून वापरण्याची मानसिकता पक्षांनी बदलायला हवी. त्याच्यात नेतृत्व करण्याची क्षमताही आहे. त्याला स्थानिक पातळीपासून निर्णयप्रक्रियेपर्यंत जबाबदारी द्यावी लागेल.

**निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास**

हा प्रश्न केवळ पक्षांपुरता नाही, तो निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासाशीही जोडलेला आहे. निवडणूक आयोगाने स्वतः मान्य केले आहे की युवक आणि प्रथमच मतदान करणाऱ्यांमध्ये उदासीनता वाढत आहे. म्हणूनच २०२४ पूर्वी आयोगाने "Turning 18' अभियान राबवले होते.दुसरीकडे SIR, मतदार यादीतील घोळ, Form 6 आणि निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर उपस्थित होणारे प्रश्न यामुळे संभ्रम वाढतोय.

**- अमोल पाटील भारसाकळे,**
अमरावती

# संयमाचा धडा

फ्लाय दुबईच्या विमानात कॅप्टन स्मित मच्छार यांनी दाखवलेले धाडस हा केवळ चित्रपटातील प्रसंग नाही, तर आपल्या सर्वांसाठी मोठा धडा आहे.या घटनेतून तीन गोष्टी स्पष्ट होतात.पहिली, संकटकाळी विवेक ढळू न देणे हेच खरे शौर्य.गंभीर जखमी असतानाही त्यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्याचा निर्णय घेतला नसता तर १७४ कुटुंबे उद्ध्वस्त झाली असती.दुसरी, विमान सुरक्षा केवळ प्रवाशांसाठीच नसावी. सह-वैमानिकासारख्या विश्वासू पदावरील व्यक्तीचीही नियमित मानसिक आणि वैचारिक तपासणी झाली पाहिजे. एवढे घातक हत्यार कॉकपिटमध्ये कसे गेले, हा प्रश्न गंभीर आहे.तिसरी, सामान्य नागरिकही हिरो होऊ शकतात. त्या प्लंबर प्रवाशाने आणि ऑफ-ड्यूटी पायलटांनी दाखवलेली तत्परता वंदनीय आहे.या घटनेतून नागरी उड्डाण महासंचालनालय (डिजीसीए) आणि जगभरातील विमान कंपन्यांनी बोध घेऊन वैमानिकांचे समुपदेशन आणि कॉकपिट सुरक्षा अधिक कडक करावी.

**- प्रा. विजय कोष्टी**




# डिजिटल शॉर्टकट की मानसिक अधःपतन

**आ**जचे युग तंत्रज्ञानाचे असून 'एआय' सारख्या साधनांमुळे विद्यार्थ्यांना क्षणात उत्तरे मिळत आहेत. परंतु, या शॉर्टकटच्या सवयीमुळे मुलांची विचार व तर्क करण्याची क्षमता मंदावत चालली आहे. परीक्षेच्या वेळी किंवा अपयशाच्या काळात हे डिजिटल आधार मागे पडल्यावर विद्यार्थ्यांच्या मनात प्रचंड भीती निर्माण होते. आगदी आयआयटीसारख्या



उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांनाही मानसिक दबावाचा सामना करावा लागत असून, लहान-सहान अपयशाने नैराश्यातून मुले टोकाचे पाऊल उचलत आहेत, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे.या समस्येमागे पालकांच्या अवास्तव अपेक्षा, समाजाचा दबाव आणि गुणांची व टक्क्यांची बनलेली शिक्षण पद्धती ही अनेक कारणे दडलेली आहेत. पाल्याने प्रत्येक परीक्षेत अव्वल राहावे, या अवाढव्य अपेक्षांचे ओझे लहानपणापासूनच मुलांवर लादले जाते.यावर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी यंत्रांवर पूर्णपणे अवलंबून न राहता स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे.

**वर्षा आवद**

# ट्रॅकवर 'भारतकन्यां'ची सुवर्णभरारी; पण पदकतालिकेत सुवर्णाचा दुष्काळ!

१९ सप्टेंबर २०२६ पासून जपानमधील आईची-नागोया येथे सुरू झालेल्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पदकांच्या शर्यतीत आपले कसब पणाला लावले आहे. स्पर्धेच्या सुरुवातीच्या काही दिवसांत ट्रॅक आणि मैदानी खेळांमध्ये भारताची सुरुवात काहीशी संथ झाली होती. मात्र, ३० सप्टेंबर २०२६ हा दिवस भारतीय क्रीडा इतिहासात एका नव्या ऊर्जेचा संचार करणारा ठरला. महिलांच्या ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत किरण, पूवम्मा, प्राची आणि विथ्या रामराज या भारतीय चौघडीने ट्रॅकवर अक्षरशः आग ओकली. ३ मिनिटे २९.६९ सेकंद अशी सर्वोत्तम वेळ नोंदवत या कन्यांनी भारताला यंदाच्या स्पर्धेतील ॲथलेटिक्समधील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. हा विजय सोपा नव्हता, कारण त्यांच्या पाठोपाठ बहरीन (३ मिनिटे ३०.२१ सेकंद) आणि चीन (३ मिनिटे ३१.०२ सेकंद) यांसारख्या तगड्या देशांचे आव्हान होते. पण भारतीय खेळाडूंनी कमालीचा समन्वय आणि शेवटच्या क्षणापर्यंत न हरलेली जिद्द दाखवत सुवर्णावर मोहोर उमटवली. याआधी क्रिकेट, कबड्डी आणि नेमबाजीमध्ये भारताने सुवर्ण पटकावले होते, मात्र ट्रॅकवरील या सुवर्णाची चमक काही औरच आहे.

या विजयाची सर्वात मोठी शिल्पकार ठरली ती धावपटू विथ्या रामराज. कोणत्याही खेळाडूसाठी एकाच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन पदके जिंकणे हे सर्वोच्च शिखरावर पोहोचण्यासारखे असते. विथ्यासाठी ही स्पर्धा अशीच ऐतिहासिक ठरली. याआधी




४०० मीटर अडथळा शर्यतीत तिने स्वतःला सिद्ध करत कांस्यपदक खिशात घातले होते आणि आता रिलेच्या माध्यमातून तिने थेट सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. महिलांपाठोपाठ याच दिवशी भारतीय पुरुष संघानेही आपली ताकद दाखवून दिली. धर्मवीर चौधरी, मनू थेक्किनालिल, विशाल थेन्नरसू आणि जय कुमार यांच्या संघाने ४ बाय ४०० मीटर पुरुष रिले शर्यतीत ३ मिनिटे ०१.६१ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्यपदक खेचून आणले. या शर्यतीत जपानने सुवर्ण आणि कतारने रौप्यपदक पटकावले.

परंतु, या भावूक आणि अभिमानास्पद क्षणांच्या पलिकडे जाऊन आपण वास्तवाच्या पदकतालिकेचे कठोर विश्लेषण करणे गरजेचे आहे. गतवर्षीच्या म्हणजे २०२३ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेशी या कामगिरीची तुलना केली, तर अनेक गोष्टी स्पष्ट होतात. चीनमधील त्या स्पर्धेत भारताने ऐतिहासिक कामगिरी करत २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य अशी तब्बल १०७ पदके जिंकली होती आणि पदकतालिकेत चौथे स्थान पटकावले होते. त्यावेळी पुरुष रिले संघाने सुवर्ण तर महिलांनी रौप्य जिंकले होते. आज नागोयामध्ये हे चित्र पूर्णपणे उलट झाले आहे. मागील स्पर्धेत केवळ ॲथलेटिक्समधून भारताला २९ पदके मिळाली होती. यंदा मात्र नीरज चोप्रासारख्या हुकमी सुवर्णपदक विजेत्या खेळाडूची अनुपस्थिती भारताला प्रकर्षाने जाणवत आहे. एखाद्या महान खेळाडूचे नसणे देशाच्या एकूण सुवर्णसंख्येवर किती मोठा परिणाम करू शकते, हे यावरून दिसून येते.

भारताने पदकांचे अर्धशतक ओलांडले असून एकूण ५६ पदके (८ सुवर्ण, २१ रौप्य, २७ कांस्य) आपल्या खात्यात जमा केली आहेत. पण तरीही भारत पदकतालिकेत नवव्या स्थानावर का फेकला गेला आहे? या प्रश्नाचे उत्तर जागतिक क्रीडा क्षेत्राच्या एका निष्ठूर नियमात दडलेले आहे.जागतिक स्तरावर भारताची खरी ताकद दाखवून द्यायची असेल, तर कुस्ती, बॉक्सिंग आणि तिरंदाजी यांसारख्या उर्वरित खेळांमधून भारताला केवळ पदके नव्हे, तर 'सुवर्णपदके'च खेचून आणावी लागतील.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
वर्धा,मो.९५६१५९४३०६

### अमरावती शिक्षक मतदारसंघः

# महायुतीत देशपांडेंचे बंडखोरीचे संकेत, तर कॉंग्रेसकडून प्रा.अदिती पोहरे रिंगणात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून एकीकडे महायुतीत उमेदवारीवरून पेच निर्माण झाला आहे, तर दुसरीकडे महायुतीपूर्वीच कॉंग्रेसने आपली उमेदवारी निश्चित करत आघाडी घेतली आहे.

अमरावती शिक्षक मतदारसंघाची जागा महायुतीत शिवसेना (शिंदे गट) सोडली जाण्याचे संकेत मिळताच पक्षांतर्गत रस्सीखेच सुरू झाली आहे. विद्यमान आमदार किरण सरनाईक आणि माजी आमदार प्रा.श्रीकांत देशपांडे हे दोघेही उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. मात्र, महायुतीची अधिकृत घोषणा होण्याआधीच प्रा. श्रीकांत देशपांडे यांनी गुरुवारी दिनांक १ ऑक्टोबर रोजी पक्षाकडून एक आणि अपक्ष म्हणून एक, असे दोन नामनिर्देशन अर्ज दाखल करून महायुतीत बंडखोरीचे संकेत दिले आहेत.

१९९२ पासून शिवसेनेत कार्यरत असल्याचे सांगत देशपांडे म्हणाले, तिकिटावर माझाच पहिला अधिकार आहे. पक्षाने उमेदवारी नाकारली तरी मी शिक्षक आघाडीच्या बॅनरखाली ही निवडणूक लढवणारच आहे. दुसरीकडे भाजपकडून



डॉ. अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे आणि चंद्रशेखर भोयर हेदेखील इच्छुक असल्याने महायुतीची डोकेदुखी वाढली आहे.

प्रा. अदिती पोहरे यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश-महायुतीचा पेच सुरू असतानाच कॉंग्रेसने मात्र आपला उमेदवार निश्चित केला आहे. प्रा. अदिती ऋषिकेश पोहरे यांनी मुंबईतील टिळक भवनात कॉंग्रेसचे राज्य प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत कॉंग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

पक्षप्रवेशापाठोपाठ यशोमती ठाकूर यांनी अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी प्रा. अदिती पोहरे यांच्या उमेदवारीची घोषणा केली. आदिती पोहरे शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री हर्षवर्धन ऊर्फ भैय्यासाहेब देशमुख यांची मुलगी तथा देशोन्नती चे संपादक प्रकाश पोहरे यांच्या सून आहेत. विद्यमान आमदार किरण सरनाईक यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर रोजी संपत असल्याने अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांत पसरलेल्या या मतदारसंघात २३ऑक्टोबर रोजी निवडणुक होते आहे.

# ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे खेळाडूंना मिळणार घरबसल्या ‘क्रीडा ई-प्रमाणपत्र’

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने खेळाडूंसाठी ‘क्रीडा ई-प्रमाण’ ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे खेळाडूंना घरी बसून अत्यंत सोप्या पद्धतीने आपले क्रीडा ई-प्रमाणपत्र मिळवता येणार आहे.

ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे, ज्यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल. खेळाडूने पोर्टलवर माहिती भरल्यानंतर, ती मूळ डेटाशी जुळल्यास अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होणार आहे. तसेच, प्रत्येक प्रमाणपत्रावर एक क्युआर कोड सुरक्षा असेल. नियुक्ती प्राधिकारी हा क्युआर कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.



महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता हे ‘क्रीडा ई-प्रमाणपत्र’ जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतली आहे, त्यांनाही आगामी भरती प्रक्रियेसाठी या नवीन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे.

या प्रणाली अंतर्गत ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे क्रीडा संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख (रेकॉर्ड्स) ’क्रीडा ई-प्रमाण’ पोर्टलवर अपलोड केले जात आहेत. अधिकृत स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता क्रीडा विभागाच्या sports.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपली नोंदणी पूर्ण करावी आणि प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.कबड्डी,फेन्सिंग,ट्रायथलॉन (२०२५ ची स्पर्धा),ज्युडो (२०२४ ची स्पर्धा),कुराश (२०२४-२५ व २०१७-१८) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध आहेत, त्याच खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत. इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी नोंदणी करावी,इतर अभिलेख देखील अपलोड करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी कळविले आहे.

# घरगुती गणेश सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## तुषार आढळगे प्रथम; दोन बहिणीं द्वितीय, मोहित इंगोले तृतीय

**टाकरखेडा शंभू/प्रतिनिधीः-** वलगाव नगरीत मागील दोन वर्षांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या घरगुती गणेश सजावट स्पर्धेला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत वलगावातील अनेक गणेशभक्तांनी सहभाग घेत आपल्या घरातील गणेश सजावटीचे छायाचित्रे पाठविली.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे बक्षीस दिनेश कुऱ्हेकर यांच्या हस्ते तुषार संजय आढळगे यांना देण्यात आले. त्यांनी पर्वताचा देखावा साकारत गायीच्या गोमुखातून महादेवाच्या पिंडीवर पाणी पडत असल्याचे दृश्य तसेच पक्ष्यांची किलबिल असा आकर्षक देखावा साकारला होता.

द्वितीय क्रमांकाचे बक्षीस अजय वासनकर यांच्या हस्ते अंशिता गौरव शिरभाते आणि श्रीजल निलेश शिरभाते या बहिणींना देण्यात आले. त्यांनी कैलास पर्वताचा देखावा साकारला होता.

तृतीय क्रमांकाचे बक्षीस पियुष तिखे यांच्या हस्ते मोहित शरद इंगोले यांना देण्यात आले. त्यांनी कार्डबोर्डपासून शिवनेरी किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली होती.

स्पर्धेत सहभागी झालेल्या उर्वरित ११ स्पर्धकांना हर्षल तिखे यांच्या वतीने फोटो फ्रेम देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेला वलगाववासीयांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजकांनी सर्वांचे आभार मानले.

# मध्यवर्ती कारागृहात अभिविक्षक मंडळाची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

## -आधुनिक पाकगृहाचे उद्घाटन, सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** मध्यवर्ती कारागृह येथे मंगळवारी, दि. २९ सप्टेंबर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली कारागृह अभिविक्षक मंडळाची त्रैमासिक बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील प्रमुख सर्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांच्या प्रतिनिधींसह कारागृहातील संपूर्ण परिसराची पाहणी केली. त्यांनी पाकगृह, रुग्णालय, मुलाखत कक्ष, धान्य गोदाम, उपहारगृह, सुतारकाम विभाग, ग्रंथालय, रेडिओ कक्ष, मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्ष, बंदी बरॅक आणि अतिसुरक्षा कक्षाला भेट देऊन माहिती घेतली व समस्या जाणून घेतल्या.

तसेच, डीपीडीसी अंतर्गत आधुनिकीकरण करण्यात आलेल्या नवीन पाकगृहाचे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. आधुनिक सोयीसुविधांनी युक्त काम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. याशिवाय व्हीसी क्युबिकल्स कक्षास भेट देऊन ऑनलाइन कोर्टपेशी, वकील व नातेवाईकांच्या मुलाखतींच्या सादरीकरणाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या.



कारागृहातील विद्युत व्यवस्था विनाखंड सुरू राहण्यासाठी एक्स्प्रेस फीडर बसवून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच वायरिंग दुरुस्तीची कामे डीपीडीसी निधीतून पूर्ण करण्याचे निर्देश दिले. सुरक्षेच्या कारणास्तव कारागृहाबाहेरील हायवेच्या बाजूने व्ह्यू-कटर बसवण्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. बंद्यांना वेळेवर न्यायालयात आणि वैद्यकीय उपचारासाठी नेण्यासाठी पोलीस पथकाची कमतरता भासू नये, म्हणून कारागृह व पोलीस विभागाने दरमहा समन्वय बैठक घेण्याच्या सूचना दिल्या. बंद्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी ’कार वॉशिंग सेंटर’चे काम पूर्ण करण्याचे आणि सोलर प्रशिक्षणासोबतच इतर नवीन कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्याचे निर्देश दिले. ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करणे, ई-बाईक, सोलर यंत्रणा आणि इतर पायाभूत सुविधा वाढवण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आली.

या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनावणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी नरेंद्र वानखेडे, अशासकीय सदस्य धनानंद नागदिवे, कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी, उपअधीक्षक प्रदीप इंगळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी देवराव जाधव, अंतर्गत सुरक्षा अधिकारी धनसिंग कवाळे, तुरुंगाधिकारी हेमंत इंगोले, कारागृह शिक्षक ललित मुंडे, संजय घोलप उपस्थित होते.

# उंचउडीत आरती अतकरेची जिल्हास्तरावर भरारी

## तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत प्रथम



**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार येथील तालुका क्रीडा संकुलात २९ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत टाकरखेडा पूर्णा येथील नारायण कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती मनोज अतकरे हिने उल्लेखनीय यश संपादन केले. अंडर-१७ उंचउडी या क्रीडा प्रकारात तिने प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

आरती ही नारायण कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावी (कला) मध्ये शिक्षण घेत आहे. मेहनत, सराव आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे यश मिळविले असून, आपल्या यशाचे श्रेय तिने आई-वडील व बहिणीला दिले आहे.

आरतीच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा तथा माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख आणि संस्थेचे सचिव प्रा. अभय देशमुख यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आरतीचे कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ३५ वर्षांची पोलिससेवा पूर्ण; दोघांना सन्मानपूर्वक निरोप

## जामनेकर, सरोदे सेवानिवृत्त; तिघांना पदोन्नतीचे ‘स्टार’

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलिस दलातील प्रदीर्घ सेवेला निरोप देताना दोन अधिकारी-कर्मचाऱ्यांचा कौटुंबिक वातावरणात सत्कार करण्यात आला. त्याचवेळी तीन पोलिस कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा ‘पिपिंग सेरेमनी’ सोहळाही पार पडला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या दालनात बुधवारी (दि.३०) हा कार्यक्रम झाला.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक विलास जामनेकर आणि पोलीस हवालदार अजय सरोदे यांचा पोलीस आयुक्तांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यांना पोलीस महासंचालकांचे शुभेच्छापत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पेन्शन ऑर्डर आणि सेवानिवृत्ती प्रमाणपत्र देण्यात आले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या



पत्नींचाही साडी आणि कुंडीतील रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. सेवाकाळातील अनुभवाचा लाभ भविष्यातही पोलिस विभागाला मिळावा, अशी अपेक्षा आयुक्त राकेश ओला यांनी व्यक्त केली. निवृत्तीनंतर आर्थिक गुंतवणूक करताना संबंधित व्यक्ती किंवा संस्थेची विश्वासार्हता तपासण्याचा सल्लाही त्यांनी दिला. दरम्यान, एका पोलिस हवालदाराला सहायक पोलिस उपनिरीक्षकपदी, तर दोन पोलिस नाईकांना पोलिस हवालदारपदी पदोन्नती देण्यात आली.



कुटुंबीयांच्या उपस्थितीत त्यांच्या गणवेशावर पदोन्नतीचे ‘स्टार’ लावण्यात आले. पदोन्नतीनंतर जबाबदारी वाढते. कर्तव्याला प्राधान्य देत कनिष्ठ कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले. कार्यक्रमाला डीसीपी शाम घुगे, यशवंत सोळंके, प्रांजली सोनवणे यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते.

# रात्रीच्या अंधारात रेतीची वाहतूक

## १५.६९ लाखांचा ट्रॅक्टर जप्त

**धारणी/प्रतिनिधीः-** रात्रीच्या सुमारास परवानगीशिवाय नदीतील रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर महसूल पथकाने कारवाई केली. खापरखेडा ते चौखंडा मार्गावर २२ सप्टेंबर रोजी पहाटे १.४५ वाजता ही कारवाई करण्यात आली.

### खापरखेडा-चौखंडा मार्गावर कारवाई

ग्राम महसूल अधिकारी स्वाती प्रदीप जावरकर यांच्या तक्रारीनुसार, एमएच ४९ एटी १८३३ क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून रेतीची वाहतूक होत असल्याचे आढळले. तपासणीदरम्यान चालकाकडे रेती वाहतुकीचा वैध परवाना नसल्याचे समोर आले.

ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये सुमारे सहा ब्रास रेती असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जप्त रेतीची किंमत अंदाजे ६९ हजार ३३३ रुपये असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले. तसेच ट्रॅक्टर-ट्रॉलीची किंमत सुमारे १५ लाख रुपये आहे. महसूल पथकाने वाहन ताब्यात घेतल्यानंतर संबंधित प्रकरण पोलिसांकडे सोपविण्यात आले. याप्रकरणी धारणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात महसूल विभागाकडून सुरू असलेल्या कारवाईचा हा एक भाग असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. जप्त करण्यात आलेल्या वाहनासंदर्भात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण, पाणीटंचाई निवारणाची कामे करावीत

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** या वर्षीचा मान्सूनचा कालावधी संपला असून यापुढे पावसाची शक्यता नाही. येत्या काळात पाणीटंचाईचे स्वरूप जाणवणार आहे. त्यामुळे सध्या निर्माण झालेल्या वैश्विक संकटाचा सामना करण्यासाठी जलसंधारण आणि पाणीटंचाई निवारणाच्या कामांवर सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात तालुका दुष्काळ निवारण व व्यवस्थापन आराखडा कार्यशाळा आज पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपवनसंरक्षक के. अर्जुना उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीबाबत करावयाच्या उपाययोजनांची सुमारे नऊ तास विविध विभागांशी चर्चा करण्यात आली.



जिल्हाधिकारी येरेकर यांनी, तालुकानिहाय दुष्काळाची स्थिती जाणून घेतली. त्यासोबतच जिल्ह्यात उपलब्ध असलेला चारा आणि भविष्यात शासनाच्या प्रयत्नातून चाऱ्याचे उत्पादन वाढविण्याबाबत चर्चा केली. सद्यस्थितीत जिल्ह्यात पुरेसा चारा उपलब्ध आहे. शासनाच्या पुढाकारातून गाळपेर जमीन किंवा शासनाच्या जागा उपलब्ध करून चारा उपलब्ध करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यासोबतच उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यावर कमी पाण्यात रब्बीचे पिके घेणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गव्हापेक्षा हरभरा, मोहरी आदी कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांकडे वळविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मान्सूनचा कालावधी संपलेला असल्यामुळे जलसंधारणाची कामे तातडीने सुरू करता येणे शक्य आहे. ही कामे आतापासूनच सुरू केल्यास येत्या मान्सूनमध्ये अपुरा पाऊस पडला तरी यातून जल पुनर्भरणाची कामे चांगल्या पद्धतीने होऊ शकणार आहे. त्यामुळे सर्व विभागांनी समन्वयाने कामे करून जलसंधारणाच्या कामाला तातडीने सुरुवात करावी.

अल निनो हे वैश्विक संकट आहे. मात्र या संकटाचा सामना संधी म्हणून करण्याचा दृष्टिकोन सर्व विभागांनी करावा. पिके घेण्याच्या पद्धती बदल ते जैविक शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता करावी लागणार आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# प्राथमिक आरोग्य केंद्र चंद्रपूर येथे दोन दिवसीय आरोग्य शिबिर

**खल्लार/प्रतिनिधीः-** प्राथमिक आरोग्य केंद्र, चंद्रपूर येथे दोन दिवासीय आरोग्य प्रशिक्षण शिबिर पार पडले. या शिबिरात १३ प्रमुख आरोग्य सेवाबाबत मार्गदर्शन करुन माहिती देण्यात आली. आरोग्य सेवा कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबविणे, येणाऱ्या अडचणी दूर करणे, आरोग्य सेवाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.



प्रशिक्षणासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षक म्हणून डॉ. शुभांगी दिघाडे, डॉ. आनंद पाटील, डॉ. प्रशांत इंगळे, डॉ. आनंद उल्हे, जिरापुरे, ढोले, निशांत सरप यांच्यासह प्रशिक्षकांची टीम उपस्थित होती. प्रशिक्षकांनी विविध विषयावर मार्गदर्शन करुन प्रशिक्षणार्थी यांच्या शंकांचे निराकरण केले. पहिल्या दिवशी राज्यस्तरीय पर्यवेक्षक डॉ. शेवाळे, ढोबळे, साखरे, लाटकर यांनी भेट देऊन पाहणी केली. हे प्रशिक्षण जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण परिसे, डॉ. जोत्सना देशमुख, डॉ. रविंद्र सिरसाट तालूका आरोग्य अधिकारी डॉ. राहुल उमप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते. दोन दिवसीय आरोग्य प्रशिक्षण शिबिर यशस्वी करण्यासाठी चंद्रपूर आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेयस काळे, डॉ. अश्विनी देवके यांच्यासह कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर सुचना

सर्व जनतेस सूचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **सौ.शशीकला हेमंत कनकधर, राहणार अमरावती** यांनी **श्रीमती जशोदाबाई देवकिसनजी चितलांगे, रा.स्वस्तीक नगर, अमरावती** यांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णनांकित मालमत्ता/प्लॉट विकत घेण्याचा सौदा केला असून त्याबाबतचे टोकन सुध्दा दिले आहे त्या मालमत्तेचे /प्लॉटचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे/प्लॉटचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हददीतील **मौजे-सातुर्णा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे क्र.३३, साईबाबा नगर** या नावाने ओळखल्या जाणा-या जमीनीतील **प्लॉट क्र.८१** याची लांबी रुंदी ५५ x ७२ फुट, एकूण क्षेत्रफळ ३९६० चौ.फुट पैकी पश्चिमेकडील अर्धा प्लॉट याची लांबी रुंदी पुर्व-पश्चिम लांबी २७.५ मी. व उत्तर-दक्षिण लांबी २७.०० मी. (२७.५ मी.x २७.०० मी.= ७४२.५ चौ.फुट) असे **एकंदर क्षेत्रफळ ६९.१८ चौ.मी.(७४२.५ चौ.फुट)** तसेच त्यालाच लागून असलेला (२७.५ मी x २७.०० मी.= ७४२.५ चौ.फुट) असे **एकंदर क्षेत्रफळ ६९.१८ चौ.मी.(७४२.५ चौ.फुट)** असा एकत्रित (Combine)१४८५ चौ.फुट असून याची एकत्रित चतु:सिमा येणेप्रमाणे - पुर्वेस -ले आउट रोड, पश्चिमेस - श्री देशपांडे यांचा प्लॉट क्र.८२ व घर, उत्तरेस- अग्रवाल यांचे घर, दक्षिणेस - सर्व्हिस लाईन.

सबब वरील वर्णन केलेल्या प्लॉटबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोजा,बक्षीस,वारसा हक्क, कुळहितसंबंध इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध पुर्वीचा करार व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह प्रत्यक्ष संपर्क साधावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार वर नमुद प्लॉटचे खरेदीखत नोंदणीकृत करून देतील, त्यानंतर कोणाचेही कुठल्याही प्रकारची हरकत नगर उजर चालणार नाही कृपया याची आम जनतेने नोंद घ्यावी.

**दिनांक ०३.१०.२०२६**

**सही/-**
**किशोर ना.सुरोशे ॲडव्होकेट**
छांगाणी नगर, दुर्गा विहार जवळ,
अमरावती- ४४४६०५
मो.- ९४२०८३४८७६

## जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सूचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **गजानन हिंमतराव कराळे, रा.रेवसा, ता.जि.अमरावती** यांनी **१)वामनराव भिमराव वासनकर २) नंदकिशोर भि.वासनकर,३) संतोष भि.वासनकर, ४) ओमप्रकाश भि.वासनकर, ५) विलास भि.वासनकर, रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती व इतर चार बहिणी** यांचे मालकीची व ताब्यातील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे,

<u>त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे</u> :- नोंदणी तुकडी अमरावती पोट तुकडी मोर्शी, जि.प. कार्यालय अमरावती **मौजे- बहादूरपुर,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथील **शेत गट नं.६५/१,१ हे ६२ आर** तसेच **गट नं.६५/२, भो.वर्ग.१, क्षेत्रफळ ४ हे ७३ आर** दोन्ही शेताचे **एकुण क्षेत्रफळ ६ हेक्टर ३५ आर** शेतजमीन ज्याची चर्तुसिमा :-

पुर्वेस - अशोक पोहोकारचे शेत, पश्चिमेस - पंजाबराव चर्जन यांचे शेत , उत्तरेस- गणेश हिवसे यांचे शेत व रस्ता, दक्षिणेस - रामेश्वर पोहोकार यांचे शेत

सदर मालमत्तेसंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कर्ज, गहाण, बोझा, बक्षीस, वारसा, हक्क, पुवीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास खालील पत्यावर जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाचे आंत लेखी पुराव्यासह समक्ष संपर्क करावा. अन्यथा मुदतीनंतर माझे पक्षकार मालमत्तेचे खरेदीखत नोंदवुन घेईल. त्यानंतर कोणाचाही हरकत उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक ०२.१०.२०२६**
**अमरावती**

**सही/-**
**ॲड. मधुसुदन ओ.माहोरे**
**विलास कॉलनी, कठोरा नाक्या जवळ,**
**विमवि रोड, अमरावती**
**मो.- ९७३०४३४९६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### आशिष पटले थाळीफेक स्पर्धेत प्रथम



**शिराळा-** येथील कस्तुराबाई जैन विद्यालयातील विद्यार्थी आशिष उमेशराव पटले याने थाळी फेक स्पर्धेत तालुकास्तरावर १७ वर्षांखालील शालेय क्रिडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.अमरावती जिल्हा स्टेडीयम येथे सुरू असलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा चा विद्यार्थी आशिष पटले याने थाळी फेक शालेय क्रिडा स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. त्यानंतर त्याची निवड जिल्हास्तरावर होणाऱ्या शालेय क्रिडा स्पर्धेकरिता होणार आहे. त्याने आपल्या यशाचे श्रेय आई वडील व शिक्षकांना दिले आहे,तसेच मुख्याध्यापक एस.आ.देशमुख व सर्व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

### 'बाप्पाचा मान' उपक्रमातून गणेशोत्सवाच्या सर्जनशीलतेला नवा रंग

**अमरावती-** 'बाप्पाचा मान' या उपक्रमाच्या माध्यमातून अमरावतीमधील उत्सवी वातावरणाला एक नवा रंग दिला. या अनोख्या उपक्रमातून दरवर्षी बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज होणाऱ्या हाउसिंग सोसायट्यांची सर्जनशीलता, भक्ती आणि सामूहिक प्रयत्नांचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाला शहरातील अनेक हाउसिंग सोसायट्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.गणेश चतुर्थीच्या उत्सवी भावनेतून प्रेरित बिर्ला ओपस पेंट्सने 'बाप्पाचा मान' या उपक्रमांतर्गत हाउसिंग सोसायट्यांना त्यांच्या मंडपाच्या पार्श्वभूमीवर 'गणेशाज ड्रीम होम' साकारण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमासाठी अमरावतीमधून सुमारे ४९ प्रवेशिका प्राप्त झाल्या. या उपक्रमाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यावर देण्यात आलेला भर.या प्रवेशिकांमधून परंपरांचा सन्मान राखत पर्यावरणाप्रती असलेली जबाबदारीही जपण्याचा प्रयत्न दिसून आला.विजेत्या सोसायट्यांमध्ये बेस्ट बिर्ला ओपस 'हाऊस ऑफ गणपती'-ड्रीम प्राइड, तपडिया मॉलच्या मागे, मोस्ट युनिक मूर्ती–गार्डन सिटी, नवसारी, बेस्ट इको-फ्रेंडली मंडळ – साईनगर यांचा समावेश आहे.

### अंकुश रहाट यांच्या पाठपुराव्याने ट्रान्सफार्मर दुरुस्ती

**खल्लार-** खल्लार महावितरण उपकेंद्रातील शेतकऱ्यांना विजेच्या लपंडावा संदर्भात समस्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे



लागत आहे. माजी खा. नवनित राणा यांच्या दर्यापूर तालुका दुष्काळ पाहणी दौऱ्यात खल्लार महावितरण उपकेंद्रातर्गत शेतकऱ्यांना १२ तास शेती पंपाची विज नियमित उपलब्ध करून देण्याबद्दल त्यांनी महावितरण अधिकारी यांना निर्देश दिले होते.त्याच पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमाचे दर्यापूर तालुका संघटक अंकुश रहाटे यांनी खल्लार उपकेंद्रावरील विज पुरवठ्या संदर्भात पाठपुरावा करून व महावितरणचे अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे पाठपुरावा करुन तीन ट्रांसफार्मर दुरुस्ती व दोन नविन ट्रांसफार्मरचे काम करून घेतले.

# नाकाबंदी तोडून पळणाऱ्या दारू तस्कराचा पाठलाग

## कारसह १० पेट्या देशी दारू जप्त; २.६० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



रात्रीच्या वेळी नाकाबंदी तोडून भरधाव वेगाने पळणाऱ्या अवैध दारू तस्कराचा रहीमापूर पोलिसांनी थरारक पाठलाग करून त्याला अखेर जेरबंद केले. ही कारवाई १ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ९.५० वाजता करण्यात आली. या कारवाईत कारसह १० पेट्या देशी दारू, मोबाईल असा एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रहीमापूर पोलीस ठाण्याचे पोलीस हेकॉ. दिलीप विठ्ठलराव घोडे यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत कापूसतळणी येथून सातेगावच्या दिशेने पांढऱ्या रंगाच्या कारमधून अवैध देशी दारूची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन ग्राम मुराळा येथील शहानूर नदीच्या पुलावर नाकाबंदी केली.

दरम्यान, MH-४१-C-९६७४ क्रमांकाची मारुती सुझुकी झेन एस्टिलो कार भरधाव वेगाने येताना दिसली. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा इशारा केला; मात्र चालकाने नाकाबंदी तोडून वरुड खुर्दच्या दिशेने कार पळवून नेली. त्यानंतर पोलिसांनी शासकीय वाहनाने कारचा पाठलाग सुरू केला.

काही अंतरापर्यंत थरारक पाठलाग सुरू राहिल्यानंतर वरुड खुर्द गावातील अतुल काकड यांच्या घरासमोरील रस्ता संपल्याने संशयिताची कार अडकली. पोलिसांनी तातडीने कारला चहूबाजूंनी घेराव घालत चालकाला ताब्यात घेतले.

आरोपीची ओळख मोमीन उर्फ गोलू शेख कदीर (वय २९, रा. मुऱ्हा देवी) अशी झाली. पंचांसमक्ष कारची झडती घेतली असता डिक्कीत खाकी पुठ्ठ्याच्या १० पेट्या आढळल्या. त्यामध्ये 'गोल्डन संत्रा', 'टँगो पंच' आणि 'बॉबी संत्रा' या ब्रँडच्या एकूण १,००० सीलबंद प्लास्टिक पावत्या आढळून आल्या.जप्त मुद्देमालामध्ये ४० हजार रुपये किमतीची देशी दारू, २ लाख रुपये किमतीची मारुती झेन कार आणि २० हजार रुपये किमतीचा आयफोन असा एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रहीमापूर पोलीस करीत आहेत.

**पोलिसांच्या कारवाईचे कौतुक**

रात्रीच्या वेळी मिळालेल्या गोपनीय माहितीवर तातडीने कारवाई करत नाकाबंदी करणाऱ्या आणि नाकाबंदी तोडून पळणाऱ्या वाहनाचा पाठलाग करून आरोपीला पकडणाऱ्या रहीमापूर पोलीस पथकाचे कौतुक होत आहे. पोलीस हेकॉ. दिलीप घोडे आणि त्यांच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे अवैध दारू वाहतुकीवर पोलिसांनी प्रभावी कारवाई केल्याचे दिसून आले.

## मराठी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीस कृतीशील अभिवादन



**बेलोरा-** रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे महात्मा गांधी जयंती तसेच लाल बहादूर शास्त्री जयंतीच्या औचित्यावर कार्यक्रमासह स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्रतिमेस हारार्पण करत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्षपदी प्रा. डॉ. मनोज उज्जैनकर उपस्थित होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मनिष तिवारी उपस्थित होते.आपल्या कणखर नेतृत्वातून आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले असे प्रतिपादन प्रा. तिवारी यांनी केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉक्टर मनोज उज्जैनकर यांनी स्वलिखित 'गांधी के पथपर' या नाट्यमय विशिष्ट मजकूर वाचन करून उपस्थितांना महात्मा गांधीजींच्या जीवन कार्याची माहिती दिली प्रसंगी प्रा.श्रेयश कोल्हेकर यांनी आभार प्रदर्शन केले.याप्रसंगी डॉ. मनोज उज्जैनकर,प्रा. मनिष तिवारी, प्रा.सारिका उज्जैनकर,प्रा. हेमांगी सुर्यवंशी,डॉ. मनोज मुनेश्वर, डॉ. स्वाप्निल मुन,प्रा.श्रेयश कोल्हेकर आदी प्राध्यापकवृंद यांनी स्वच्छता मोहिमेत श्रमदान दिले. अतुल पडोळे,प्रफुल इखार,गोपाल खेसे,साहिल नेवारे, शुभम पंजाबी आदी कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात महत्वपूर्ण योगदान दिले.अशाप्रकारे महात्मा गांधी जयंती चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली.

## अस्मिता विद्यालय व विद्यामंदिरतर्फे स्वच्छता रॅली व स्वच्छता अभियान उत्साहात

**अमरावती/का.प्र.**



महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अस्मिता विद्यालय व अस्मिता विद्यामंदिर, पन्नालाल नगर, अमरावती यांच्या वतीने स्वच्छतेचे महत्त्व जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीद्वारे स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी अथर्व धाडस याने संत गाडगेबाबांची, तर कपिल मोहोड याने महात्मा गांधीजींची वेशभूषा साकारली. त्यांच्या वेशभूषेने रॅलीमध्ये विशेष आकर्षण निर्माण केले. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जनजागृतीपर घोषणा देत नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. त्यानंतर महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय यांच्या अंतर्गत असलेल्या अधीक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ बालगृह येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत परिसराची स्वच्छता केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जया आमले होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून विद्या कुदरे उपस्थित होत्या. यावेळी स्वच्छता कर्मचारी सतीश जी. गवई यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार सुमेध वानखेडे यांनी केले. या उपक्रमाचे अस्मिता शिक्षण मंडळाचे संस्थापक आदरणीय मुरलीधरराव भोंडे, सचिव प्रा.डॉ. मुकुल भोंडे, उपाध्यक्ष प्रभाकरराव बनसोड, सहसचिव ज्ञानेश्वरराव पाटील, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. श्रीकृष्ण सावरकर,कार्यकारिणी सदस्य प्रा. शशिकांत येवतकर तसेच अध्यक्षा प्राचार्य डॉ.मीनल भोंडे यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.

# आर्थिक नियोजन आणि सायबर सुरक्षेवरील कार्यशाळा उत्साहात

**परतवाडा-** भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील वाणिज्य विभागाच्या वतीने 'Financial Planning and Cyber Security' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. मयुरेश शिंगरुप यांनी 'Financial Planning and Cyber Security' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे महत्त्व, उत्पन्नाचे योग्य व्यवस्थापन, बचत, गुंतवणूक, डिजिटल आर्थिक व्यवहार आणि सायबर सुरक्षेच्या उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



अनिल खांडेकर होते. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता आणि डिजिटल सुरक्षिततेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.कार्यशाळेचे समन्वयक,समन्वयक तथा वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली.

कार्यशाळेचे संचालन प्रा. अविनाश खानंदे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रा. डॉ. अपेक्षा दुबे यांनी केले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. अभ्युदय सोमवंशी, प्रा. डॉ. विशाखा पाटील, प्रा. डॉ. चित्रा पराते आणि प्रा. मनीषा भिंगारे यांनी आयोजन समिती सदस्य म्हणून सहकार्य केले.कार्यशाळेला विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# जिल्ह्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्व.लालबहादूर शास्त्री यांची जयंती

## सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालयात

**लेहेगाव-** सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालयात सत्य व अहिंसेचे पुजारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५७ वी जयंती तसेच स्वतंत्र भारताचे दुसरे प्रधानमंत्री स्व. श्री लालबहादुर शास्त्री यांची १२२ वी जयंती आणि त्यागमूर्ती कॉम्रेड भाई मंगळे यांची १०६ वी जयंती झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र भि. सुळे यांनी स्वीकारले होते.तर प्रमुख अतिथी माणिकरावजी काकडे व शाळा समितीचे सदस्य तथा पत्रकार कैलाससिंह ठाकूर यांनी स्वीकारले होते. यावेळी कोमल



आठवले,सावरी वानखडे,संस्कार काळबांडे, कार्तिक गवळी, भविष्य फरकाडे,आदिती वानखडे,प्रणिता आठवले, सिमरन शेख नसीर, आनंदी गवळी इत्यादींनी महापुरुषांच्या जीवनचरित्रावर मनोगत व्यक्त केले. विद्यालयातील भाषा-शिक्षिका दर्शना कातलाम यांनी महापुरुषांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन आरुषी बसंत मीना तर आभार गणित-शिक्षक एस.व्ही.गुंजीटे यांनी केले. महापुरुषांच्या या जयंतीच्या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता योगिता पुं. हिरुळकर, प्रयोगशाळा परिचय आर.बी.मालपे,शिपाई बि.ओ ठाकूर यांनी प्रयत्न केले.

## विभागीय आयुक्त कार्यालय

**अमरावती-** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी सहायक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार अनिता झाडे, तहसिलदार संतोष आठरे, नायब तहसीलदार श्यामसुदंर देशमुख, यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.उपस्थितांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.



## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन उत्साहात



**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून तसेच भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादुर शास्त्री यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. अरुणा वाडेकर, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत)राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन तथा राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



## जिल्हाधिकारी कार्यालय

**अमरावती -** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## नांदगाव हायस्कूल नांदगाव खंडेश्वर



**नांदगाव खंडेश्वर-** स्थानिक नांदगाव हायस्कूल, नांदगाव खंडेश्वर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमापूजन व माल्यार्पणाने झाली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अश्विन पोच्छी हे उपस्थित होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या पर्यवेक्षिका प्रज्ञा काळे, तर मुख्य मार्गदर्शिका म्हणून उपमुख्याध्यापिका अरुणा मार्डीकर यांची उपस्थिती होती.या प्रसंगी महात्मा गांधींगीच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी अत्यंत समर्पक शब्दांत आपले विचार मांडले.सुष्टी गजानन रिटे,शिवम बैस या विद्यार्थ्यांनी वैष्णव जनतोतेने के कही हे गांधीजींचे आवडते भजन म्हंटले. तसेच जेष्ठ शिक्षक गोवर्धन यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या दोन्ही महान नेत्यांच्या अलौकिक जीवनावर सविस्तर प्रकाश टाकला.आपल्या अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक पोच्छी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सत्य,अहिंसा,न्याय आणि सत्याग्रह या तत्त्वांचा खंबीर पाठपुरावा करत देशस्वातंत्र्याचा ध्यास घेणाऱ्या गांधीजींच्या विचारांमध्ये आजही प्रत्येक पिढीला घडवण्याचे अफाट सामर्थ्य आहे, असे मत व्यक्त केले.सदर कार्यक्रमाचे संचालन कराळे व आभार डोंगरे यांनी केले कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गांधी विद्यालयात अंजनगाव बारी

**अंजनगाव बारी-** गांधी विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विनोद चिंचोळकर होते. प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक दिगंबर करडे, मिलिंद चिरडे, कमल चांडक व गंगा भैसने उपस्थित होते.प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर भाषणे तसेच देशभक्तिपर गीतांचे सादरीकरण केले.यावेळी नीलिमा देव,गंगा भैसने, दिगंबर करडे व सुशील चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.'महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांनी दाखविलेल्या सत्याच्या मार्गाची कास विद्यार्थ्यांनी कधीही सोडू नये,' असे प्रतिपादन प्राचार्य विनोद चिंचोळकर यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन विधी खंडारे यांनी केले.आयोजन सुशील चौधरी यांनी केले,तर आभार प्रशांत दुधे यांनी मानले.

## मनपात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी

**अमरावती-** महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत झाला. मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. उपस्थित कार्यक्रमानंतर जयस्तंभ चौकातील महात्मा गांधी यांचे पुतळ्याला हारार्पण करण्यात आले.यावेळी उपमहापौर सचिन भेंडे,स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, नगरसेविका सुरेखा लुंगारे, नगरसेवक मनिष बजाज, संजय तिरथकर, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख,उपायुक्त नरेंद्र वानखडे,उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उद्यान निरीक्षक श्रीकांत गीरी, प्रमोद मोहोड, अमोल साकुरे, गोडबोले, भुषण खडेकार, सतिश ताथोड, गणेश काकडे, अखिलेश खडेकार, धिरज पार्शिवकर, मंदार नानोटी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या वेशभुषेत अभिनेता सर्जेराव गलपट उपस्थित होते.



# सात चितांनी हादरला परिसर
## जागेअभावी वेगवेगळ्या वेळी अंत्यसंस्कार

**वर्धा/प्रतिनिधीः-** दुर्गादेवीची मूर्ती घेऊन परतताना समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताने सात कुटुंबांवर काळाचा घाला घातला. एकाच परिसरातील सात जणांचा या अपघातात मृत्यू झाल्याने या दुर्घटनेने सिंदी मेघे परिसरासह संपूर्ण वर्धा जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. देवीच्या आगमनाच्या आनंदात सहभागी होण्यासाठी निघालेले हे तरुण परतलेच नाहीत. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि.२)वेगवेगळ्या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले.



या दुर्घटनेत घनश्याम पाटील (वय ६०), मुनेश्वर ढोले (वय ५३), दत्ता खुरसंगे (वय ५३), प्रवीण बकाने (वय ५०), ओम गावंडे (वय २२), गोलू ऊर्फ सचिन बादलमवार (वय ३८) आणि रोशन राऊत (वय २६) यांचा मृत्यू झाला.

अपघाताची बातमी परिसरात पोहोचताच नागरिकांनी मोठी गर्दी केली. प्रत्येक कुटुंबाच्या आक्रोशाने वातावरण सुन्न झाले होते. सातही जणांचे अंत्यसंस्कार एकत्र काढण्याची चर्चा होती. मात्र अंत्यसंस्काराच्या ठिकाणी जागेची मर्यादा असल्याने सर्वांवर एकाच वेळी अंत्यसंस्कार करणे शक्य झाले नाही. त्यामुळे वेगवेगळ्या वेळेत अंत्यसंस्कार करण्यात आले.

काही अंत्यसंस्कारावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर उपस्थित होते. त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. ☞(पान २ वर)

# समृद्धी महामार्गावर वाहन चढले कसे
## टोलवर सुमारे दीड तास विरोध

### सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

समृद्धी महामार्गावर दुर्गा देवीची मूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनाला भीषण अपघात होऊन सात जणांचा मृत्यू झाल्यानंतर महामार्गावरील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वर्धेकडे मूर्ती घेऊन येणारे वाहन कारंजा लाड टोल प्लाझावरून समृद्धी महामार्गावर चढले. मात्र या वाहनाला महामार्गावर प्रवेशाची परवानगी नेमकी कोणी दिली, याची चौकशी करण्याची मागणी आता होत आहे.



माहितीनुसार, मूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनाच्या पिकअपला टोचन लावून रथ नेला जात होता. या वाहनाचा वेग अवघा ३० ते ४० किलोमीटर प्रतितास असल्याचे सांगितले जात आहे. समृद्धी महामार्गावरील वेगवान वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर अशा संथ गतीच्या वाहनाला प्रवेश देताना ☞(पान २ वर)

# रत्नापूर तलावात दोन तरुण बुडाले
## भावेशचा मृतदेह सापडला; दुसऱ्याचा शोध सुरू

### -जिल्हा सामान्य रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश

**अमरावती/प्रतिनिधीः-** मित्रांसोबत फिरण्यासाठी रत्नापूर तलावावर गेलेल्या तरुणांवर काळाने घाला घातला. बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रत्नापूर तलावात शुक्रवारी २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी दोन तरुण पाण्यात बुडाल्याची हृदयद्रावक घटना घडली. यातील भावेश चव्हाण (वय १७, रा. गोपालनगर) याचा मृतदेह रात्री आठच्या सुमारास शोधण्यात आला. दुसऱ्या तरुणाचा रात्री उशिरापर्यंत शोध सुरू होता. भावेशचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात आणल्यानंतर नातेवाईकांचा आक्रोश मन हेलावून टाकणारा होता.



साईनगर, गोपाल नगर, विलासनगरसह शहरातील विविध भागातील सहा ते सात तरुण शुक्रवारी फिरण्यासाठी रत्नापूर तलाव परिसरात गेले होते. काही वेळ तलाव परिसरात घालवल्यानंतर काही तरुण पाण्यात उतरले. त्याचवेळी दोन तरुण अचानक पाण्यात बुडाले. डोळ्यांदेखत मित्र पाण्यात बुडाल्याचे पाहून सोबतच्या तरुणांमध्ये एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने तलावात शोधमोहीम सुरू केली. अंधार वाढत असतानाही पाण्यात विविध ठिकाणी शोध घेण्यात आला. अखेर रात्री सुमारे आठ वाजता भावेश चव्हाणचा मृतदेह पथकाच्या ☞(पान २ वर)

# मोबाईल टॉवरवर चढला अन्यायग्रस्त शेतकरी
## -गुरुकुंज मोझरीत आंदोलन -प्रकरण अचलपूर एसडीओ कार्यालयातील जमीन फेरफारचे

### -शेतकरी कुटुंबियांचे टॉवरखाली उपोषण

**तिवसा/प्रतिनिधीः-** अचलपूर एसडीओ कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या शेतीच्या एका प्रकरणात अनेक वर्षांपासून होत असलेल्या अन्यायाला घेऊन त्रस्त झालेल्या वऱ्हा येथील शेतकरी प्रदीप शामरावजी डाखोरे यांनी आज राष्ट्रसंताच्या कर्मभूमीतील बसस्थानकासमोरील एका मोबाईलच्या उंच टॉवरवर २५० फुटांवर चढून लक्षवेधी आंदोलन सुरू केले. ज्यामुळे प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ निर्माण झाली आहे. सोबतच टॉवरखाली कुटुंबातील वृद्ध आईसह पत्नी व मुलांनी देखील न्याय मिळेपर्यंत उपोषण मांडले आहे.



अमरावती जिल्ह्यातील मौजा सर्फाबाद, हिरुळ पूर्णा आणि नारायणपूर येथील भोगवट वर्ग-२ मधील सुमारे १६ एकर जमिनीच्या मालकी हक्कावरून हे प्रकरण अचलपूर SDO कार्यालयात सुरू आहे.याप्रकरणी अनेकदा झालेल्या सुनावणी व आदेशात न्याय न ☞(पान २ वर)

### पहाटेच टॉवरवर चढल्याने खळबळ-

या आंदोलनासंदर्भात प्रदीप डाखोरे यांनी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर केले होते. २ ऑक्टोबरपूर्वी प्रशासनाने निवेदनाची दखल घेऊन बैठक आयोजित करावी आणि प्रश्न मार्गी लावावा, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप करत त्यांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

न्यायाच्या मागणीसाठी प्रदीप डाखोरे यांनी मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन सुरू केल्याच्या पाश्वभूमीवर त्यांच्या आई शोभा श्यामराव डाखोरे,पत्नी सुषमा डाखोरे,भाऊ संदीप श्यामराव डाखोरे तसेच ज्ञानेश व ओम ही दोन मुले ,दोन मुले असे सर्व जण टॉवरखाली ठाण मांडून बसले आहे.

# सामाजिक पोस्टवरून भाजपा गटनेत्याचा धमकीवजा इशारा
## भाकपाचे सतिष चौधरींची पोलिसांत तक्रार

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** सामाजिक विषयावर सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर आपल्याला मोबाईलवरून भाजपा न.प. गटनेते पप्पू भालेराव व इतर दोघांनी धमकीवजा इशारे दिल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव सतिष चौधरी यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली असून, मोबाईलवरील संभाषण व संदेशांचे स्क्रीनशॉट पोलिसांकडे सादर केल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकारामुळे विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त पत्रकार परिषद शुक्रवारी पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे तक्रार देणार असल्याची माहिती देण्यात आली.



सतिष चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, २९ सप्टेंबर रोजी त्यांनी युवकांना राजकीय पक्षांचे, मंडळांचे कार्यकर्ते बनविण्यासाठी विविध प्रकारची प्रलोभने दिली जात असल्यासंदर्भातील एक सामाजिक पोस्ट चांदूर रेल्वे शहरातील पत्रकारांच्या व्हॉट्सप ग्रुपवर शेअर केली होती. या पोस्टमध्ये युवकांना चुकीच्या मार्गावर नेण्यासंदर्भातील एका डॉक्टरांनी सोशल मीडियावर मांडलेल्या ☞(पान २ वर)

### देवी-देवतांबाबत कोणीही बोलले तरी विरोध करणार

'देवी-देवतांबाबत कोणीही काहीही बोलत असेल, तरी मी त्याचा नेहमीच विरोध करणार. यासाठी माझ्यावर कोणतीही कारवाई झाली तरी चालेल, अशी भूमिका भाजपा गटनेते पप्पू भालेराव यांनी व्यक्त केली.

# दासटेकडीजवळ भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू
## अज्ञात वाहनाची धडक; वाहनचालक पसार

**तिवसा/प्रतिनिधीः-** अमरावती-नागपूर महामार्गावर भरधाव वाहतुकीचा धोका पुन्हा अधोरेखित करणाऱ्या अपघातात २३ वर्षीय दुचाकीस्वाराचा जीव गेला. दासटेकडी, मोजरीजवळ १२ सप्टेंबर रोजी सकाळी अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार उत्कर्ष संदीप मेश्राम याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावर न थांबता पसार झाला. उत्कर्ष मेश्राम हा होंडा एसपी-१२५ दुचाकीने पुण्याहून नागपूरच्या दिशेने प्रवास करीत होता. तो दासटेकडी परिसरातून महामार्गाने जात असताना मागून किंवा बाजूने आलेल्या अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याची माहिती पोलिसांत नोंदविण्यात आली आहे. धडकेनंतर उत्कर्ष रस्त्यावर कोसळला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत ☞(पान २ वर)

# हार्डवेअर दुकानाचे लॉक तोडून रोकड लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुकान बंद करून व्यापारी घरी गेल्यानंतर अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने हार्डवेअर दुकानाचे लॉक तोडून काउंटरमधील १२ हजार रुपयांची रोकड लंपास केली. सिंधी चौक परिसरातील शक्ती हार्डवेअरमध्ये ही घटना घडली. दुसऱ्या दिवशी सकाळी दुकानाचे लॉक तुटलेल्या अवस्थेत आढळल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. शक्ती हार्डवेअरचे संचालक जयपाल जियलदास संभवानी (५२, रा. प्रिज्मा नगर, गल्ली क्र. ५, अमरावती) यांनी ३० सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद केले.

दुकानाला लॉक लावल्यानंतर ते घरी गेले. रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीने दुकानाला लावलेले लॉक तोडले. दरम्यान, दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारील दुकानदाराच्या निदर्शनास दुकानाचे लॉक तुटलेले आले. त्यांनी तत्काळ संभवानी यांना फोन करून माहिती दिली. दुकानात काही अनुचित प्रकार घडल्याची☞(पान २ वर)

# पावसाने दडी मारल्याने अचलपूर तालुक्यात कपाशीवर दुष्काळी सावट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील रासेगांव, बोरगांव, असदपूर या महसूल मंडळ परिसरात यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामातील कपाशी पिकावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसानंतर कपाशीची पिके चांगली वाढली होती. मात्र मागील काही आठवड्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. परिणामी कपाशीच्या वाढीवर परिणाम होत असून फुलोरा व पाते गळण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



कपाशी पिकाला सध्या पाण्याची गरज असताना पाऊस नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. काही ठिकाणी पिके कोमेजू लागली असून जमिनीला भेगा आहेत. पावसाअभावी कपाशीच्या अपेक्षित उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. यामुळे आधीच वाढलेला लागवड खर्च,महागडी खते, कीटकनाशके आणि मजुरीचा भार शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. पावसाने आणखी काही दिवस दडी मारल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिसरातील पिकांची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. आता दमदार पावसाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे.

# एमडी ड्रग्जसह दोघे जेरबंद
## बडनेरा परिसरात कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नशेच्या पदार्थांच्या अवैध तस्करीला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सने बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करीत दोन संशयित ड्रग्ज तस्करांना अटक केली. त्यांच्याकडून ५ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज, दोन मोबाइल फोन असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बडनेरा परिसरातील रेस्ट हाऊसच्या मागील बाजूस काही युवक अमली पदार्थांची खरेदी-विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सला मिळाली होती.



माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने परिसरात सापळा रचून संशयितांच्या हालचालींवर नजर ठेवली. यावेळी रेस्ट हाऊसच्या मागील परिसरात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोन युवकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे ५ ग्रॅम एमडी पावडर आढळून आली. या ड्रग्जची अंदाजे किंमत १५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय गुन्ह्यात वापरले जात असल्याच्या संशयावरून दोन मोबाइल फोनही जप्त करण्यात आले.

अमली पदार्थ व मोबाइल फोन असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे हुजेब खान अन्वर खान (वय २४, रा. छाया नगर) आणि एजाज खान जावेद खान (वय ३९, रा. हबीब नगर) अशी आहेत. यातील ☞(पान २ वर)

# सरकारी योजनेतील फोर्टिफाइड तांदूळ दुकानात
## विनापरवानगी विक्रीचा आरोप, दुकानदाराविरुद्ध गुन्हा

**शिरजगाव कसबा/प्रतिनिधीः-** सार्वजनिक वितरण प्रणालीतून लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या फोर्टिफाइड तांदळाचा विनापरवाना साठा करून विक्री केल्याचा प्रकार तपासणीत समोर आल्याने शिरजगाव कसबा पोलिसांनी दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला. धान्य दुकानाच्या तपासणीत विविध रंगांच्या पोत्यांमध्ये तांदूळ आढळल्यानंतर त्याच्या खरेदी-विक्रीसंदर्भातील परवान्याची चौकशी करण्यात आली. तहसील कार्यालयातील निरीक्षण अधिकारी राहुल साहेबराव केदारे (३५) यांनी सागर विनोदराव राठी (२८, रा. शिरजगाव कसबा) यांच्या धान्य दुकानाची तपासणी केली. तपासणीदरम्यान दुकानात विविध रंगांच्या पोत्यांमध्ये तांदूळ साठवून ठेवलेला आढळून आला. अधिकाऱ्यांनी संबंधित तांदळाच्या खरेदी-विक्रीचा परवाना मागितला. मात्र, संबंधिताकडे तांदळाच्या व्यवहारासंदर्भात आवश्यक परवाना नसल्याचे तपासणीदरम्यान समोर आल्याचे नमूद करण्यात आले आहे. यानंतर दुकानातील तांदळाचे नमुने अधिकृत तपासणीसाठी ☞(पान २ वर)

# जीवन ज्योतची समाजसेवेसाठी नवी वाटचाल
## नेत्रदान, देहदान व अवयवदानासह मोफत नेत्रसेवेचा उपक्रम

### -उद्योजक चंद्रकांत पोपट यांची पत्रकार परिषदेत माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** समाजात राहत असताना समाजाचे ऋण फेडण्याच्या उद्देशाने तसेच गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी 'जीवन ज्योत' नेत्रदान, देहदान आणि अवयवदान नावाने नवीन समितीची स्थापना करण्यात आली आहे. समाजहित साध्य करण्याच्या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम राबविणे, गरजू रुग्णांना मदत करणे आणि नेत्रदान, देहदान व अवयवदाना बाबत जनजागृती करणे, हा या समितीचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती उद्योजक चंद्रकांत पोपट यांनी आज शुक्रवार १ ऑक्टोंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली. त्यांनी सांगितले की या समितीचे अध्यक्ष ते स्वतः आहे.तर सचिव डॉ. नंदकिशोर लोहाना,कोषाध्यक्ष पुरणसेठ हबलानी,नेत्रदान समिती प्रमुख सुरेश वसानी, देहदान समिती प्रमुख डॉ. पंकज लांडे,अवयवदान समिती प्रमुख डॉ. सिकंदर आडवाणी, मोतियाबिंदू शस्त्रक्रिया व नेत्र तपासणी ☞(पान २ वर)



# ग्रामपंचायत सभेत गोंधळ
## सचिव-सरपंचांना शिवीगाळ केल्याचा आरोप

### शासकीय कामकाजात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा

**धारणी/प्रतिनिधीः-** ग्रामपंचायतीची मासिक सभा सुरू असताना कथित शिवीगाळीच्या प्रकारामुळे सभेतील वातावरण बिघडल्याचा आरोप करण्यात आला आहे. बैरागड ग्रामपंचायत कार्यालयात ३० सप्टेंबर रोजी सकाळी घडलेल्या या प्रकारानंतर धारणी पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, बैरागड ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता मासिक सभेचे कामकाज सुरू होते. यावेळी असलम खान चुन्न उर्फ तस्सव्वर खान (रा. बैरागड) हा सभेत उपस्थित होता. सभा सुरू असताना त्याने ग्रामपंचायत सचिव तसेच सरपंच यांच्याशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे सभेतील वातावरण अचानक तणावपूर्ण झाले. शिवीगाळीमुळे ग्रामपंचायतीचे नियमित कामकाज प्रभावित होऊन शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. ग्रामपंचायत कार्यालयातील कामकाजाच्या वेळी घडलेल्या या प्रकाराची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायत सचिव सुखलाल कानेकर यांनी धारणी पोलीस ठाण्यात ☞(पान २ वर)

# सील केलेल्या घराचे पुन्हा सील तोडले?
## सुरक्षा रक्षकाला धमकी व धक्काबुक्कीचा आरोप

### शारदा नगरातील दोघांवर गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बँकेच्या कर्जाची परतफेड न झाल्याने न्यायालयीन प्रक्रियेत ताब्यात घेऊन सील करण्यात आलेल्या घरात पुन्हा प्रवेश केल्याचा प्रकार शारदा नगर परिसरात समोर आला आहे. घराच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या रक्षकाला धक्काबुक्की करून धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी नितीन भगिरथ चांडक व पंकज भगिरथ चांडक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. बँक ऑफ बडोदा, अमरावतीचे व्यवस्थापक दिनेश चंद्रमासिंग कुमार (वय ५७) यांनी याबाबत तक्रार दिली. पोलिसांच्या नोंदीनुसार, रघुवीर कॉटन फायबर, कार्टन मार्केटच्या मागील भागातील व्यवसायाशी संबंधित भागीदारांनी बँकेकडून कर्ज घेतले होते. या कर्जासाठी शारदा नगर येथील सर्वे क्रमांक ४७/१ मधील बांधकामासहित घर तारण ठेवण्यात आले होते. कर्जाची परतफेड न झाल्याने बँकेकडून कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली.

न्यायालयाने ६ डिसेंबर २०२३ रोजी संबंधित मालमत्तेचा ताबा घेण्याबाबत आदेश दिला.☞(पान २ वर)

# शिवी दिल्याच्या रागातून तरुणावर चाकूहल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** मित्रांसोबत हसत-मस्करी करीत उभ्या असलेल्या तरुणाच्या तोंडून शिवी निघाल्याने संतापलेल्या एका २० वर्षीय तरुणाने बटनाचा चाकू काढून त्याच्यावर वार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना राणा कॉम्प्लेक्स येथील बिअर शॉपीसमोर १ ऑक्टोबर रोजी रात्री घडली. हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी ☞(पान २ वर)

नाग विदर्भ चरखा संघ मुल
व्दारा संचालित
खादी ग्रामोद्योग भांडार
गांधी चौक, अमरावती मो. ८१४९७५११५१
प. पुज्य म. गांधी जयंती निमित्य
२ ऑक्टोंबर पासून ४५ दिवसपर्यंत २०%
प्रमाणे सवलत सुरु राहील
खादी २० %
पॉलीवस्त्र २०%
रेशम २० %
उलन २०%